मनोरंजक ग्रंथप्रसारक मंडळीची पुस्तकमाला.

पुस्तक ३५ वें.

# भयंकर सूड.

हें पुस्तक

श्रीयुत बळवंत हरि पंडित, बी. ए.,

यांनीं लिहिलें.

[प्रथमावृत्ति.]

मनोरंजक ग्रंथप्रसारक मंडळी,

गिरगांव-मुंबई.

किंमत ०-४-० ] निर्णयसागर छा० छा. [मे, १९०८.

# दोन शब्द.

राजा विक्रम ही गोष्ट विक्रमादित्याबद्दलच्या ज्या अनेक दंतकथा आहेत त्यांतील एक आहे. या गोष्टीला इतिहासाचा आधार किती आहे, हें सांगतां येणें कठीण आहे. ही गोष्ट अलाहाबादेस निघणाऱ्या 'दी मॉडर्न रिव्ह्यु' या मासिकाच्या डिसेंबर १९०७ च्या अंकांत 'विक्रम एँड दी फकीर' या नांवानें थोडक्यांत आली आहे. माझ्या या गोष्टीस तीच मूळ आधार आहे.

ह्या गोष्टींत कांहीं अद्भुत भाग आहे. कित्येकांचा यावर विश्वास असेल व कित्येकांचा नसेल. तथापि दोन्ही तऱ्हेच्या वाचकांस ती मनोरंजक वाटेल, अशी आशा आहे. ती पूर्ण करणार ईश्वर समर्थ आहे.

नागपूर,<br>१।४।०८.      'बळवंत'.

# भयंकर सूड.

प्रकरण १ लें.

## क्षिप्रेच्या तीरीं.

क्षिप्रा नदीच्या तीरावर वसलेली उज्जयनी नगरी ही राजा विक्रमाच्या राजधानीची जागा होय. आमच्या कथानकाच्या काळीं या नगरीची फारच भरभराट होती. सर्व हिंदुस्थानांत या काळीं विक्रमादित्यासारखा दुसरा वैभवशाली आणि पराक्रमी राजा नव्हता. या वैभवशाली राजाच्या राजधानीचें वर्णन काय करावयाचें आहे! अत्यंत सुंदर, भरभराटलेलें, भरतखंडाच्या व्यापाराचें केंद्रस्थान, आणि सरस्वतीचें निवासगृह अशा या शहराचें शब्दचित्र तें काय रेखाटतां येणार? तेव्हां, आह्मी ह्या भरीसच पडत नाहीं!

विक्रमादित्याचें नांव ऐकतांच ज्याला त्याची ओळख पटत नाहीं, असा कोणी तरी हिंदवासी असेल काय? अत्यंत प्रबळ असल्यामुळें ज्याचें विक्रम हें नांव सार्थ होत होतें, ज्याच्या तेजानें आदित्यकुल उज्ज्वल झालें होतें, स्वतः विद्वान् असल्यामुळें ज्याला विद्वानांची चहा होती, ज्यांची कीर्ति आज हजारों वर्षें सूर्याच्या तेजाप्रमाणें अणुभरहि कमी झाली नाहीं, व ज्यांच्या विद्वत्तेकडे पाहून सर्व कालचे व सर्व देशचे लोक आश्चर्यानें थक्क होतात अशा त्या निरनिराळ्या शास्त्रांत पारंगत नऊ विद्वानांनां ज्यानें आपल्या पदरीं आश्रय दिला होता, व ज्याच्या आश्रयामुळें त्यांच्या विद्वत्तेचें चीज झालें, किंवा ज्यांच्या सांनिध्यामुळें त्याच्या दरबाराला शोभा येऊन त्याच्या कीर्तींत भर पडली, अशा या अन्योन्याश्रय नरोत्तमांकडे पाहून कोणाला सकौतुक अभिमान वाटणार नाहीं?

क्षिप्रेच्या दक्षिणतीरीं मनुष्यांचा क्वचित्च राबता असावयाचा. पण अलीकडे सूर्योदयापासून तों सूर्यास्तापर्यंत, किंबहुना त्यानंतरहि बराच वेळपर्यंत, उज्जयनींतील लोकांची इकडे सारखी वर्दळ सुरू झाली होती. लहानथोर स्त्रीपुरुष, श्रीमान् गरीब, अशा सर्व स्थितींतील व सर्व दर्ज्याचे लोक या भागाकडे येतांजातांना सारखे दृष्टीस पडत होते. ज्या नावाड्यांनां पूर्वीं परतीरावरील शेतकऱ्यांचाच कायतो आश्रय असे, त्यांनां आतां मंडळीची या तीरावरून त्या तीरावर व त्या तीरावरून या तीरावर नेआण करण्यांत क्षणाचीहि फुरसत सांपडेनाशी झाली. ज्यांनां पूर्वीं साऱ्या दिवसांत चारदोन आण्यांचीहि प्राप्ति होत नव्हती, तेच आतां दहापांच रुपयांपर्यंत कमावूं लागले. जेथें पाऊलवाटेशिवाय अन्यमार्ग नव्हता, तेथें आतां रथ, घोडे, शिबिका, आणि पालख्या यांची सारखी रहदारी सुरू झाली. ज्या ठिकाणीं एखाद्या वाटसरूला रस्ता विचारण्याकरतां एखादा मनुष्य भेटण्याची मारामार पडे, तेथेंच आतां रस्ता मिळण्याची पंचाईत पडूं लागली ! असा हा सर्वतोपरी फरक होण्याचें काय बरें कारण असावें ?

वाचकहो ! चला, आपणहि या उज्जयनीवासीजनांबरोबर परतीराला जाऊं. यांच्याप्रमाणें आपल्याला खर्च नको, नावेंत जागा मिळण्याची खटपट नको, किंवा यांच्या इतका वेळहि घालवायला नको. नलराजाच्या रथाची वेगाबद्दल आजपर्यंत आपण कीर्ति ऐकत होतों; पण त्याला—त्यालाच काय, प्रत्यक्ष वायूला देखील वेगांत मागें टाकणाऱ्या मनोरथावर आरोहण करून आपण प्रत्यक्ष स्थलांतराशिवाय क्षिप्रेच्या दक्षिण तीरावर जाऊं. पहा, आपली इच्छा होण्याचाच अवकाश, आपण इच्छित स्थलीं येऊन पोहोंचलों देखील ! आपल्याला येथें काय दिसतें बरें ? ही येथें एक लहानशी पर्णकुटी पहा. इकडेच सर्वांचा जाण्याचा ओघ आहे. या पर्णकुटींत जागा तरी किती संकोचित ! आंत तरी काय आहे ! एक बैरागी बसला आहे आणि त्याचें दर्शन घेऊन सार्थकता मिळविण्याला या सर्वांची ही एवढी धडपड चालली आहे.

ही पहा, या पर्णकुटीच्या मध्यमार्गी एक धुनी पेटलेली आहे. चार हात लांब रुंद असा एक खळगा करुन त्यांत ती धुनी पेटविली आहे. सर्व खळगाभर निखारे पसरले आहेत. जवळ बसणाराला देखील या धुनीची धग सहन होत नाहीं; पण हा बैरागी पहा, त्या विस्तवावर दर्भासन पसरून त्यावर कसा आनंदानें बसला आहे! याचें हें दर्भासन जळत नाहीं, किंवा या अग्नीपासून या बैराग्यालाहि पण कांहीं ताप होत नाहीं. इतरांनां ताप देणारा व सर्वभक्षक अग्नि याच्यापुढें मात्र गारोड्याच्या मंत्रबद्ध सर्पाप्रमाणें थंड कशानें बरें झाला ? हा सारा याच्या योगबलाचा प्रभाव, दुसरें काय !

हा योगी नुकताच थोडे दिवसांपूर्वी येथें येऊन राहिला होता. हा कोण, कोठला व योगसाधनास अनुकूल अशा गिरिकंदरांतून येथें येऊन कां राहूं लागला, हें कोणालाच ठाऊक नव्हतें. एके दिवशीं एका शेतकऱ्याच्या मुलाच्या सहज हा दृष्टीस पडला व तेथून हलकेहलके ही वार्ता सर्वत्र प्रसृत झाली. कोणी कौतुकानें, कोणी आदरानें, तर कोणी भावानें याच्या दर्शनास येऊं लागले व यामुळेंच सध्याचा हा या भागांतील अलौकिक फरक झाला आहे.

हा योगी वयानें बराच वृद्ध दिसत आहे. कमरेस एक दोरखंड व गुह्येंद्रियें झांकण्यापुरतीच एक चिंधीची लंगोटी, एवढींच कायतीं याच्या अंगावरील भूषणें ! सर्वांग भस्मलिप्त आहे. मस्तकावर जटाभार आहे. केश शुभ्रवर्ण आहेत—मग ते भस्मामुळें तसे दिसतात, किंवा वार्धक्यामुळें खरोखरच ते तसे झाले आहेत, हें ठरविणें फार कठीण आहे. याच्या एका हातांत कुबडी आहे व ती दर्भासनावर टेंकलेली असून तिच्यावर त्याचा सर्व भार पडलेला दिसत आहे. याच्या दुसऱ्या हातांत रुद्राक्षमाला आहे. या योग्याची समाधी लागली ह्मणजे याचें माळ ओढणें बंद असतें व समाधी उतरली ह्मणजे हा त्या माळेचे मणी ओढूं लागतो. फारसा कोणाशीं हा बोलत नाहीं. एखाद्याशीं एखादे वेळीं बोलतो, तेव्हां त्याला कृतकृत्य झाल्याप्रमाणें वाटतें. अनेक लोक, अनेक प्रकारची आपापल्या योग्यतेप्रमाणें याला पूजा अर्पण करित आहेत व हा केवळ

स्वीकारदर्शक मान हालवून गरीबांस ते सर्व पदार्थ वांटा ह्मणून सांगत आहे. कित्येकांनीं याचें शिष्यत्व पत्करण्याची आपली इच्छा दर्शविली तेव्हां 'हा मार्ग फार बिकट आहे, तुह्मी या नादीं लागूं नका' असें हा त्यांस सांगतो व यामुळें बिचारे उत्सुकतेनें आलेले निराश होऊन परत जात आहेत.

हा पालखींत बसून कोण बरें आला! याच्या वेषावरून तर हा राजाचा मानकरी, किंवा कोणी मोठा सरदार असावा, असें वाटतें. पालखींतून उतरतांच सर्व भोयांस पालखी घेऊन परत जाण्याची आज्ञा करून हा पहा आपला एक हुजऱ्या दाराशीं उभा करून आपण या योग्याच्या झोंपडींत जाऊं लागला. दाराशीं जमलेल्या लोकांनीं याला बघतांच बाजूस सरून याला मार्ग दिला. हा यापूर्वींहि येथें बऱ्याच वेळां आला असावा. या योग्याचें याला वेडच लागलेलें दिसतें. नाहीं तर हा नेहमीं याच्या दर्शनाला कां बरें येता?

हा सरदार मध्यम वयाचा आहे. याची शरीरयष्टी चांगली बांधेसूद असून उंची वस्त्रांनीं याचें सर्वांग आच्छादिलेलें आहे. डोक्यास बहुमोल असा मंदिल असून चेहरा तेजस्वी आहे. डोळ्यांत विलक्षण तेज चमकत आहे. याला ऐहिक वैभव अनुकूल आहे, तरी याच्या मुखावर उदासीनतेची छटा दृग्गोचर होत असल्यामुळें याला कसली तरी भयंकर चिंता लागली आहे हें सहज कळून येतें. आंत जाऊन योग्याला वंदन करून हा एका कोपऱ्यांत जाऊन बसला. अनेक लोक आले व गेले तरी हा कांहीं आपल्या जाग्यावरून हालत नाहीं. दुपार झाली, संध्याकाळ झाली, सूर्यास्त होऊन सर्व सृष्टि अंधकारमय झाली, तरी हा आपला तेथेंच बसलेला! याची दृष्टि एकसारखी त्या योग्याकडे लागलेली आहे. एवढा हा कसल्या बरें विचारांत गर्क असावा? या योग्याकडे याचें एवढें काय बरें काम असावें?

जों जों रात्र होऊं लागली तों तों याची चिंताहि वाढत चालली. झोंपडींत एक मिणमिण दिवा जळत आहे. लोकांची गर्दी आतां अगदीं मोडली, तरी हा कांहीं आपल्या जागेवरून हालत नाहीं. योग्याबरोबर कांहीं बोलावें, असा याचा मानस दिसतो. बोलावें कीं नाहीं, बोलावयाचें

तर कसें बोलावें, योग्याला आपल्या बोलण्याचा राग तर येणार नाहींना ? असे अनेक विचार त्याच्या मनांत काहूर माजवूं लागले आहेत. बोलण्याकरतां ओंठ फुरफुरत आहेत, शब्द ओंठाशीं येतात, पण बाहेर पडत नाहींत, अशी याची विचित्र स्थिति झाली आहे ! इतका वेळ येथें बसूनहि प्राप्त झालेली एकांतस्थिति हातची जाऊं देऊन आलों तसेच परत जावें असें एकदा याच्या मनांत आलें, पण तें क्षणमात्रच ! हा पहा, यानें मनाचा हिय्या केला. काय होईल तें होवो, बोलावेंच, असा याचा आतां निश्चय झाला. ऐका ! "महाराज !" अशी सद्गदित स्वरानें यानें योगीमहाराजांस हांक मारली.

योग्यानें आपली दृष्टि याच्याकडे फिरविली. पण आतां याच्या तोंडांतून शब्दच निघत नाहीं ! याची ही वेड्यासारखी स्थिति योग्याच्याहि लक्ष्यांत आलीसें दिसतें. ते पहा, योगीराज त्याला कांहीं विचारित आहेत. "बेटा ! तुला एखाद्या दुर्धर चिंतेनें ग्रासलें आहे, हें माझ्या लक्ष्यांत मागेंच आलें. माझ्याशीं कांहीं बोलावें असें तुझ्या मनांत आहे, तर तें मोकळ्या मनानें बोल. तुला कांहीं व्याधि असेल तर मला कळूं दे. तुला कोणा प्रबल शत्रूनें त्रास दिला असेल तर तो मला सांग. मला सुचेल तो उपाय मी तुला सांगेन. मनांत कसलीहि शंका धरूं नकोस. भयरहित हो आणि काय बोलावयाचें असेल तें स्पष्ट बोल!"

"महाराज ! आपल्या या आश्वासनामुळें मला बोलण्याला धीर आला. इतका वेळ आपल्याशीं कसें बोलावें, हाच विचार मला पडला होता. मी आज आपल्याजवळ आपलें मन खुलें करणार आहें. मी जी गोष्ट आपल्याला सांगणार आहें ती फार गुप्त आहे."

"कांहीं हरकत नाहीं. तुझी गोष्ट षट्कर्णी मुळींच होणार नाहीं, याबद्दल तूं अगदीं निर्धास्त रहा. काय असेल तें मनांत कोणत्याहि प्रकारचा किंतु न बाळगतां मला सांग."

"महाराज ! माझी एका प्रबल शत्रूनें अत्यंत भयंकर अशी हानि केली आहे. त्यानें माझ्या अकलंक कीर्तीवर घाला घालून मला निष्कारण कलंक लावला आहे. ही गोष्ट माझ्या मनाला रात्रंदिवस डांचते आहे.

त्या दुष्टाचा सूड घ्यावा, अशी माझी फार इच्छा आहे; परंतु तो कसा घ्यावा हें सुचत नाहीं. आपलें सामर्थ्य अपार आहे, आपलें ज्ञान अगाध आहे, आणि आपली बुद्धि अनंत आहे. ह्मणून याचा उपाय सांगा ह्मणून याचना करित आहें. आपण थोर आहां, तेव्हां माझा अव्हेर करणार नाहीं, अशी आशा बाळगून मी आपल्याला शरण आलों आहें. आतां मला मार्ग सुचवून या दुर्धर चिंतानलांतून मुक्त करणें किंवा त्यांतच दग्ध होऊं देणें हें सर्वस्वी आपल्या हातीं आहे!"

योगी ह्मणतो "बेटा! शरणागताला अभय देणें हा आमचा धर्म आहे; परंतु तूं मला जें कार्य सांगतोस त्यांत तुझ्यावर दया करूं लागलें असतां दुसऱ्या एका मनुष्यावर संकट आणणें आहे. तेव्हां, एक तुला तरी अभय देऊन तुझ्या शत्रूला ताप द्यावा, किंवा त्याचें रक्षण करण्याकरतां तुला सध्याच्या स्थितींतच ठेवावा, हा माझ्यापुढें मोठा बिकट प्रश्न पडला आहे! मला तर असें वाटतें कीं, या कामीं माझा सल्ला घेण्यापेक्षां ईश्वर बुद्धि देईल त्याप्रमाणें तूं आपलें कार्य स्वतंत्रपणानेंच पार पाड. आमच्यासारख्या बैराग्यांनां कोणी शत्रु नाहीं. आह्मांला जसा तूं तसें सर्व जग मित्रवत्‌च आहे. मग आम्हीं एकाच्या रक्षणाकरतां दुसऱ्याचा घात करणें योग्य आहे काय, हें तूंच सांग!"

"आपल्यापुढें मी पामर काय बोलणार! या जगांत मला कोणी पाठीराखा नाहीं. आपलें दर्शन झालें, तेव्हां आपण कांहीं तरी उपाय सांगून माझ्या मनाला शांति प्राप्त करून द्याल, अशी माझ्या मनांत आशा उत्पन्न झाली. आपण ती निष्फल करणार, तेव्हां आतां मला या जगांत कांहीं कर्तव्य ह्मणून राहिलें नाहीं! जगांतील सर्व तऱ्हेच्या सुखदुःखांचा मीं अनुभव घेतला आहे. सर्व प्रकारचीं ऐश्वर्यें मीं उपभोगिलीं आहेत. माझी आतां दुसरी कसलीहि आशा राहिली नाहीं. आतांपर्यंत आपल्या शत्रूवर सूड उगविण्याच्या एका इच्छेवरच माझें जीवित अवलंबून राहिलें होतें. आपण तोहि आशातंतु तोडून टाकलात! आतां मृत्यूची वाट पहात कोठें तरी दिवस काढित राहिलें पाहिजे, दुसरा उपाय नाहीं!"

योगी ह्मणतो "बाबा! असा एकदम निराश कां होतोस? शत्रूवर सूड उगविल्यानें तुझी मळलेली कीर्ति पुन्हा कलंकरहित होत असेल तर तूं आपला विचार सोडूं नकोस. मला त्यांत गोवूं नकोस, एवढेंच माझें ह्मणणें आहे."

"पण महाराज! आपल्या सह्याशिवाय हें कार्य होणें अशक्य आहे!"

योगी गंभीर मुद्रा करून विचारतो "बरें, पण तुझा असा शत्रु तरी कोण?"

हा प्रश्न ऐकतांच सरदार योग्याच्या कानांशीं कांहीं पुटपुटला. योग्याच्या मुखावर विलक्षण आश्चर्य झळकूं लागलें. तो ह्मणतो "खरेंच कीं काय? त्यानें तुझा असा कोणता अपराध केला आहे, तो तरी कळूं दे. हें कांहीं तरी चमत्कारिकच प्रकरण दिसतें आहे."

"महाराज! आपण माझी सर्व गोष्ट ऐकून घ्यावी, ह्मणजे मग आपल्याला आश्चर्य वाटणार नाहीं."

"बरें आहे, सांग तुझी गोष्ट."

सरदारानें हळुहळू, कोणालाहि ऐकूं न जाईल अशा हलक्या आवाजानें योग्यास काय सांगावयाचें होतें तें सांगितल्यावर त्याच्या अत्यंत विनवण्या केल्या. योग्यानें त्याला मदत करण्याचें पत्करिलें. आपल्या शत्रूवर सूड घेण्याच्या पायीं सर्वस्वावर पाणी ओतण्यास सरदार तयार झाला. योगी ह्मणाला "काय वाटेल ती गोष्ट करण्यास तूं तयार आहेस काय? अत्यंत प्रियवस्तुवरहि पाणी सोडशील?"

"या सूडापुढें मला कशाचीहि मातब्बरी नाहीं! आपल्या आज्ञेबाहेर मी एक काडीभरहि वागणार नाहीं, याबद्दल आपल्या पायांचीच शपथ वाहतों!"

आतां योग्यानें त्याच्या कानांत कांहीं सांगितलें. तें ऐकतांच त्याच्या अंगावर एकदम कांटा उभा राहिला! काय हा आपण भलत्याच कामाला हात घातला, असें त्याला वाटल्याचें त्याच्या मुद्रेवर स्पष्ट दिसत आहे. योगी ह्मणतो "कां! आतां असा घाबरतोस कां? काय वाटेल तें करण्याची आणि सर्वस्वावर पाणी सोडण्याची तूं आतांच शपथ घेतल्याचें विसरलास वाटतें?"

"नाहीं, शपथ विसरलों नाहीं! मोहामुळें मी असा घाबरलों. आपल्या शब्दाप्रमाणें वागण्यास तयार आहें!"

"जा तर मग आतां. शपथ विसरूं नको. कार्य सोडूं नको. तुला आता हें कार्य पूर्ण केलेंच पाहिजे !"

"जशी आपली आज्ञा."

"ठरल्याप्रमाणें येत्या अमावास्येच्या दिवशीं प्रहर रात्रीं आपल्या मुलाला घेऊन ये. विसरूं नको. वेळ टाळूं नको. नाहींतर मग सर्वच फसेल ! पहा, काळजी घे. निर्धास्त रहा. तुझें कार्य पार पडणार, याबद्दल मुळींच भीति बाळगूं नको."

"आपल्या आज्ञेप्रमाणें करतों."

योग्याला नमस्कार करून सरदार पुनः झोंपडीच्या दाराशीं आला. येथें आपल्या आज्ञाधारक हुजऱ्याला पाहून यानें आपलें भाषण ऐकलें तर नसेलना अशी शंका त्याच्या मनांत आली असावी. नाहीं तर तो असा एकदम दचकला नसता. पण पहा, लगेच त्याची ती काळजी दूर झाल्याचें दिसतें. आपण आलों तरी हुजऱ्या स्वस्थ पडलेलाच आहे, असें पाहून त्याला झोंप लागली आहे असें समजून सरदाराचें भय दूर झालें. त्यानें हुजऱ्याला उठविलें व दोघेहि शहराकडे जाण्यास निघाले.

हा हुजऱ्या खरोखरच निजला होता काय? का त्यानें निजण्याचें सोंग करून धन्याचा व योग्याचा सर्व संवाद ऐकला? आणि ऐकला असला तरी काय झालें? काय झालें! लहान बींतच मोठा वृक्ष गुप्त असतो!

या दोघांनां जातांना पाहून योग्याला समाधान झालेंसें दिसतें. ती पहा त्याची मुद्रा प्रफुल्लित दिसूं लागली. तो आपल्याशींच हंसत आहे आणि दाढीवरून हात फिरवित आपल्याशींच पुटपुटत आहे "कसा पण योग जुळून आला आहे ! दैव अनुकूल असलें ह्मणजे सर्व गोष्टी अनुकूल होतात त्या अशा ! शत्रूच्या घरावर अग्नि तर ठेवला. धडका कसा होतो एवढेंच आतां पाहणें आहे. दोन एडक्यांच्या टकरींत माझी दामटी वळली नाहीं ह्मणजे झालें !"

योग्याच्या या संदिग्ध वाक्यांचा काय बरें अर्थ असावा ?

---

मराठी ग्रंथसंग्रहालय मि. स्थापना

## प्रकरण २ रें.

## पदच्युत प्रधान.

राजा कितीहि वीर्यशाली झाला, तरी त्याला शत्रु नसतात असें नाहीं. किंवा, हे शत्रु असतात ह्मणूनच त्याचें तेज जगाच्या दृष्टोत्पत्तीस येतें, असें ह्मटलें तरी चालेल. हे शत्रूच या वीररत्नांचे शाण होत. यांच्यामुळेंच त्यांचें तेज फांकत असतें. कसाशिवाय किंमत नाहीं! याच नियमाप्रमाणें राजा विक्रमालाहि शत्रु होते. त्याचें राज्य अफाट होतें, त्याची शक्ति सर्वांनां दरारा बसविणारी होती, तरी स्वसामर्थ्यानुसार प्रतिबंध करणारे प्रतिस्पर्धीहि त्याला होते. उज्जयनीच्या उत्तरेस हिमाचलाच्या पायथ्याशीं त्याचा एक मांडलिक होता. त्याला विक्रमाची सार्वभौम सत्ता मान्य असल्याचा पुरावा ह्मणून दरसाल कांहीं रक्कम खंडणी द्यावी लागत असे; परंतु हा त्याला मोठा अपमान वाटे. या अपमानास्पद स्थितींतून सुटण्याचा त्यानें विचार केला. आपल्या सैन्याची शक्य ती तयारी केली व एक वर्ष खंडणी देण्याचें नाकारलें. विक्रमापुढें आपला कितपत निभाव लागेल याबद्दल त्याला शंका वाटत होती, असें नाहीं; परंतु एकदाचा कायतो सोक्ष कीं मोक्ष करून घेऊन एकतर स्वतंत्र व्हावें, किंवा समरभूमीवर रणदेवतेला आपला बलि देऊन या अपमानास्पद स्थितींतून सुटावें, असा या मानी पुरुषानें निश्चय केला. त्याच्या या निश्चयानें विक्रमराजाला आपला अपमान झालासें वाटून त्यानें युद्धाची तयारी केली. युद्ध बरेच दिवस चाललें. या युद्धाचा शेवट विक्रमास अनुकूल असाच झाला, हें निराळें सांगण्याची आवश्यकता नाहीं. विक्रमानें त्याचें राज्य आपल्या राज्यास जोडलें.

बा माना! तूं आहेस तरी कसा? तूं दिसत नाहींस, तरी तुझी ओळख सर्वांस आहे. एखादें मूल धावतांना पडलें तर त्याला देखील पडण्याच्या दुःखापेक्षां लोकांनीं बघण्याचें दुःख अधिक वाटतें! लहानापासून थोरापर्यंत तूं कोणास सोडलें आहेस? तुझ्या पायीं सर्वस्वाची आहुति देण्यास जे सर्वजण तयार होतात, त्या तुझ्या अप्रत्यक्ष मूर्तीची कल्पना तरी कशी करावयाची! सर्वांत अत्यंत प्रिय असा जो प्राण, तो देखील तुझ्या कृपादृष्टीपुढें कःपदार्थ वाटतो! तुझ्याकरतां विक्रमानें लढाई करून अनेक नरवीरांचे

प्राण रणदेवीला अर्पण केले. विक्रमानेंच काय, पण त्याच्या पूर्वी अनेक वर्षांपासून तों तहत आतांपर्यंत तुझ्याकरतां खून, मारामाऱ्या, आणि लढाया करून अनेक लोकांनीं आपलें रक्त पाण्याप्रमाणें खर्ची घातलें आहे! आणि ही स्थिति जगाच्या अंतापर्यंत अशीच कायम राहणार असें स्पष्ट दिसत आहे! अशा अनंत, सर्वांतर्यामी आणि सर्वशक्तिमान् देवस्वरूपा माना! तुला नमन असो!

नूतन संपादित राज्यांतील प्रक्षुब्ध जनतेला शांत करण्याला शहाण्या माणसांची जरूर आहे. जुन्यापेक्षां नवीन राज्य सुखदायी करून तेथील लोकांनां जुन्या स्थितीची आठवण न होईल अशी फार खबरदारी घ्यावी लागते. अशा या अत्यंत कठिण कामावर विक्रमानें मागील प्रकरणांत वाचकांच्या ओळखीचा झालेला जो सरदार त्याची योजना केली होती. हा सरदार विक्रमाचा माजी प्रधान होय. याच्यावर ही जोखमीची कामगिरी सोंपवून विक्रमानें त्याच्या मदतीला एक सेनापति ससैन्य दिला होता. या दोघांची या नवीन प्रांतावर योजना झाली. हा प्रधान विक्रमाच्या दरबारांत फार मुत्सद्दी आणि शहाणा ह्मणून गणला गेला होता. या नूतन कामगिरीवर योजना झाल्यावर त्यानें थोड्याच दिवसांत इच्छित कार्य पार पाडलें. सर्वत्र शांतता नांदूं लागली. लोक विक्रमादित्याला मान देऊं लागले, व सर्वत्र त्याच्या नांवाचा जयजयकार ऐकूं येऊं लागला.

परंतु लोभ फार वाईट आहे. हा मनुष्याच्या हातून काय काय करवील याचा नेम नाहीं! सर्वत्र शांतता झाली व तीहि आपल्या हातून, हें पाहतांच या प्रधानाच्या मनांत लोभ उत्पन्न झाला. लोकांची आपल्यावर भक्ति जडली असें पाहतांच त्याचा फायदा घ्यावा असें त्याच्या मनांत आलें. आपण पुढें होऊन कार्य करावें आणि त्याचा उपभोग राजानें घ्यावा याचा त्याला हेवा वाटूं लागला. त्यानें आपल्या मित्रमंडळीला हळुहळू आपल्या-बाजूला वळविण्याचा प्रयत्न सुरू केला व त्यांत त्याला यशहि येऊं लागलें. मुख्य अडचण सेनापतीची कायती राहिली. हळूच त्यानें त्याच्याहि मनांत आपला विषमंत्र फुंकला. पण तो त्याला रुचला नाहीं. परंतु तो शहाणा असल्यामुळें त्यानें तेथील परिस्थिति ओळखली. येथें याला उघड विरोध

करून फायदा नाहीं, हें त्याच्या लक्ष्यांत आलें व कांहीं तरी युक्ति करून याचा बेत साध्य न होण्याची तजविज केली पाहिजे असें त्यानें ठरविलें.

सेनापतीनें तेथील एकंदर परिस्थिति कळवून प्रधानाचा तेथें स्वतंत्र होण्याचा विचार राजाच्या कानांवर घातला व याला कांहीं तरी लौकरच उपाय योजण्याची विक्रमाला विनंति केली. हें सर्व कार्य त्यानें इतक्या गुप्तपणानें केलें, कीं, प्रधानाला त्याचा संशय देखील येऊं दिला नाहीं. प्रधान मात्र आपलें उद्दिष्ट सिद्ध करण्याच्या खटपटींत गुंतला होता. आपण कपट करित आहों, आपल्या धन्याशीं बेइमानी करित आहों, याचा त्याला विचारहि शिवला नाहीं. आपलें कार्य फसलें तर आपली काय अवस्था होईल, याची याला शंकाहि आली नाहीं. 'लोभमूलानि पापानि' हेंच खरें!

राजाला ही वार्ता कळतांच आपल्याला याचा सुगावा लागला असल्याची प्रधानाला शंकाहि येऊं न देतां त्यानें त्याला परत उज्जयनीस बोलाविलें. उघड वैर सुरू झालें नसल्यामुळें प्रधानानें परत जाण्याची तयारी केली. तो उज्जयनीस पोहोंचल्यावर राजानें सेनापतीच्या ह्मणण्याच्या सत्यत्वाबद्दल बरीच बारीक चौकशी केली. त्यांत त्याला त्याचें सत्यत्व तर पटलेंच, पण पाहिजे तितका पुरावा मिळाला नाहीं. ह्मणून, व या प्रधानाची पूर्वीची कामगिरी लक्ष्यांत घेऊन व त्याचप्रमाणें त्याच्याकडून आपली प्रत्यक्ष कांहीं हानि झाली नसल्यामुळें त्यानें त्याची भर दरबारांत निर्भर्त्सना केली व त्याला कामावरून दूर केलें. याला एवढीच शिक्षा पुरे, असें त्याला वाटलें. पण यांत आपण आपल्याला एक गुप्त शत्रु उत्पन्न करित आहों, हें त्याला कसें समजलें नाहीं ही आश्चर्याची गोष्ट आहे! यांत त्यानें सापाचें तोंड न ठेंचतां फक्त त्याच्या शेंपटीवर पाय देऊन त्याला जाऊं दिलें!

प्रधानहि झालेल्या अपमानाचा सूड कसा घ्यावा या विचारांत रात्रंदिवस घालवूं लागला. त्याला ही गोष्ट धड झोंप देखील येऊं देईना. पण काय करितो! त्याला उपाय सुचेना. अशा विचारांत बरेच दिवस गेले. शेवटीं, मागील प्रकरणांत सांगितलेली गोष्ट घडली. या हकीगतीवरून विक्रम हाच मागील प्रकरणांतील पदच्युत प्रधानाचा प्रबल शत्रु होय, हें वाचकांच्या लक्ष्यांत आलेंच असेल.

योग्याची आज्ञा घेऊन प्रधान निघाला व नावेची वाट पहात नदीतीरावर आपल्या सेवकासह उभा राहिला. या वेळीं दोन प्रहर रात्र झाली होती. सर्वत्र अंधकार पसरला होता. डोळ्यांत बोट घातलें तर दिसणार नाहीं, इतका निबिड अंधकार चोहोंकडे झाला होता. प्रधानाच्या मनाची अवस्था देखील याच प्रकारची होती. त्याच्या मनांत योग्याच्या आज्ञेप्रमाणें करावें कीं न करावें याचा विचार चालला होता. त्याच्या मनःपटावर सर्वत्र अंधकार पसरला होता. यावेळीं बरीच रात्र झाली होती, त्याचप्रमाणें आपल्या सूडाच्या विचारांच्या कृष्ण छायेनेंहि त्याच्या मनोभूमीवर बराच पल्ला मारला होता. या अशा अंधारांत आपल्या स्वतःला देखील पहाणें कठीण झालें होतें; त्याप्रमाणेंच सूडाच्या कृष्णविचारांत गुरफटल्यामुळें त्याला स्वतःचें देखील भान राहिलें नव्हतें. सारांश, सृष्टिप्रमाणेंच त्याच्या मनोभूमीची यावेळीं अवस्था झाली होती.

पण मोहानें त्याला सोडलें नव्हतें. पुत्रप्रेम आणि सूडाची प्रबल इच्छा यांचें त्याच्या मनोभूमीवर द्वंद्वयुद्ध सुरू झालें. दोघेहि प्रबल वीर. एकदा एकाची सरशी तर लगेच दुसऱ्याचा जय, अशी एकसारखी त्यांची धुमश्चक्री सुरू होती. कोण जिंकणार हें ठरेना! पण कोणा एकाचा तरी पाडाव होऊन दुसऱ्याची सरशी झाल्याशिवाय हें युद्ध थांबणार नव्हतें.

"काय? पुत्रवध! आणि तोहि माझ्या हातून? हर हर! यापेक्षां हा विचारच सोडावा हें बरें. एकुलता एक मुलगा आणि त्याला मी आपल्या दुष्ट हेतूंच्या सिद्धीकरितां देवीला बळी देऊं? केवढें हें घोर कृत्य! हें झाल्याशिवाय मीं आजपर्यंत जिवाशीं बाळगलेल्या विचारांची सिद्धि व्हावयाची नाहीं, असें योगीमहाराज ह्मणाले. आतां करूं तरी काय? शत्रूचा सूड उगविण्याकरितां पुत्रवध करूं, का शत्रूला शासन न करतां व्यर्थजीवित होऊन मरूं? छे! जाऊं द्या, शत्रु सुटून जाऊंद्या, पण आपल्या हातांनीं हा पुत्रवध नको! पण कां बरें? एक गेला तर दुसरा होईल! तो मरणानें मरता, तर मीं काय केलें असतें? सूड हा घेतलाच पाहिजे! भ्रष्टप्रतिज्ञ होऊन मी रौरव नरकांत जाऊं कीं काय? नाहीं! योगी महाराजांस दिलेला शब्द खोटा करणार नाहीं! शिवाय, त्याला देवीला बळी दिला तर तो पितृकार्यार्थ पतन पावल्यामुळें देवलोकास जाणार नाहीं

काय? देवी चंडिका खास खास आपल्या भक्ताला अंतर देणार नाहीं! बस्स–ठरला निश्चय! सूड हा घेतलाच पाहिजे!! पुत्रस्नेह दूर करून हें कार्य केलेंच पाहिजे!!! शत्रूवर सूड आणि पुत्राला स्वर्गवास या दोन्ही गोष्टी जर एकदम साधतात, तर मग मीं तरी असें भ्याडासारखें कां भ्यावें? मना! आतां दुसऱ्या विचारांनां तूं थाराच देऊं नकोस! सर्वत्र आणि सर्वदा सूडाच्या विचारांनांच आपल्याजवळ राहूं दे!"

अशा प्रकारचे विचार करित तो उभा आहे, इतक्यांत तेथें एक नौका आली· ते दोघेहि तींत बसतांच नौका चालू झाली. लवकरच पूर्वेकडे चंद्रोदय झाला. सृष्टि धवल वस्त्र परिधान करून हास्यमुख दिसूं लागली. वृक्षावली आणि निकट पर्वतश्रेणींची प्रसृत छाया तिच्या मुक्त केशांप्रमाणें भासली. आतांपर्यंतच्या मार्गविमूढ मंडळीला आपला मार्ग दिसूं लागला. नदीचा प्रवाह कौमुदीप्रकाशानें रजताच्या ओघासारखा वाटूं लागला. त्यावरील तरंग पाहून मनांतहि आनंदाचे तरंग उचंबळूं लागले. शांत आणि शीतल वायुबरोबर मनहि आनंदानें हेलकावे खाऊं लागेल. अशा या सृष्टिशोभेकडे पाहून आमच्या प्रधानाच्याहि मनांत या परिस्थितीनुरूप विचार येऊं लागले. आतांपर्यंत त्याच्या मनांत माजलेल्या विचारांचें काहूर शांत झालें· त्याचे विचार स्थिर झाले. योग्याच्या शब्दावरील त्याचा विश्वास दृढ होऊं लागला. आतांपर्यंत अंधकारांत गुरफटलेला त्याचा पुढील मार्ग त्याला आतां स्पष्ट, दिसूं लागला. इतकें जरी त्याच्या मनाचें सृष्टीच्या सांप्रत रूपाशीं साम्य होतें, तरी एका गोष्टींत मात्र त्यांत अत्यंत विरोध होता. सृष्टि शुभ्रवर्ण झाली होती, तिच्यापासून सर्वांस सुख व आनंदच होत होता; पण याचे विचार कृष्णस्वरूपी आणि प्रत्यक्ष स्वतःच्या पुत्राचा घात आणि सर्वजनमनोहारी व परहितैकतत्पर विक्रमादित्याचा नाश करून लोकांनां ताप देणारे असे होते!

नौका परतीराला पोहोंचली. प्रधान आणि त्याचा हुजऱ्या नौकेंतून उतरून घराकडे वळले. या वेळीं नगरींत सर्वत्र शांत होतें. सर्व नगरवासी निद्रासुखांत निमग्न होते. पण आमचे प्रधानजींचें मन मात्र शांत नव्हतें. नदीवरील शांतवायूनें त्यांनां क्षणभर शांति मिळाली, पण ती क्षणभरच! त्याची

पुणे म... ४३७ ... नाराम... दा. क्र. १५३४

व मानसिक शांतीची आतां कायमचीच फारकत झाली होती. दुष्ट विचारांचा व शांतीचा एकत्र वास होणेंच अशक्य, मग तीं याच ठिकाणीं एकत्र कशीं नांदतील बरें? घराचा विचार त्याच्या मनांत येण्याचाच अवकाश, त्याच्या मनांत विचारांनीं पुनः उचल केली. आपण विचार ठरविला खरा, पण आपला पुत्र व पत्नी आपल्या या दुष्ट हेतूला अनुकूल कशीं होणार? हा विचार एकदम त्याच्यापुढें दत्त म्हणून उभा राहिला. आतांपर्यंत त्याला हा विचार अगदींच शिवला नव्हता. "आपण एक तयार झालों, तरी मरण हें कोणाला तरी प्रिय आहे काय? मग आपण आपला शब्द खरा कसा करणार व सूड कसा घेणार? अरेरे! आपण आतांपर्यंत अगदींच फसलों! पत्नीपुत्राचा विचार घेतल्याशिवाय आपण योग्याला शब्द देण्यांत फारच मूर्खपणा केला! आतां कसें व्हावें? पण त्यांचा विचार घेतला असता तरी काय होणार होतें? आपला मार्ग फारच बिकट आहे!"

हा विचार त्याच्या मनांत येतांक्षणींच त्याची कंबरच खचली. त्याचें पाऊल पुढें पडेना. परत जाऊन आपला मूर्खपणा कबूल करून योगी महाराजांची क्षमा मागावी, ह्मणून तो परतण्याला तयार झाला. पण "छेः, काय हा अविचार! एवढा रचलेला व्यूह आणि आलेली संधि व्यर्थ घालविणें ह्मणजे तरी मूर्खपणाच नव्हे काय? कोणता तरी एक मूर्खपणा आपल्या पदरीं येणार. मग केला आहे तोच मूर्खपणा काय वाईट? युक्तियुक्तीनें पुत्राचें मन वळविलें ह्मणजे झालें. माझ्या हातून दुष्ट विक्रमाचें शासन व्हावें अशी देवाचीच इच्छा दिसते आहे. नाहीं तर या योगी महाराजांच्या सहाय्याचा अकल्पित योग कां बरें जुळून येता? मग देवच माझ्या पुत्राचें मन वळविणार नाहीं काय? मी निमित्त मात्र आहें. आणि यदाकदाचित् तो माझ्या मताला अनुकूल नच झाला, तर मी त्याला फसवून आपलें कार्य पार पाडीन! या कपटव्यूहांत इतका लांब येऊन आतां थोडक्याकरतां परतूं काय? कांहींहि होवो, आतां माघार ह्मणून घ्यावयाची नाहीं! पत्नीची समजूत करीन, आशा दाखवीन, विनवीन, पायां देखील पडेन! एवढ्यानेंहि जर ती ऐकणार नाहीं, तर तिला तशीच टाकून देईन! कांहीं वेळ शोक करील आणि मग आपोआपच विसर पडला ह्मणजे

थांबेल. मला शिव्याशाप देईल–देईना बिचारी ! आतां एकाचे कीं दोघांचे शिव्याशाप मला घ्यायचे आहेत, ह्मणून मी त्यांची काळजी करूं! आपलें कार्य साधलें ह्मणजे झालें, इतर कोणत्याहि गोष्टीची मला पर्वा नाहीं!" अशा प्रकारचे विचार करित करित तो घरीं येऊन पोहोंचला.

आतांपर्यंत प्रधानाबरोबर गुपचूप चाललेला त्याचा हुजऱ्या शांत दिसत होता. त्याच्या मनांत कांहीं विचार चालले होते, किंवा त्याला योग्याच्या झोंपडींतील संवाद ऐकूंच आला नव्हता ? मनुष्याच्या स्वाभाविक प्रवृत्ती-प्रमाणें गुप्त गोष्ट कान देऊन ऐकण्याची कामगिरी त्यानेंहि बजावली होती. पण तो चाणाक्ष असल्यामुळें त्यानें झोंपेचें सोंग घेऊन आपल्या धन्याला संशय देखील येऊं दिला नाहीं. सर्व संवाद जरी त्याला ऐकूं आला नव्हता, तरी जेवढा कांहीं त्यानें ऐकिला, तेवढ्यावरून आपल्या राजाच्या विरुद्ध यांचे बेत चालले आहेत व यांच्या कृत्याचा रोंख आपल्या राजाच्या नाशाला कारण होणार, हें त्यानें ताडलें होतें. शिवाय, अमावास्येच्या प्रहर रात्रीं योग्यानें प्रधानाला बोलाविलें असल्यामुळें यांच्या गुप्तकृत्याचा तोच दिवस, अशी त्याची खात्री झाली होती. आपल्या राजावर संकट येणार, ही कल्पनाच त्याला असह्य झाली व तेंहि खुद्द आपल्या धन्याकडून, हें पहातांच तर त्याला धन्याचा अत्यंत राग आला. परंतु उतावळेपणा करूं नये, असा त्यानें पोक्त विचार केला. आपल्या धन्यावर संकट न आणतां राजाचें संकट कसें निवारण करावें, हें त्याला सुचेना. तो वरून जरी शांत दिसत होता, व प्रधानाच्या मागून चालला होता, तरी त्याचें मन याच विचारांत गुंतलें होतें. शेवटीं त्याचा कांहीं तरी निश्चय झाला असें दिसेल. घरीं पोहोंचल्यावर हा आपल्या निजावयाच्या जागीं गेला व आंथरूण पसरून त्यावर बसला, तेव्हां आपल्याशींच पुटपुटला "बस्स—असेंच केलें पाहिजे ! आपण उद्यां धनीसाहेबांची चाकरी सोडणार. अशा दुष्ट धन्याचें अन्न खाऊन शरीर पोसण्यापेक्षां मेलेलें काय वाईट ! ही गोष्ट आपण तर हर प्रयत्नानें खुद्द राजेसाहेबांस सांगणार. आपलें काम आपण करावें, पुढची काय पाहिजे ती तजवीज ते करतील. देवाला सर्वांची काळजी आहे, तोच माझी ही काळजी

दूर करील. राजकार्य केलेंच पाहिजे! चाकरींत राहून बातमी देणें ह्मणजे धन्याशीं बेइमानी होईल. त्यापेक्षां चाकरी सोडावी हेंच उत्तम! विषवृक्षाला फळ येऊं देऊन उपयोग नाहीं! रोपें आहे तोंवरच तो नाहींसा केला पाहिजे! देवा, काय हें जग? या जगांत शत्रूशिवाय कोणीच नाहीं काय? राजा हा दुष्टांचा शत्रु, तर हा माझा दुष्ट धनी त्याचा शत्रु! आणि मी या कटाची बातमी राजाला देणार ह्मणून मी याचा शत्रु! मलाहि या जगांत कोणी तरी शत्रु असेलच! असो बिचारा. जगाच्या नियमाबद्दल काळजी कशाला? हे दयासिंधू! माझी ही कामगिरी तुझ्या घरीं रुजू होऊंदे. हे कृपाघना! या दीन पतितावर आपल्या कृपेची छाया सदोदित असूं दे, हीच तुला प्रार्थना आहे!"

अशा प्रकारें मनाचा निश्चय करून ईशस्मरण करित तो निद्रेच्या स्वाधीन झाला.

---

## प्रकरण ३ रें.

## गौप्य कीं गौप्यस्फोट!

राजवाड्याच्या पार्श्वभागीं 'विहारवाटिका' नांवाचा एक लहानसाच पण सुंदर असा राजा विक्रमाचा आवडता बगीचा होता. कांहीं काम नसलें ह्मणजे राजा येथें बसून मनाची करमणूक करित असे. बागेच्या चाऱ्ही दिशांस चार विहिरी होत्या, व त्यांतील पाणी मोटांनीं काढून मोठमोठ्या पाटांनीं तें झाडांस देण्यांत येत असे. प्रत्येक ताटव्यास पाणी पोंचावें ह्मणून लहानलहान पाट बांधलेले होते, त्यांतून स्वच्छ पाणी वाहत असतां फारच सुंदर दिसे. अशाच एका पाटाच्या कांठीं एक आम्रवृक्ष असून त्याच्या तळीं बसण्याकरतां एक शिलास्थल होतें.

प्रातःकाळची वेळ. सहस्ररश्मी सूर्यनारायण नुकताच उदयाचलावर आला होता. त्याचीं रक्तवर्ण किरणें उंच अशा वृक्षाग्रांवर पडून त्यांच्यावर जणूं सुवर्णरस वर्षण करित आहेत, असा भास होत होता. आतांपर्यंत निद्रेच्या आधीन असलेला प्राणिवर्ग जागृत होऊन आपापल्या व्यवसायाला लागल्यामुळें सर्वत्र जीवनकला दिसत होती. निद्रेमुळें सर्व श्रम परिहार होऊन प्रत्येक प्राणी उत्साहभरित दिसत होता. सर्वत्र आनंद नांदत होता.

अशा वेळीं एखाद्या दुःखी मनुष्याला देखील क्षणभर आपल्या दुःखाचा विसर पडावयाचा. मग ह्या 'विहारवाटिकें'त जर तो अशा वेळीं आला तर त्याला खात्रीनें आनंद झालाच पाहिजे. असें असतां, मनाची अस्वस्थता हरण करणाऱ्या ह्या रमणीय वेळीं आणि सुरम्य 'विहारवाटिकेंत' आम्रतलींच्या शिलातलावर बसून समोरून झुळझुळ वाहत जाणाऱ्या जलप्रवाहाकडे पाहत बसलेला विक्रम असा चिंतामग्न कां बरें दिसतो आहे ? तो कसला तरी विचार करतो आहे आणि जवळ कोणी नसल्यामुळें आपल्याशींच कांहींतरी पुटपुटतो आहे.

" काय बरें या स्वप्नाचा अर्थ असावा ? प्रत्यक्ष यम पुढें येऊन उभा राहिला तरी देखील भिणारा मी नव्हें ! मग या स्वप्नसृष्टींतल्या मारेकऱ्याला बघून असा कां बरें दचकलों ? रात्रीच्या चतुर्थ प्रहरांत स्वप्न पडलें तर त्याचें फल अगदीं जवळ असतें ह्मणतात; मग माझें मरण जवळ येऊन ठेपलें कीं काय ? पण असा हा गुप्तपणानें माझ्या मानेवर सुरी ठेवणारा दुष्ट मनुष्य कोण बरें असावा ? काय तें त्याचें विक्राळ स्वरूप ! सर्वांग कृष्णवस्त्रानें झांकून टाकलेलें ! हातांत एक नग्न कराल करवाल घेऊन ती आतां तो माझ्या मानेवर ठेवणार इतक्यांत मीं भीतीनें एक किंकाळी फोडली आणि एकदम जागा झालों. डोळे उघडून पाहातों, तों, माझ्या खोलींत कोणी नाहीं. मग हें सारें स्वप्न असें वाटून माझ्या भित्रेपणाबद्दल माझें मलाच हंसूं आलें ! हें स्वप्न खरें, पण हें काय सुचवितें ? हें स्वप्न पाहिल्यापासून माझें मन फारच अस्वस्थ झालें आहे. माझें मरण खरोखरच जवळ आलें आहे कीं काय ? आणि तेंहि गुप्त मारेकऱ्याच्या हातून ! वराहमिहिर ज्योतिष्याला हें स्वप्न सांगून याचा अर्थ काय तो विचारला पाहिजे, आणि याच्या उपशमनाकरतां योग्य ती व्यवस्थाहि पण केली पाहिजे. तापलेलें मस्तक शांत व्हावें ह्मणून या वाटिकेंत मी एकटाच येऊन बसलों, पण काय उपयोग? हे बाह्योपचार मानसिक व्यथेला काय करणार ? या स्वप्नाच्या शांतीची तजवीज लवकर केलीच पाहिजे, त्याशिवाय माझ्या मनाला स्वस्थता मिळणार नाहीं."

अशा प्रकारें विचार करित आणि आपल्याशींच बोलत असा चिंतामग्न राजा त्या शिलातलावर बसला असतां कोणी तरी तेथें आल्याची त्याला चाहूल लागली. कोण आहे ह्मणून पाहण्याकरतां त्यानें मान वर केली, तों आपादमस्तक शुभ्र पोषाख केलेला एक भव्य पुरुष आपल्याजवळ येऊन उभा असलेला त्याला दिसला. हा कोण, तेथें कशाकरतां आला, आणि केव्हां आला, हें त्याला कांहीं ठाऊक नव्हतें. हा पुरुष मात्र विक्रमाच्या समोर उभा राहून त्याच्याकडे एकाग्र दृष्टीनें पहात होता. राजानें मान वर करतांच त्यानें लवून मुजरा केला. त्याचा स्वीकार करून राजा ह्मणाला "तूं कोण आहेस ? आणि येथें कशाकरतां आलास ?"

तो पुरुष ह्मणाला "महाराज! मी आपल्या माजी वीरोत्तंस प्रधानजींचा एक हुजऱ्या असून आपल्याशीं कांहीं गुप्त काम असल्यामुळें येथें आलों आहें."

'गुप्त काम' हे शब्द ऐकतांच विक्रमाला आपल्या स्वप्नाची आठवण झाली, आणि हाच आपला शत्रु कीं काय असा त्याला संशय आला. पण तो बाहेर न दाखवितां तो पुढें ह्मणाला " कोणतें काम ? "

"मी आपल्याला एक फार महत्त्वाची पण गुप्त बातमी सांगणार आहें."

"अशी कोणती बातमी आहे! सांग लवकर."

राजाची आज्ञा होतांच आपण परवानगीशिवाय एकदम वाटिकेंत आल्याबद्दल क्षमा मागून त्यानें योग्याच्या झोंपडींत ऐकलेली गोष्ट राजाला सांगितली. ती ऐकून राजाला फार आश्चर्य वाटलें व वीरोत्तंस प्रधानाचा फार राग आला. त्या रागाच्या सपाट्यांत एकदम जाऊन त्याचा प्राण घ्यावा व त्याचे सर्व बेत जागच्या जागीं नाहींसे करावे, असा त्याच्या मनांत विचार येऊन त्यानें 'तरवार!' अशी गर्जना केली. ती ऐकून तो पुरुष ह्मणाला "महाराज! अशी घाई कां ? प्रधानजींला ही बातमी आपल्याला कळल्याचें मुळींच माहीत नाहीं. ते आपल्याला निर्धास्त समजून स्वस्थ आहेत. ते वाटतील तेव्हां आपल्या हातीं लागतील."

त्या पुरुषाचे हे शब्द ऐकून राजा शुद्धीवर आला. मग त्यानें "अमावास्या कधीं ?" ह्मणून प्रश्न केला. त्या पुरुषानें "आजच अमावास्या!" असें सांगितलें. तें ऐकून "ठीक आहे," असें म्हणून राजानें त्याला जाण्याची परवानगी दिली.

जाण्यापूर्वीं त्या पुरुषानें आपल्या धन्याची गुप्त गोष्ट कां सांगितली हें सांगून आपण प्रधानजींच्या चाकरीला रामराम ठोकला असल्याचें राजाला कळविलें. "यापुढें दासाच्या हातून आपल्या पायांची सेवा व्हावी," अशी त्यानें त्याला विनंति केली. विक्रमानें त्याला "उद्यां पुन्हा येऊन भेट," ह्मणून सांगितलें व रजा दिली.

तो गेल्यावर त्याच्या शब्दांवर कितपत विश्वास ठेवावा याबद्दल राजाला शंका आली. पण रात्रीच्या स्वप्नाशीं याचा बराच पडताळा मिळतो, हें लक्ष्यांत येतांच त्याचा त्या पुरुषाच्या शब्दांवर विश्वास बसूं लागला. पण आपण आपली खात्री करून घेतल्याशिवाय कांहीं करतां कामा नये, असें त्यानें ठरवून आज मध्यरात्रीं योग्याच्या झोंपडींत काय प्रकार होतो हें प्रत्यक्ष पाहण्याचा निश्चय केला. हा आपला बेत त्यानें कोणालाहि कळविला नाहीं. प्रत्यक्ष काय तें बघून मग पुढें प्रधानाला काय तें शासन करावें हेंच योग्य, असा त्याच्या मनाचा ठाम विचार होतांच तो बागेंतून उठून राजवाड्यांत जाण्यास निघाला. आतां सूर्य बराच वर आला होता. आतां विक्रमाचें मन प्रधान, योगी आणि त्यांचा व्यूह यांच्याच विचारांत गुंग झालें. त्याला एकदा रात्र केव्हां होते व या सर्व गोष्टींचा उलगडा केव्हां होतो याचीच उत्कंठा लागून राहिली.

रोजच्या कार्यक्रमांत दिवस उगवला केव्हां व गेला केव्हां हें देखील ज्याला कळत नसे, त्याच विक्रमाला, अति उत्सुकतेमुळें आजचा दिवस संपतां संपेना! दिवस रोजच्याप्रमाणेंच चालला होता; पण तो राजाला त्याच्या मानसिक स्थितीमुळें फार मोठा वाटूं लागला. दुपार झाली, सायंकाल झाला, अंधार पडला, एक घटका रात्र झाली आणि आमचे विक्रमराज योग्याच्या झोंपडीकडे जाण्याची तयारी करूं लागले.

अमावास्येची रात्र! अंधार मी ह्मणतो! कृष्णकृत्यांशीं या निबिड अंधकाराचें किती तरी साम्य! आपलीं दुष्ट कृत्यें अंधारांत केलीं ह्मणजे तीं कोणाला कळणार नाहींत ह्मणून दुष्ट लोक अशाच वेळीं तीं करित असतात. गरीब बिचारे! हे लोक मनाची समजूत करून स्वतःला फसवित असतात. लोकांच्या दृष्टिपथांतून त्यांचीं गुप्त कृत्यें सुटलीं, तरी तीं देवापुढें काय गुप्त

राहणार आहेत? पण हा विचार त्यांनां शिवतच नाहीं. त्यांनां वाटत असतें कीं, लोकांनीं पाहिलें नाहीं ह्मणजे झालें! कांहीं वेळपर्यंत या दुष्ट लोकांची या जगांत चलतीहि झालेली आपल्यास दिसते, आणि आपणहि फसतों. दुष्ट कृत्यें करून जर चलती होते, आणि सत्पथानें चालणारे लोक जर दुःख भोगतांना दिसतात, तर आपणहि सन्मार्गानें चालण्याची काळजी कां घ्या? दुष्ट कृत्यें केल्यास काय हरकत आहे? तीं कोणालाहि कळूं न देतां गुप्तपणें पार पाडलीं ह्मणजे झालें, असा आपल्या मनाला मोह उत्पन्न होतो. पण जरा सूक्ष्म निरीक्षण केल्यास हा केवळ भ्रम आहे, आपल्या बऱ्यावाईट कृत्यांप्रमाणेंच आपल्याला भोग भोगावा लागतो; दुष्टांचें वैभव क्षणिक आहे; आणि ईश्वराचें भय बाळगून सन्मार्गानें चालणाराच अंतीं विजयी होतो, हें आपल्याला दिसून येतें. रंगभूमीवर राजाची भूमिका घेणाराला जरी सेवकाची भूमिका घेणारा लवून मुजरा करतो, तरी पडद्यामागें रंगभूमीवरील सेवक तो धनी व राजा तो सेवक असतो, ही खरी स्थिति आपणांस कोठें दिसते? रंगभूमीवरील देखावा पाहून आपण फसतों. पण रंगभूमीवरील वैभव क्षणिक असून, खरी स्थिति याच्या अगदीं उलट आहे, हें आपण ध्यानांत घेत नाहीं. संसार ही रंगभूमी असून आपण सर्व तिच्यावरील पात्रें आहों. आपण आपल्या कृत्यांप्रमाणें आपली खरी स्थिति तयार करित असतों, असें जे कवि ह्मणत असतात तें किती यथार्थ आहे बरें?

विक्रमादित्य गुप्तपणें योग्याच्या झोंपडीजवळ तर येऊन पोहोंचला. कोणालाहि न कळवितां हा या वेळीं काळ्या रंगाच्या कपड्यांनीं आपलें सर्वांग झांकून घेऊन एकटाच तेथें जाऊन बाजूस उभा राहिला होता. त्यानें आपल्याबरोबर एक तरवार मात्र घेतली होती व तिच्यावरच त्यानें आपल्या संरक्षणाचा सर्व भार टाकला होता. स्वस्थपणानें उभा राहून तो आंत काय चाललें होतें तें एकाग्र मनानें अवलोकन करित होता.

आंत योगी दर्भासनावर बसला होता, परंतु आतां त्याचें स्वरूप पूर्वींप्रमाणें शांत नसून फारच उग्र होतें. त्याचा जटाभार पूर्वींप्रमाणें बांधलेला नसून नुकतेंच स्नान केलें असल्यामुळें त्यानें तो पाठीवर मोकळा सोडला होता. सर्वांग भस्मानें माखलें असून छातीवर, मनगटांवर व दंडांवर शेंदुराचे पट्टे

मराठी ग्रंथसंग्रहालय

ओढले होते. कपाळावर शेंदुराचा मळवट भरला असून त्यावर काजळाचा त्रिपुंड्र लाविला होता. त्याचे डोळे लालभडक दिसत होते. त्याच्या एका हातांत कुबडी व दुसऱ्या हातांत रुद्राक्षमाळेऐवजीं एक सिंदूरचर्चित त्रिशूळ होता. त्याच्यासमोर थोड्या अंतरावर सिंदूरवर्ण एक अष्टभुजा देवीची मूर्ति मांडली होती. वीरोत्तंस प्रधान त्याच्यासमोर बसला होता व देवीपुढें एका नरबलीचें शव पडलें होतें. हाच त्याचा एकुलता एक मुलगा होता काय? हर! हर!! मनुष्य काय करणार नाहीं? स्वार्थाकरितां प्रत्यक्ष पोटच्या मुलाचा देखील जीव घेण्यास त्याला शंका वाटली नाहीं! माया, ममता त्यानें पार झुगारून दिली! इतका निष्ठुर होणारा हा त्याचा बापच काय? होय! सृष्टिक्रमाप्रमाणें ह्मणावयाचें असल्यास हा त्याचा बापच! पण कृतीवरून ठरवावयाचें असल्यास याला त्याचा काळ ह्मटलेलेंच जास्त योग्य होईल. वीरोत्तंस कांहीं वेळ योग्यापुढें हात जोडून बसल्यावर योग्यानें आपल्या हातांतील त्रिशूळ जोरानें जमिनींत खुपसून नंतर तो कांहीं शब्द पुटपुटला. ते कोणालाच ऐकूं येण्याजोगे नव्हते व कदाचित् ऐकूं आले असते तरी देखील त्यांचा अर्थबोध झाला असता किंवा नाहीं याचा संशयच होता. पुटपुटणें झाल्यावर त्यानें समोरच्या तबकांतून एक फूल व एक बिल्वपत्र उचलून वीरोत्तंसाच्या हातीं दिलें व त्याला तें फूल देवीच्या मस्तकावर ठेवून मग तेथें पडलेल्या शवाच्या छातीवर वीरासन घालून बसून तें बिल्वपत्र त्या शवाच्या मुखांत घालावयास सांगितलें. त्याप्रमाणें करण्यास वीरोत्तंस योग्यापुढून उठला.

या वेळीं प्रधानहि स्नान करून आलेला होता. कमरेभोंवतीं वेष्टिलेल्या ओल्या धोतराशिवाय त्याच्या अंगावर दुसरें वस्त्र नव्हतें. त्याच्या मस्तकावरहि शेंदुराचे व काजळाचे त्रिपुंड्राकृती पट्टे होते. एकंदरींत रौद्र कर्मानुकूल अशा रौद्र वेषानेंच योगी व त्याचा शिष्य प्रधान हे त्या ठिकाणीं वावरत होते.

योग्याच्या आज्ञेप्रमाणें प्रधानानें तें पुष्प देवीच्या मस्तकीं वाहिलें व तो पुत्राच्या शवावर वीरासन घालून बसला. आपल्याच हातांनीं त्यानें त्याचा जीव घेतला होता खरा, पण त्याच्या निर्जीव मुखमंडलाकडे पाहतांच

त्याच्या डोळ्यात अश्रु उभे राहून कंठ भरून आला. योग्याचें त्याच्याकडे लक्ष्य होतेंच. "शोक करशील किंवा अश्रुबिंदु जमिनीवर पडूं देशील तर सर्व खटाटोप व्यर्थ होईल!" अशी त्यानें धमकी देतांच प्रधानानें दुःखाचा हुंदका आंतल्या आंत दाबला, व डोळ्यांतील पाणी हातानें पुसून टाकलें. एखाद्या पाषाणहृदयी तिऱ्हाइताला देखील हा हृदयद्रावक प्रसंग पाहून भडभडून आलें असतें. मग तो तर प्रत्यक्ष बापच ! कितीहि निष्ठुर झाला ह्मणून काय झालें? योग्यानें सांगितलें "वेळ घालवूं नको! लवकर आटप!"

योग्याची आज्ञा होतांच प्रधानानें तें बिल्वपत्र शवाच्या मुखांत घातलें, व देवीकडे एकाग्र दृष्टीनें बघत तो क्षणभर स्तब्ध बसला. मग योग्यानें त्याला शवापासून दूर होण्यास सांगितलें. तो दूर होतांच योगी शवाजवळ गेला. एका पायावर उभा राहून त्यानें हात जोडले व डोळे मिटून तो देवीपुढें उभा राहिला. त्याच्या हालणाऱ्या ओंठांवरून तो कांहीं तरी पुटपुटत असावा असें दिसलें, पण शब्द मात्र ऐकूं येत नव्हते. मग त्यानें डोळे उघडले व आपली कुबडी शवाच्या मुखावरून फिरवून जमिनीवर आपटली आणि "बोल!" असें तो जोरानें ह्मणाला. शवाचे ओंठ हालूं लागले, योगी व त्याचा शिष्य लक्ष्य देऊन ऐकूं लागले, पण शवाच्या मुखांतून शब्दोच्चार होईना. तेव्हां योगी फिरून आपल्या अग्निकुंडांतील आसनावर जाऊन बसला. त्यानें पुरलेला त्रिशूळ उपटून काढला, कांहीं आपल्याशींच पुटपुटला व पुन्हा पूर्वींप्रमाणेंच त्यानें तो त्रिशूळ जमिनींत पुरला. नंतर एक पुष्प व एक बिल्वपत्र शिष्याचे हातीं देऊन पूर्वींप्रमाणेंच त्याला करण्यास सांगितलें. मग आपण शवाजवळ येऊन उभा राहिला व मागच्याप्रमाणेंच पुनः सर्व कृति करून शवाला "बोल!" म्हणून पुनः आज्ञा केली. पूर्वींप्रमाणेंच त्याचे ओंठ हालले, पण शब्द ऐकूं येईना. तेव्हां आणखी पुन्हा एकदा त्यानें ती सर्व क्रिया केली, आणि "बोल! घाबरूं नको! स्पष्ट बोल!" अशी त्यानें शवाला पुनः एकदा आज्ञा केली. तरी शवाला वाचा फुटेना. तेव्हां तो शिष्याकडे वळून ह्मणाला "पहा, हा बोलूं इच्छितो आहे, पण काचरतो आहे. याचें काय बरें कारण असावें?"

 १३७ ब, नारायण पेठ, पुणे ७२

ही सर्व क्रिया विक्रम लक्ष्य लावून पहात होता. त्यानें आपण चोरून उभें असल्याची चाहूल देखील लागूं दिली नाहीं. पुढें काय होतें इकडे त्याचें लक्ष्य होतें. पण योग्याला आपल्याला अनिष्ट अशी कोणी तरी व्यक्ति आपली क्रिया चोरून बघत असल्याचा संशय आला. त्याच्या शिष्याला तर पोरपरी पोर गेला आणि कार्यसिद्धि तर होत नाहीं, हें पाहून फारच वाईट वाटलें. योग्याच्याहि तें लक्ष्यांत आल्यावांचून राहिलें नाहीं. त्यानें त्याला सांगितलें "बेटा! घाबरूं नकोस. हा बलि बोलत नाहीं याचें कारण आपल्या क्रियेंत कांहीं तरी चूक आहे हें नसून आपल्याला अनिष्ट अशा कोणातरी व्यक्तीचे आपल्याकडे डोळे लागलेले आहेत हें खास आहे! त्या व्यक्तीचा अडथळा दूर केला कीं आपलें कार्य निर्विघ्नपणें पार पडणार, यांत मुळींच संशय नाहीं. हा पहा मी आपला अडथळा दूर करतों!" असें ह्मणून योगी आपल्या आसनावर जाऊन बसला व कांहीं मंत्र म्हणत पूजापात्रांतील अक्षता चारी बाजूस फेंकून म्हणाला "माझ्या परवानगी-वांचून जो कोणी आमची क्रिया पहात असेल तो तत्काळ श्वानरूप होवो!" योगानें असे शब्द उच्चारतांच बिचारा विक्रम श्वान झाला व योग्याच्या झोंपडीच्या दारांत जाऊन बसला. काय त्याच्यावर हा अकल्पित प्रसंग! एक संकट टाळण्याकरतां प्रयत्न करतांना त्याच्यावर हें दुसरेंच अरिष्ट कोसळलें! गरीब बापडा योग्याच्या शापाला बळी पडला!

श्वान दारांत येऊन बसलेला पाहतांच त्यांची क्रिया पूर्ण झाली. त्यांनां पाहिजे होतें तें तें शव बोललें व पुढील कार्याची वाटाघाट करित योगी आणि त्याचा शिष्य हे झोंपडीचें दार लावून एकांतांत बसले.

बा विक्रमा! आतां पुढें तुझें होणार तरी काय?

---

## प्रकरण ४ थें.

## वराहमिहिर.

विक्रम नाहींसा झाल्याचें कळतांच सर्व राजवाड्यांत एकच हाहाकार उडाला. एकाएकीं व कोणासहि न सांगतां राजा कोठें गेला असावा याचा सर्वांसच फार अचंबा वाटला. प्रत्येकानें शक्य तेथें व शक्य त्या तऱ्हेनें त्याचा शोध केला, पण कोणासच त्याचा सुगावा लागेना.

विक्रम कोठें शिकारीस गेला ह्मणावा, तर असा गुप्तपणें कां गेला? त्यानें बरोबर लवाजमा कसा नेला नाहीं? बरें, लवाजमा नाहीं तर नाहीं, पण सांगून तर गेला पाहिजे. तेंहि नाहीं! आपल्या नेहमींच्या वहिवाटीप्रमाणें गुप्तपणानें प्रजाजनांची खरी स्थिति पहावयास गेला म्हणावें, तर इतका वेळ कां लागला? एक दिवस गेला, दोन दिवस झाले, तरी राजा परत येईना हें पाहून तर त्याच्या राणीवशाची व मंत्रिमंडळाची पांचांवर धारण बसली. शोध लावण्याचे सर्व प्रयत्न हरले. आतां काय करावें हें कोणासच सुचेना. ही बातमी गुप्त न राहिली तर सर्व राज्यभर हाकाटी होऊन सर्वत्र बेबंदशाही होण्याची भीति वाटूं लागली. वाट तरी किती वेळ पहावयाची? काय करावें हें कोणासच सुचेना!

अशा बिकट स्थितींत एकच उपाय राहिला. त्याच्या नूतन प्रधानानें सर्व मंत्रिमंडळाची सभा बोलावली व सर्वांनीं एकत्र जमून याचा विचार आरंभिला. पण ते विचार तरी कसला करणार? सर्वांची एकच अवस्था झालेली; कोणासच त्याचा शोध लावण्याचा उपाय सुचेना. शेवटीं प्रधानानें सर्वांस ही गोष्ट गुप्त ठेवण्यास सांगून राजेसाहेबांची प्रकृति अस्वस्थ असल्याची सर्वत्र द्वाही फिरविली. अर्थात्, यामुळें दरबार भरवून राजेसाहेब प्रजाजनांचीं गाऱ्हाणीं कां ऐकत नाहींत याच्याबद्दल लोकांत तर्कवितर्क होणें बंद झालें. राणीवशाचें कसें तरी समाधान करून सर्व मंत्रिमंडळाच्या मदतीनें राजाच्या शोधाचें काम सुरू ठेविलें व प्रधानच सर्व राज्यकारभार राजेसाहेबांच्या नांवानें आपल्या जबाबदारीवर चालवूं लागला.

विक्रमाच्या पदरीं जीं नऊ रत्नें होतीं त्यांत वराहमिहिर हा प्रख्यात ज्योतिषी होता. त्याला प्रधानानें बोलावून आणून आपल्या ज्योतिषज्ञानानें राजाचा शोध लावण्याची विनंति केली. त्यानें लगेच कागद लेखणी घेऊन त्यावर कांहीं आकृति काढल्या व गणित करून राजाचा शोध लावला. नदीच्या दक्षिणतीरावर असलेल्या योग्याच्या झोंपडीच्या दारांत बसलेला श्वान हाच आपला हरवलेला राजा आहे, असें त्यानें ज्योतिषज्ञानानें ओळखलें. हें ऐकून प्रधानजींस व त्यावेळीं हजर असणाऱ्या इतर मंत्र्यांस फार आश्चर्य वाटलें. याचें कारण काय? व हें कल्पनानीत शरीरांतर

मराठी ग्रंथसंग्रहालय

कसें झालें, याचा त्यांनां तर्क होईना. त्यांनीं वराहमिहिरास याचें कारण विचारलें, पण त्यालाहि तें सांगतां येईना. तो श्वान झाला ही गोष्ट खरी! त्याला कारण कांहींका असेना, त्याबद्दल तर्कवितर्क करण्यांत काय हांशिल! त्याची तेथून सुटका करणें हें पहिलें काम. पण तें करावें कसें? व कोणीं करावें? त्याचा शोध लावणाऱ्या वराहमिहिराशिवाय दुसरा कोण हें काम करणार? त्याच्यावरच हें काम करण्याची जबाबदारी येऊन पडली आणि त्यानें ती पत्करिलीहि.

राजाची सुटका केली पाहिजे खरी, परंतु ती कशी करावी हा वराहमिहिरास प्रश्नच येऊन पडला. तो एवढा जाडा ज्योतिषी, परंतु हें काम कसें पार पडेल याची त्याला चिंता लागली. हें काम आपल्या शिरावर घेतलें व तो घरीं गेला. बराच वेळ त्यानें विचार केला, तरी त्याला उपाय सांपडेना. वेड्यासारखी स्थिति होऊन तो आपल्या खोलींत येरझार करूं लागला. अशा रीतीनें फिरत असतां त्याला एक युक्ति सुचली व फार आनंद झाला.

पण त्याचा हा आनंद फार वेळ टिकला नाहीं. या कार्यांत आपल्या दोघां मुलांवर जीवावरचें संकट येणार हें पाहतांच त्याचा चेहरा एकदम उतरला. काय करावें हें त्याला सुचेना. तो पुन्हा फेऱ्या घालूं लागला. इतक्यांत त्याचा ज्येष्ठ पुत्र तेथें आला. त्याला पाहतांच वराहमिहिराच्या डोळ्यांत आसवें आलीं.

बापाची ही अवस्था पाहून मुलगा म्हणाला “ बाबा! आज हें काय? आपल्याला कोणतें दुःख होत आहे? ”

मुलाचे हे प्रेमाचे बोल ऐकतांच वराहमिहिर गहिंवरला. त्याला आपला विचार सांगावा कीं नाहीं हें त्याला सुचेना. आतां नाहीं घटका भरानें याला हें सांगावें लागणार, मग आतांच कां न सांगा? असा विचार करून तो बोलूं लागला, पण जीभ अडखळूं लागली, स्पष्ट शब्द बाहेर पडेना.

ही बापाची चमत्कारिक स्थिति पाहून मुलाला फार आश्चर्य वाटलें. बाबा आज हें काय करित आहेत, हेंत्याला समजेना. बाबांवर आज कोणतें संकट ओढवलें हें समजून घेण्याची त्याला फारच उत्सुकता झाली.

तो ह्मणाला "बाबा! आपलें दुःख मनांत ठेवूं नका. मला कळूं द्या. माझ्याकडून त्याला कांहीं उपाय होण्यासारखा असेल तर सांगा. आपण सांगाल ती कामगिरी करण्याला मी एका पायावर तयार आहें."

पितृभक्त मुलाचे हे शब्द ऐकून वराहमिहिराला फार संतोष झाला. आपली सर्व शक्ति एकवट करून तो ह्मणाला "बेटा! आपल्या कृपाळु राजावर भयंकर संकट आलें आहे. तो एका मांत्रिकाच्या झपाट्यांत सांपडून श्वान झाला आहे. त्याला तेथून सोडविण्याची कामगिरी माझ्याकडे आली आहे. पण—"

"पण काय? काय असेल तें सांगा. माझ्याकडून कांहीं होण्यासारखें असेल तर कळूं द्या. राजाच्या उपयोगीं पडण्यापेक्षां दुसरी कोणती आनंदाची कामगिरी आहे!"

"होय, तेंच मी आतां सांगणार आहें. या कामीं मला तुझें आणि तुझ्या लहान भावाचें सहाय्य पाहिजे आहे. राजकार्य करण्यांत मला देखील फार संतोष वाटतो आहे. पण यांत तुमच्या जीवाला धोका होईल कीं काय, याची मला भीति वाटते!"

"बाबा! कांहीं हरकत नाहीं. पित्राज्ञेनें राजकार्यांत देहपात झाला तरी तो आनंदाचाच प्रसंग आहे. त्याबद्दल आपण वाईट वाटूं देऊं नका. माझ्या धाकट्या भावाला देखील यांत आनंदच वाटणार आहे."

"तुमची एवढी तयारी पाहून माझें काम अर्धें पार पडलें असें वाटतें आहे. देव तुमचें कल्याण करो! जा तर, तुझ्या भावाला घेऊन ये, म्हणजे तुह्मां दोघांनां मी आपली कल्पना एकदमच सांगतों."

"बरें, पण बाबा! असा हा दुष्ट मांत्रिक तरी कोण? आणि त्याचें आणि आपल्या राजाचें एवढें वैर तरी कशाकरतां?"

"नदीच्या दक्षिण तीरावर असलेला योगी हाच तो दुष्ट मांत्रिक आहे. आणि त्याच्या झोंपडीजवळ असलेला श्वान, तोच आपला राजा आहे. त्याच्या वैराचें कारण कांहीं समजत नाहीं."

पित्याच्या आज्ञेप्रमाणें वराहमिहिराचा ज्येष्ठ पुत्र आपल्या धाकट्या भावाला घेऊन आला. त्यांनां घेऊन वराहमिहिर पुढें काय करावयाचें

तें त्यांनां सांगत बसला. आपण त्यांनां त्यांच्या एकांतांत सोडून योग्याच्या पर्णकुटीकडे वळूं.

दुसरे दिवसाची सकाळची वेळ. योगी स्नान करून आपल्या झोंपडींत बसला आहे. त्याचा शिष्य प्रधानहि त्याच्यासमोरच बसला आहे. दोघेहि आपल्या ध्यानकर्मांत गुंतले आहेत. एक जन्म जाऊन दुसरा आला ह्मणजे मागील जन्मांतील चुका व पापें पुन्हा आपल्या हातून न होऊं देतां नवीन तऱ्हेनें आयुष्यक्रमण करून पुण्यसंचय करण्याची किंवा पापमार्गांत पुढें पाऊल टाकून नरकाची जोड करण्याची जशी प्राण्याला नूतन संधि प्राप्त होते, त्याचप्रमाणें एक दिवस जाऊन दुसरा दिवस उगवला ह्मणजे मनुष्यप्राण्याला नवीन कार्य करण्याला संधि प्राप्त होत असते. गेल्या जन्मांतील पापांबद्दल ज्याला पश्चात्ताप झाला असेल तो नवीन जन्माचा सदुपयोग करण्याचा प्रयत्न करित असतो; परंतु ज्याला पापकर्मांतच आनंद वाटत असतो तो पूर्वींच्या पापसंचयांत भर टाकण्याला उद्युक्त होतो. त्याचप्रमाणें गत दिवसाच्या कृतकर्मांकडे पाहून शहाणा मनुष्य उगवलेल्या दिवसाचा कार्यक्रम ठरवित असतो. नूतन दिवस हा नूतन कार्यास प्रवृत्त होण्यास आपल्याला सुचवित असतो; आणि ज्याप्रमाणें सुरुवात त्याप्रमाणेंच अंत होतो हें सुचविण्याकरतांच सूर्यनारायण प्रातःकाळीं रक्तवर्ण असा उगवतो व अस्तास जातांनाहि रक्तवर्ण होतो. किंवा पाप्यांनां त्यांच्या कृत्यांवर आपली नजर असून आपल्याला त्यांच्या कृत्यांचा अत्यंत राग आला आहे हें दाखविण्याकरतां तो रक्तमुख असा प्रातःकाळीं उदयाचलावर येतो; किंवा सुष्टांच्या सुकृतीनें आपल्याला झालेला आनंद व्यक्त करण्याकरतां अनुरागवर्ण असा तो त्या वेळीं दिसतो. कोणत्या कां कारणानें असेना, रक्तवर्ण सूर्य नुकताच पूर्वेकडून वर येऊन प्राणिमात्राला नवीन कार्य करण्याकरतां नवीन दिवस उगवल्याचें सुचवित होता. अशा या मंगल प्रभातसमयीं योग्याची मनोवृत्ति सुष्ट किंवा दुष्ट विचारांनीं भरली होती बरें ? आजकाल त्याला आपल्या प्रिय शिष्याच्या अंगीकृत कार्याशिवाय दुसरा कोणताच विषय त्रास देत नव्हता !

पूर्वीप्रमाणें आतां योग्याची एक झोंपडी नसून त्या ठिकाणीं दोन झोंपड्या दिसत होत्या. योगी व त्याचा शिष्य आपल्या पूर्व परिचित झोंपडींतच बसले होते. जवळच या झोंपडीसारखी दुसरी एक झोंपडी होती. लोकांची ये जा पूर्वीच्याच झोंपडींत होती, पण त्या ठिकाणीं आतां ती देवी किंवा प्रधानपुत्राचें शव दिसत नव्हतें. तें प्रेत या शेजारच्या दुसऱ्या झोंपडींत ठेवलें होतें, आणि त्या झोंपडीच्या दाराशीं श्वानरूप विक्रम बसला होता. खरें पाहिलें असतां योग्याचा व त्याच्या शिष्याचा हा परम वैरी; पण योग्याच्या सामर्थ्यप्रभावामुळें आतां तो त्याचा बंदा गुलाम झाला होता. तो एकसारखा अष्टौप्रहर झोंपडीच्या दाराशीं बसून त्या प्रेताचें रक्षण करित होता. तो तिकडे कोणालाहि फिरकूं देत नसे. कोणीं जवळ गेलाच तर एकदम त्याच्यावर तुटून पडून त्याला तेथून पिटाळून लावी. अशा रीतीनें हा सेवातत्पर श्वान त्या झोंपडीच्या दाराशीं बसला असतां या प्रातःकाळच्या प्रशांत वेळीं एक मृगांची जोडी फिरत फिरत त्या झोंपडीजवळ आली. त्या मृगांकडे पाहतांच श्वानानें भुंकण्यास सुरुवात केली. परंतु त्या मृगांचें त्याच्या भुंकण्याकडे लक्ष्य नव्हतें. ते तसेच पुढें पुढें चालले. झोंपडीजवळ जाऊन पोहोंचतांच श्वान त्यांच्या अंगावर धावला. त्यासरशी भयभीत होऊन ते मृग दूर पळाले. ते दूर जातांच श्वान स्वस्थानीं येऊन बसला. लगेच ते मृग पुनः त्या झोंपडीकडे वळले. त्यांचा झोंपडीकडे येण्याचा रोंख दिसतांच श्वान पुन्हा त्यांच्या अंगावर धावला, तसे ते पुनः पळून जाऊं लागले. ते पळतात असें पाहतांच श्वान परतला, तो परतांच मृगहि परतले! श्वानानें पुन्हा आपला मोहरा फिरविला. असा त्यांचा पाठलाग करित श्वान नदीतीरावर जाऊन पोहोंचला. नदीतीरावर श्वान आला असें पाहतांच मृगांनीं पाण्यांत उडी टाकली. तेव्हां श्वान परतूं लागला. तो परततांच तेहि परतले. हें पाहतांच श्वानानेंहि पाण्यांत उडी मारली. त्याचें भुंकणें सुरूच होतें. त्याचा शब्द फार दुरून ऐकूं येऊं लागतांच योग्याचें लक्ष्य तिकडे गेलें व त्यानें झोंपडीबाहेर येऊन श्वान मृगांच्या मागें लागून पाण्यांत उतरला हें पाहतांच “घात झाला!” असें ह्मटलें व एकदम झोंपडींत जाऊन तो समाधी लावून बसला. त्याचा देह

मात्र तेथें राहिला, आत्मा गिधाडाचें रूप घेऊन श्वानाला परतविण्याकरतां केव्हांच बाहेर गेला होता !

बोलावलें तरी आपली शिकार सोडून श्वान परतणार नाहीं, असें समजून त्याला आपली शिकार पकडण्यांत सहाय्य करावें ह्मणून योग्यानें गिधाडाचें रूप घेऊन एकदम ऊंच आकाशांत उड्डान केलें व वरून जाऊन हरणांचे डोळे फोडावे ह्मणजे ते आयतेच कुत्र्याच्या स्वाधीन होतील, असा त्यानें बेत केला. गिधाड आकाशांतून हरणांचा पाठलाग करतांना पाहून नूतन प्रधानासह हा सर्व चमत्कार परतीरावर उभा राहून पहात असलेला वराहमिहिर "घात झाला! डाव फसला!!" असें एकदम ओरडला. त्याचे हे शब्द ऐकून प्रधान म्हणाला "कां हो ? घात कसा झाला ?"

वराहमिहिर म्हणाला "हा पहा, योगी गिधाड होऊन आला ! त्याला सुगावा लागला. आतां तो श्वानाला परत नेईल आणि माझ्या दोघां मुलांचा घात करील."

इतक्यांत गिधाडानें मृगांवर झडप घातली. त्याला पाहतांच मृग वेगानें पळूं लागले. ते धूम पळत असतांच त्वरा करून एका मृगाचा एक डोळा गिधाडानें फोडलाच! परंतु ते अर्ध्या नदीच्या पार गेलेले पाहून योगी हताश होऊन परतला. श्वान व मृग एकदाचे परतीराला जाऊन पोहोंचले. त्यांनां पाहून प्रधानाला व वराहमिहिराला अत्यंत आनंद झाला. त्यांनीं श्वानाला व मृगांनां प्रेमानें आलिंगिलें व त्यांनां ते घरीं घेऊन गेले.

हीं दोन हरणें ह्मणजे वराहमिहिराचे दोघे पुत्र होते, हें वाचकांनीं ताडलेंच असेल. ज्यानें त्यांनां हरिण केलें त्यानेंच त्यांनां व कुत्र्याला पुन्हा पूर्वरूप दिलें, यांत काय आश्चर्य?

योग्याचा आत्मा पुन्हा स्वशरिरांत परत आला. त्याची समाधी उतरली. मग त्यानें आपल्या शिष्याला घडलेला वृत्तांत सांगितला. तेव्हां प्रधान म्हणाला "आपण परतीरापर्यंत त्यांचा पाठलाग करून त्या कपटवेषधारी हरिणांचा नाश करावयाचा असता व कुत्र्याला परत आणावयाचें असतें. आपण मधूनच उगीच परतलां !"

योगी म्हणाला "हा प्रकार जर थोडा अगोदर माझ्या लक्ष्यांत आला असता, तर सर्व ठीक जुळलें असतें; पण मीं हा प्रकार पाहिल्यावर मला आपलें कार्य करण्याला फार थोडा अवधी मिळाला. नदीच्या अर्ध्याभागापुढें उज्जयनींत महांकालेश्वराची सत्ता असल्यामुळें माझी सत्ता चालत नाहीं. नाहींतर परतीरापर्यंत त्यांचा पाठलाग केल्याशिवाय मी राहिलों नसतों."

"मग आतां पुढें?"

"पुढें काय आणि मागें काय!"

"मग सर्व फसलें ह्मणावयाचें तर?"

असें ह्मणून प्रधान आपली मान दोन्ही गुडघ्यांत घालून रुदन करूं लागला. तेव्हां योगी त्याला ह्मणाला "अरे! असा रडतोस काय? एक डाव फसला तर दुसरा! तुझें कार्य मीं आपल्या शिरावर घेतलें आहे. कसेंहि करून मी तें पार पाडीनच! तूं मुळींच काळजी करूं नकोस!!"

प्रधानाला योग्याच्या या आश्वासनामुळें अमळ धीर आला. मग हताश झालेला प्रधान आणि त्याचा खंबीर गुरु हे आपल्या नित्यकर्मास लागले.

---

## प्रकरण ५ वें.

## प्रयाण.

वराहमिहिरानें विक्रमाची सुटका केली. विक्रम आपल्या पूर्व स्वरूपांत आलेला पाहून सर्वांनां फार आनंद झाला. वराहमिहिराचे उपकार कसे फेडावे हें विक्रमास कळेना. त्यानें विक्रमाला पुनर्जन्म दिला होता. अनेकांवर अनेक प्रसंगीं उपकार करित असावें, गुणांनां उत्तेजन देण्याकरतां गुणी जनांनां आपल्या शक्त्यनुसार आश्रय द्यावा, त्यांचा तत्काल जरी उपयोग दिसला नाहीं तरी केव्हांना केव्हां तरी त्यांचा उपयोग होतो; मिळविलेलें धन, संपादिलेली विद्या, आणि केलेले उपकार केव्हांहि फुकट जात नाहींत! हें तत्व विक्रमावरील प्रसंगावरून चांगल्या तऱ्हेनें आपल्या दृष्टोत्पत्तीस येतें. मी राजा आहें, माझ्याजवळ इतकें सैन्य आहे, मीं इतक्या लढाया जिंकल्या आहेत, अशा आढ्यतेनें विक्रम जर फुगून गेला असता, आणि त्यानें वराहमिहिरासारख्या गुणी मनुष्यास आश्रय देऊन पदरीं बाळगिलें नसतें, तर त्याची आज या संकटांतून सुटण्याची कांहीं तरी आशा होती काय?

विक्रमाची सुटका झाल्यावर तो स्वस्थ बसला नाहीं. हजारों सैन्य पदरीं बाळगणाऱ्या शत्रूपेक्षां देखील हजारो पटीनें बलाढ्य असा त्याला आतां शत्रु उत्पन्न झाला होता. त्याचें पारिपत्य सैन्यानें होण्यासारखें नव्हतें. त्याचे त्रास देण्याचे उपाय जसे विचित्र, तशाच एखाद्या विचित्र उपायानें त्याचा नाश करणें अवश्य होतें. या कामाला वराहमिहिरापेक्षां दुसरा योग्य मनुष्य त्याला दिसेना. तेव्हां त्यानें त्याला बोलावून आणून या नूतन शत्रूचें पारिपत्य करण्याचा उपाय सांगण्याची विनंति केली.

राजवाड्यांतील एका खोलींत विक्रम, त्याचा प्रधान आणि वराहमिहिर हे तिघे जमले आणि त्यांचें खलबत सुरू झालें. विक्रमानें आपल्याला योग्याच्या कृत्याचा सुगावा कसा लागला, आणि आपण तेथें जाऊन काय काय पाहिलें तें सर्व त्यांनां सविस्तर सांगितलें. अशा बलाढ्य शत्रूचें पारिपत्य करण्यास त्याच्यापेक्षां कांकणभर जास्त बलाढ्य असा मनुष्य पाहिजे होता. वराह-मिहिरास आपण त्या कार्यास पुरे पडूं असें वाटलें नाहीं. तथापि राजाच्या आग्रहावरून त्याच्या पारिपत्याचा कांहीं उपाय सांपडतो कीं काय हें पाहण्याकरतां त्यानें कागद आणि लेखणी घेऊन गणित करावयास प्रारंभ केला. त्यानें ज्योतिर्विषयक गणित करण्यास सुरुवात केलेली पाहतांच त्याला व्यत्यय न व्हावा ह्मणून विक्रम आणि त्याचा प्रधान हे अवाक्षरहि न उच्चारतां आपापल्या ठिकाणीं विचार करित स्वस्थ बसले.

अशा स्थितींत बराच वेळ लोटला. शेवटीं एकदाचें गणित झालें. तेव्हां 'हुश्श' असा श्रमपरिहार करणारा शब्द उच्चारून वराहमिहिर विक्रमाकडे पाहत स्वस्थ बसला. गणित करण्यांत त्याला फार श्रम पडले आहेत असें पाहून विक्रम व त्याचा प्रधान कांहीं वेळ तसेच गप्प बसले. कांहीं वेळानें राजा वराहमिहिरास ह्मणाला "काय वराहमिहिर! गणित करून आपण काय शोध केलात ?"

वराहमिहिर म्हणाला "शोध केला खरा; पण त्यांत सांपडलेला उपाय वाटला होता तसा सोपा नाहीं!"

"चिंता नाहीं! केवढाहि बिकट कां असेना, पण आपल्याला तो केला पाहिजे. असा शत्रु जीवंत ठेवून उपयोगी नाहीं!"

पुणे मराठी ग्रंथालय
४३७ ब नारायण
७५३४

"गणितानें मला एवढें कळलें कीं, आपल्या शत्रूचें पारिपत्य करण्याचें सामर्थ्य मज गरिबामध्यें नाहीं!"

"कां बरें? त्याच्या क्रियेवर प्रतिक्रिया करून आपणच माझी सुटका केलीत कीं नाहीं? मग त्याच्यापेक्षां आपली शक्ति जास्त नाहीं का? मग आतांच आपल्यांत सामर्थ्य नाहीं असें कां ह्मणतां?"

वराहमिहिर म्हणतो "महाराज! खरी गोष्ट मीं आपल्याला सांगितली. आपलें कार्य माझ्या हातून होण्यासारखें असून मी तें करूं इच्छित नाहीं, किंवा मी त्या योग्याला भितों, असें मुळींच नाहीं! आपल्या कार्याकरतां मी आपला प्राणहि अर्पण करण्यास आनंदानें तयार झालों असतों; पण त्याचा या ठिकाणीं मुळींच उपयोग होणार नाहीं. याचें कारण एवढेंच कीं, तो योगी तेरा विद्यांचा स्वामी आहे आणि मला फक्त कायत्या तीनच विद्या अवगत आहेत. आपला शत्रू भ्रष्ट योगी आहे. त्याच्या योगसाधनांत जरी त्याला जय मिळाला नाहीं, तरी त्याला त्यामुळें सिद्धींची जोड आणि तेरा विद्यांची प्राप्ति झालेली आहे."

विक्रम ह्मणाला "मग त्याला शिक्षा करण्याचा उपाय नाहीं ह्मणतां?" हे शब्द उच्चारतांच विक्रम निराशेनें हताश होऊन बसल्या जागींच मागील तक्यावर पडला.

वराहमिहिर आवेशानें ह्मणाला "महाराज! असे हताश होऊं नका. या जगांत ईश्वरानें शेराला सव्वाशेर प्रतिस्पर्धी तयार केलेलेच आहेत! कोणालाहि गर्व करण्याला ह्मणून जागा नाहीं. त्याचप्रमाणें या योग्यालाहि त्याच्याहून बलिष्ठ असा प्रतिस्पर्धी देवानें उत्पन्न केला आहे."

"तो कोण आहे तें लवकर सांगा? मला जाऊन त्याचे पाय धरले पाहिजेत!"

वराहविहिर ह्मणतो "प्रतिस्पर्धी दूर देशांत आहे. आपल्याला तेथें जाऊन त्याला आणला पाहिजे. प्रथम आपण त्याच्यापुढें हात जोडाल, पण पुढें जन्मभर तो आपला दास होऊन आपल्यापुढें हात जोडून उभा राहील."

"तो कोठें का असेना, मी त्याला हरप्रयत्नानें घेऊन येईन. तो कोण आहे आणि कोठें आहे तेवढें एकदा मला कळूं द्या."

मि.

"हा प्रतिस्पर्धी चीन देशची राजकन्या होय. ही राजकन्या चौदा विद्यांत प्रवीण आहे."

वराहमिहिराच्या तोंडून हे शब्द ऐकतांच विक्रमानें विचारलें "पण ही राजकन्या माझेबरोबर कशी येईल? तिला आणण्याची युक्ति आपणच सांगितली पाहिजे."

वराहमिहिर ह्मणाला "ती अझून कुमारिका आहे. आणखी तीन महिन्यांनीं तिचें स्वयंवर होईल. तर आपण तेथें जाऊन तिला मिळवून आणावी. दुसरा उपाय नाहीं!"

स्वयंवरांत जाऊन तिला आणली पाहिजे खरी; पण स्वयंवर ह्मटलें ह्मणजे त्यांत वराच्या इच्छेला कोण विचारतो! वधूनें वर पसंत केला पाहिजे. आपण तिच्या स्वयंवरांत जाऊन दाखल झालों, तरी ती आपल्यालाच वरील याचा काय नेम? असा विक्रमाला प्रश्न येऊन पडला. तथापि आपल्या इष्ट देवतेवर भार टाकून स्वयंवरास जाऊन त्या राजकन्येला प्राप्त करून घेण्याचा त्यानें निश्चय केला.

विक्रमानें आपल्या राज्याचा भार आपला मुख्य प्रधान आणि इतर मंत्री यांच्यावर सोंपवून कोणासहि न कळवितां चीनदेशांत जाण्याची लगेच तयारी केली. त्याच्या पुण्यप्रभावानें त्यालाहि कांहीं देवता प्रसन्न होत्या. त्यांचें सहाय्य मागून तो जाण्यास निघाला. त्यानें बरोबर कोणालाहि घेतलें नाहीं. प्रत्यक्ष देवता सहाय्य करण्यास असल्यावर मानवी सहाय्याची काय जरूर होती. त्यानें एक उमदा घोडा घेतला व कमरेस अक्षय विजयी तरवार लटकावून सुमुहूर्तावर प्रयाण केलें.

विक्रमाचें राज्य पूर्वसमुद्रापासून पश्चिमसमुद्रापर्यंत पसरलें होतें. एवढ्या अफाट व संपन्न राज्याचा धनी याप्रमाणें एकटा व गुप्तपणें चीन देशास जावयास निघाला व तोहि तेथील राजकन्येच्या स्वयंवरप्रसंगाकरतां, हें पाहून वाचकांस आश्चर्य वाटेल. खरें ह्मटलें, तर अशा राजानें बरोबर मोठा परिवार घ्यावयाचा; जागजागीं टप्पे वगैरे ठेवून आपला प्रवास राजाच्या थाटानें करावयाचा; आपल्या वाटेंतील सर्व प्रांताधिकाऱ्यांनां

व मांडलिकांनां आगाऊ सूचना देऊन त्यांचा पाहुणचार घेत घेत जावयाचें; तें सर्व सोडून विक्रम असा एखाद्या साधारण मनुष्यासारखा निघालेला पाहून कोणास आश्चर्य वाटणार नाहीं? एखादा साधारण स्थितींतील मनुष्य देखील विवाहप्रसंगीं आपलें असेल तें वैभव दाखवित असतो. मग विक्रमासारख्या पराक्रमी राजानें स्वयंवरास जातांना—जेथें अनेक देशचे राजे येऊन आपल्या वैभवानें आणि आपल्या स्तुतिपाठकांकडून आपल्या पराक्रमांचें वर्णन करवून स्वयंवरास सज्ज असलेल्या राजकन्येचें लक्ष्य आपल्याकडे वेधून तिचें पाणिग्रहण करण्यास मिळावें ह्मणून चडाओढ करित असतात, अशा प्रसंगीं असा एकाकी जाऊन विक्रम राजकन्या प्राप्त करून घेण्याचा आपला हेतु कसा पार पाडणार होता? इतक्या लांब जाऊन विफलहेतु असा तो परत येणार होता काय? मग योग्याचें पारिपत्य कसें होणार? विक्रम विफलहेतु होऊन परतण्याकरतां जात नव्हता. योग्याचें पारिपत्य करणें हा आपला प्रधान उद्देश तो विसरला नव्हता. या सर्वांचें साधन अशा त्या चीनच्या राजकन्येचें पाणिग्रहण करण्याची त्याला अत्यंत उत्कंठा होती; परंतु हा आपला उद्देश साध्य करण्याकरतां त्यानें आपल्या बाहेरच्या आणि आगंतुक साधनांवर भार टाकला नव्हता. चौदा विद्या विभूषित अशी ती राजकन्या या बाहेरच्या वैभवानें दिपण्याइतकी मूर्ख नव्हती, हें तो जाणत होता. तिचें लक्ष्य आंतील गुणांकडेच असणार हें त्यानें ताडलें होतें, आणि ह्मणूनच आपल्या अंगच्या गुणांनींच आपण तिला वरूं, असा त्याला भरंवसा होता. परंतु अंगच्या गुणांनां बाहेरच्या वैभवाची जोड मिळाली असती तर सुवर्णाच्या कोंदणांत बसविलेल्या हिऱ्याप्रमाणें त्याची योग्यता वाढली नसती, असें नाहीं. तेव्हां विक्रमाचें गुप्त रीतीनें जाण्याचें कारण दुसरेंच होतें, व तें वाचकांच्याहि लक्ष्यांत आलेंच असेल.

योग्याची शक्ति फार विलक्षण होती. विक्रमाचा नाश करण्याच्या कामीं त्यानें कंबर बांधली होती. त्याला जर विक्रमाचा चीन देशांत जाण्याचा बेत कळला असता, तर त्याच्या उद्देशांत विघ्न करण्यास तो कमी करता ना. अर्थात्, आपलें चीनला जाणें त्याच्यापासून गुप्त ठेवणें विक्रमाला अवश्य होतें.

याप्रमाणें बरेच दिवस प्रवास केल्यावर आपण आपल्या राज्याची हद्द ओलांडली व चीन देशांत आलों असें वाटून रस्त्यानें जाणाऱ्या एका शेतकऱ्याला विक्रमानें प्रश्न केला "अरे! हें राज्य कोणाचें आहे?"

शेतकरी ह्मणाला "महाराज! आमच्या दयाळ विक्रमराजाचें हें राज्य आहे."

"चीन देश येथून किती दूर आहे?"

"मला बरोबरसें माहीत नाहीं. पण तो देश येथून जवळच आहे ह्मणतात."

"विक्रमराजाच्या राज्यांत प्रजेला सुख कितपत आहे?"

"सुख ह्मणून काय विचारतां? या राजासारखा दुसरा चांगला राजा होणार नाहीं!"

"त्याच्या दरबारांत गरीब प्रजेची दाद कशी काय लागते?"

"आमच्या न्यायी राजाची आपल्या अधिकाऱ्यांवर करडी नजर असते आणि सर्व गोष्टींकडे राजा स्वतः नजर ठेवित असल्यामुळें आमच्या गरजा त्याला सहज समजतात. कधीं कधीं तो स्वतः गुप्तवेषानें आपल्या राज्यांत फिरून लोकांची स्थिति पाहतो, यामुळें त्याच्या अधिकाऱ्यांवर त्याचा वचक आहे. या राज्यांत आह्मांला राजाकडे तक्रार नेण्याचा सहसा प्रसंगच येत नाहीं."

हे त्या गरीब शेतकऱ्याचे उद्गार ऐकून राजा विक्रमाला काय वाटलें असेल, ह्याची वाचकांनां सहज कल्पना होईल. प्रजेचा संतोष हेंच चांगल्या राजाचें अंतिम साध्य होय. तें अशा रीतीनें प्राप्त झालेलें पाहून विक्रमाला फार समाधान झालें. त्यानें त्या शेतकऱ्याला कांहीं इनाम देऊन आपला मार्ग आक्रमण्यास सुरुवात केली. पगारी नोकरांच्या तोंडून 'राज्यांत सर्वत्र आबादी आबाद आहे' ह्मणून तोंडदेखले उद्गार ऐकणें, आणि वरील शेतकऱ्यासारख्याच्या तोंडून अनाहूत आलेले शब्द ऐकणें, यांत किती तरी अंतर आहे!

अशा रीतीनें प्रजेची स्थिति अवलोकन करित प्रवास करतां करतां विक्रम चीन देशच्या राजधानीजवळ येऊन ठेपला. तो राजधानीजवळ येऊन पोंचला ती वेळ रात्रीची होती. तेव्हां अपरिचित शहरांत रात्रीं जाणें चांगलें नाहीं, असा विचार करून शहराबाहेर असलेल्या धर्मशाळेंत तो उतरला. जवळच्या एका आम्रवृक्षास घोडा बांधून ठेवून आपली पथारी पसरून तो तेथें जवळच निजला. प्रवासाच्या श्रमांमुळें त्याला तत्काळ गाढ झोंप लागली.

झोंप ही शरीरप्रकृतीला अवश्य आहे. ती प्रत्येकाला पाहिजे असते व ती सगळ्यांनां येतेहि. पण झोंप येण्यास मन स्वस्थ असलें पाहिजे. झोंप ही शरीरधर्म आहे खरी, पण मानसिक स्वस्थतेच्या अभावीं ती येणें किती कठीण आहे, याचा प्रत्येकाला अनुभव आहेच. त्यांतून ज्यांनां आपलीं गुप्तकामें करावयाचीं असतात त्यांनां रात्र हीच फार सोयीची असते. चोर, दरोडेखोर, व्यभिचारी यांनां रात्र ही फार प्रिय असते. लोकांचा दिवस ती यांची रात्र, आणि लोकांची रात्र तो यांचा दिवस असतो. **'या निशा सर्वभूतानां तस्यां जागर्ति संयमी'** असें भगवद्वचन आहे. परंतु संयमी लोकांच्या अगदीं विरुद्ध ज्यांचा वर्तनक्रम, त्यांचीहि तीच स्थिति, हें कसें बरें? अत्यानंदानें डोळ्यांत अश्रु येतात आणि दुःखावेगहि अश्रुरूपानेंच बाहेर पडतो, त्यांतीलच ही गोष्ट आहे ह्मणावयाचें. अग्नि स्वयंपाकाच्या उपयोगीं पडतो आणि त्यानेंच आग लावतां येते. एकच वस्तु, परंतु उपयोग करणाराच्या प्रवृत्तीप्रमाणें तिचे चांगले किंवा वाईट परिणाम होतात. त्याचप्रमाणें एकच रात्र—तीच सज्जनांनां विश्रांतीच्या उपयोगीं पडते, आणि तिचाच नीच लोक आपलीं दुष्कृत्यें पार पाडण्याच्या कामीं उपयोग करतात. याचप्रमाणें आजची रात्र विक्रमाला विश्रांति घेण्याच्या कामीं उपयोगीं पडली; पण याच वेळीं राजवाड्यावर हल्ला करण्याच्या उद्देशानें कांहीं दरोडेखोर बाहेर पडले होते. जी निद्रा श्रम परिहार करून आनंद देते तीच विक्रमाला यावेळीं प्रतिकूल झाली!

पुणे मराठी ग्रंथालय
प्रयाण. १२७ ब, नारायण पेठ, पुणे ४१

हे दरोडेखोर राजवाडा लुटण्याच्या संकल्पानें जातांना शहराजवळ येतांच त्यांनां आम्रवृक्षास बांधलेला विक्रमाचा घोडा दिसला. हा आपल्याला शुभशकुनच झाला, असें त्या दरोडेखोरांनां वाटलें. त्यांनीं त्याला वंदन केलें व "आह्मांला आज रात्रीं जी लूट मिळेल तिच्यांतील आमच्या बरोबरीचा एक हिस्सा आह्मी तुला अर्पण करूं; आमचें कार्य निर्विघ्नपणें पार पडूं दे!" असा त्यांनीं त्या घोड्यास नवस करून ते मार्गस्थ झाले.

नशीब अनुकूल असल्यावर काय साध्य होणार नाहीं! राजवाड्यावरील पहाऱ्यांपासून त्या चोरांस प्रतिबंध झाला नाहीं. कांहीं पहारेकरी जागे दिसले त्यांनां कंठस्नान घालून त्यांनीं आपला मार्ग मोकळा केला. वाड्यांत प्रवेश करून नेववेल तितक्या संपत्तीवर हात मारला. त्यांचें कार्य इच्छिल्याप्रमाणें पार पडलें. परत जातांना धर्मशाळेजवळील आमराईत त्यांनीं आपल्या लुटीची वांटणी केली व नवस केल्याप्रमाणें एक बहुमोल असा नवरत्नांचा हार त्यांनीं घोड्याचा हिस्सा ह्मणून वेगळा काढून तो त्याच्या गळ्यांत घातला आणि ते स्वस्थानीं चालते झाले.

चोर निघून गेल्यावर झोंपा घेत असलेले पहारेकरी जागे झाले. कांहीं पहारेकरी तेथें मरून पडलेले पाहतांच त्यांच्या पोटांत धस्स झालें. कांहीं तरी दगा झाला, हें त्यांच्या लक्ष्यांत आलें. हां हां ह्मणतां ही वार्ता राजवाडाभर पसरली. चोरी झालेली पाहतांच चोरांचा तपास लावण्यास सर्व दिशांनीं शिपायांच्या टोळ्या रवाना झाल्या. शहराबाहेर येऊन पाहतात तों विक्रमाच्या घोड्याच्या गळ्यांत नवरत्नांचा हार त्यांच्या दृष्टीस पडला. त्याच्याजवळच विक्रम निजलेला पाहून हाच चोर, असें त्यांनीं ठरविलें. "चोरी करून हा हरामखोर पुन्हा सावासारखा कसा स्वस्थ झोंप घेत पडला आहे पहा!" असें ह्मणून शिपायांनीं त्याच्या एकदम मुसक्या बांधून त्याला राजापुढें नेऊन उभा केला.

चोर सांपडला, हें ऐकून राजाला फार आनंद झाला; पण विक्रमाला त्याच्या सभेंत नेऊन उभा केला, तेव्हां त्याच्याकडे पाहून राजाला फार संताप आला. त्याचे डोळे लाल झाले, त्यानें आपल्या मुठी वळल्या,

त्याचें सर्वांग रागानें लटलट कांपूं लागलें. ज्या शिपायांनीं विक्रमाला धरून नेलें त्यांनां आपली कामगिरी पार पडली व आतां राजाकडून या आपल्या कामगिरीबद्दल चांगलें बक्षिस मिळेल या आशेनें संतोष होऊन त्यांच्या मुद्रा प्रसन्न दिसूं लागल्या. हा आकस्मिक आणि अकल्पित प्रसंग आलेला पाहून विक्रम आश्चर्यचकित झाला. त्याला बिचाऱ्याला यांतील कांहींच ठाऊक नव्हतें. विक्रमासारख्या राजतेजयुक्त पुरुषानें चोरीसारखें निंद्य कर्म केलेलें पाहून इतर सभाजन आश्चर्यानें स्तब्ध झाले.

विक्रमानें "मीं हें निंद्य कर्म केलें नाहीं!" असें कितीहि कळवळ्यानें सांगितलें, तथापि मुद्देमालासह त्याला धरून आणला असल्यामुळें त्याच्या ह्मणण्याचा तेथें कांहींएक उपयोग झाला नाहीं. बिचाऱ्यावर चोरीचा दोष शाबीत धरून त्याला शिक्षा देण्यांत आली. "याचे हातपाय बांधून प्राण जाईपर्यंत मार देऊन याला शहराबाहेर फेंकून द्या!" असा राजानें हुकूम फर्माविला.

हर हर! बा विक्रमा! काय तुझ्यावर हा दुर्धर प्रसंग! एका संकटांतून पार पडलास तर त्याहून सवाई संकट तुझ्यापुढें येऊन उभें! तुझें दैवच फिरलें ह्मटलें पाहिजे. आतां तूं राजकन्येला वरणार तरी कसा, आणि तुझ्या शत्रूचें पारिपत्य तरी होणार कसें?

---

## प्रकरण ६ वें.

## राग दीपक.

राजाज्ञेप्रमाणें राजदूतांनीं विक्रमाला निर्दयपणें मार देऊन त्यांतून तो जगणार नाहीं अशी खात्री होतांच त्यांनीं त्याला हातपाय बांधलेलाच शहराबाहेरील एका शेतानजीकच्या नाल्यांत फेंकून दिलें. त्याला तेथें टाकलें त्यावेळीं अपरिमित रक्तस्राव आणि वेदना यांनीं विव्हळ होऊन विक्रम बेशुद्ध झाला होता. बऱ्याच वेळानें तो शुद्धीवर आला. आतां रात्र संपून दिवस उगवला, सर्वत्र प्रकाश पडला, शक्तिहीन विक्रम आपल्या परिस्थितीची ओळख करून घेण्यास समर्थ झाला. वेदनांनीं पीडलेला विक्रम या कुशीचा त्या कुशीवर वळण्यास देखील शक्त नव्हता.

तो ज्या ठिकाणीं पडला होता ती जागा शहरापासून दूर असल्यामुळें तो कोणाच्या दृष्टीस पडून त्याची कोणी वास्तपुस्त करील ही आशाहि व्यर्थ होती. यदाकदाचित् त्याला कोणीं पाहिलेंहि असतें, तरी राजकोपास बळी पडलेल्या अपराध्यास आश्रय देऊन आपल्या स्वतःवर राजकोप ओढवून घेण्यास कोणी तयार झाला असता कीं काय, याचीहि शंकाच होती! अशा विलक्षण परिस्थितींतून निघण्याचा त्याला कांहीं मार्गच दिसेना. त्यानें आपल्या जीविताची आणि त्याबरोबरच आपल्या सर्व हेतूंची आशा सोडली. तथापि ईश्वराच्या न्यायीपणावर व दयालुत्वावर त्याचा पूर्ण भरंवसा होता. ईश्वराच्या सर्व कार्यांत आपणां मानवांनां अगम्य अशी त्याची दूरदृष्टि असते, हें त्याला पूर्णपणें ठाऊक होतें. तेव्हां मरतांना ईशस्मरण करून आपल्या पुण्यसंचयांत भर टाकण्याला तो विसरला नाहीं. आतां आपल्यास मरण येणार हें त्याला कळून चुकतांच त्यानें देवाचा धांवा आरंभिला व स्वस्थमनानें तो मृत्यूची वाट पहात पडला. मरणाचें त्याला मुळींच भय वाटलें नाहीं. सर्व जन्म सदाचरणानें घालविणाराचें मनःस्वास्थ्य अंतसमयीं तिळभरहि कमी होत नाहीं, हें यावेळीं त्याच्या प्रत्ययाला आलें.

परंतु ईश्वराला जें कर्तव्य तें चुकणार कसें? सुष्टांनां त्रास झाला तरी त्याचा शेवट गोड होतो, आणि दुष्टांनां त्यांच्या कृत्यांबद्दल योग्य शिक्षा होते, हें तत्त्व खोटें कसें व्हावें? विक्रमाचा प्रभुप्रार्थनेंत दिवस गेला. त्याचा आतां सर्व लय त्या जगन्नियंत्याच्या चरणीं लागला होता. दिवसभर पोटांत अन्न नाहीं, पाण्याचा थेंब नाहीं, रक्तस्रावामुळें वरचेवर ग्लानि येत होती; परंतु विक्रमाला त्याचें कांहींच भान नव्हतें. अशा रीतीनें देवाचा धांवा करित असलेल्या विक्रमाची देवाला काळजी पडल्यावांचून कशी राहील?

संध्याकाल झाला. दिनरजनीची भेट झाली. हें पाहतांच प्राणिमात्रालाहि आपल्या प्रियजनांनां भेटण्याची उत्सुकता उत्पन्न झाली. पक्षिगण आपल्या शावकांस भेटण्याकरतां आपल्या घरट्यांकडे जाऊं लागला. गाई आपल्या वत्सांनां भेटण्यासाठीं हंबारव करित गोठ्यांकडे वळल्या. दिवसभर उदरंभरणाच्या मागें लागलेल्या लोकांनीं आपापल्या घराची वाट धरली.

सर्वत्र—बघावें तिकडे—विश्रांतीसाठीं सर्वजण आपापल्या घराचा आश्रय करित असलेले दृष्टीस पडूं लागले. पण विक्रमास आतां घर कोठें आहे आणि तो विश्रांति कोठें घेणार? पण देवानें त्यालाहि एक घर उत्पन्न केलें. या अशा संध्याकाळीं नगरांतील एक गरीब तेली नित्यक्रमाप्रमाणें आपल्या बैलाच्या जोडीस चारून घराकडे घेऊन चालला होता. वाटेंत त्याला विक्रमाचा खोल पण कर्णमनोहर शब्द ऐकूं आला. अशा या समयीं हा कोण बरें विव्हळत आणि विव्हळतांना देखील ईशस्मरण करित या निर्जनस्थानीं पडला आहे, हें पाहण्याकरतां ह्मणून तो तेली विक्रम पडला होता त्या नाल्याकडे गेला. तेथें जातांच मरणोन्मुख स्थितींत विव्हळत पडलेला विक्रम त्याच्या दृष्टीस पडला. विक्रमाची ती शोचनीय स्थिति पाहतांच तेल्याच्या मनांत दया उत्पन्न झाली. त्यानें तो कोण, कोठील, व या जागीं असा कसा आला, याचा कांहींएक शोध न करतां त्याला एकदम उचलून घेतलें व तो घराच्या मार्गास लागला. वाटेनें जातांना त्यानें विक्रमाला त्याची हकीगत विचारली व विक्रमानेंहि आपण राजा असल्याचें आणि चीनच्या राजकन्येचें पाणिग्रहण करण्याच्या आपल्या उद्देशासंबंधीं न सांगतां आपली बाकीची सर्व कथा त्या तेल्याला निवेदन केली. तो राजकोपास पात्र झाला होता हें कळलें तरी तेल्यानें त्या गोष्टीची यत्किंचितहि पर्वा केली नाहीं. त्याच्या मनांत विक्रमाबद्दल पुत्रस्नेह उत्पन्न झाला व याची शुश्रूषा करून आपण याला बरा करूं, असें त्यानें ठरविलें. कांहीं वेळानें तो आपल्या घरीं जाऊन पोहोंचला.

घरीं जातांच त्यानें आपल्या पत्नीला हांक मारून तिला विक्रमाची नीट काळजी घेण्यास सांगितलें. आपण याला पुत्र मानला असून याची काळजी आपल्याला घेतलीच पाहिजे, असेंहि त्यानें आपल्या गृहिणीस बजाविलें. परंतु तिचा स्वभाव नवऱ्याप्रमाणें सात्विक नव्हता. तिला नवऱ्यानें आपल्या घरीं ही काय ब्याद आणली असें वाटलें. आपल्या घरांत ना द्रव्य ना सोय; आपण आपलाच निर्वाह कसा तरी कष्टानें करतों; त्यांत हा लंगडा आणि लुला कशाला आणला? असें ह्मणून ती नवऱ्यावर बरीच रागावली; परंतु त्यानें तिच्या बोलण्याकडे लक्ष्यच दिलें नाहीं. विक्रमाला

पाहतांच त्याच्या मनांत उत्पन्न झालेलें प्रेम विक्रमाला दूर सारण्यास त्याला सांगेना. त्यानें खरोखर विक्रमाची पोटच्या मुलाप्रमाणें जोपासना केली. विक्रमाला लवकरच आराम पडूं लागला; परंतु तो शक्तिहीन झाला असल्यामुळें त्याच्यानें कांहींहि काम होत नव्हतें. तेव्हां त्या तेल्यानें त्याला आपल्या घाण्यावर बसवावें व त्या घाण्यावर बसून विक्रमानें सर्व दिवस घालवावा, असें चाललें होतें.

विक्रमाची प्रकृति बरी झाली, परंतु बरेच दिवसांत त्याच्या अंगास पाणी लागलें नव्हतें. ह्मणून त्याला आतां स्नान घालावें असा तेल्यानें विचार केला. तेव्हां विक्रमानें त्याला सांगितलें "माझी स्नान करण्याची इच्छा आहे, पण घरीं मात्र मी स्नान करणार नाहीं!"

"मग तूं कोठें स्नान करणार?"

"मी राजकन्येच्या स्नानवापींत स्नान करीन!"

"ती गोष्ट अगदींच अशक्य आहे, बेटा!"

"कां बरें?"

"तेथें कोणासहि जाण्याची परवानगी नाहीं; त्यांतून पुरुषाला तर नाहींच नाहीं!"

"आपण तेथें चोरून जाऊं. मी स्नान करीन तर तेथेंच करीन!"

"आणि आपल्याला राजदूतांनीं तेथें धरलें तर ते आपला जीवच घेतील!"

"कांहींहि होवो. बाबा! माझ्या सर्व इच्छा तुह्मी पूर्ण करतां, त्याप्रमाणेंच ही एवढी माझी इच्छा कसेंहि करून पूर्ण कराच!"

"बेटा! असा भलताच हट्ट घेऊं नकोस. मी घरींच तुला वाटेल तितकें पाणी देतों, तूं घरीं स्नान कर."

"बाबा! मला आपल्या जीवाची मुळींच भीति वाटत नाहीं. तुह्मीं मला ती वापी दाखवा आणि परतून या. तुमच्या जीवाला कांहीं अपाय व्हावा, अशी माझी मुळींच इच्छा नाहीं."

"पण तेथेंच जाण्यांत काय विशेष आहे?"

विक्रमानें या प्रश्नाचें उत्तर दिलें नाहीं. त्याची इच्छा कसेंहि करून राजकन्येच्या डोळ्यांत आपण भरावें, अशी होती. तो ती स्पष्ट कशी सांगणार? परंतु राजकन्येच्या दृष्टिपथांत येण्याचा हा भयंकर मार्ग त्यानें कां स्वीकारला? त्यावांचून दुसरा सोपा मार्गच नव्हता काय? शिवाय, तेथें चोरून जावयाचें म्हणजे रात्रींच गेलें पाहिजे. रात्रीं जाऊन विक्रम राजकन्येच्या दृष्टीस कसा पडणार? त्याचें धोरण त्यालाच माहीत!

विक्रमाचा अतिशयच आग्रह पाहून त्याच दिवशीं मध्यरात्रीं तेल्यानें राजकन्येच्या बागेजवळ त्याला नेलें व तिची स्नानवापी दुरून दाखवून तो तेथूनच परतला. तो परतला खरा, पण त्याचें मन विक्रमाबरोबरच होतें. फक्त त्याचें शरीर घराकडे वळलें. घरीं पोंचला, तरी त्याचें मन स्वस्थ नव्हतें. त्याला झोंप येईना. विक्रमाची वाट पहात व तो सुखरूप परत यावा म्हणून ईशस्मरण करित तो त्याची मार्गप्रतीक्षा करित बसला.

विक्रमानें राजकन्येच्या स्नानवापींत उतरून स्नान केलें व वर येऊन तो सिद्धासन घालून बसला. मग त्यानें गाण्यास सुरुवात केली. त्याच्या गाण्याचा आवाज वायूच्या लहरींबरोबर सर्व दिशांनां पसरूं लागला. हा हृदयाला तल्लीन करणारा आवाज ऐकून राजकन्या आपल्या आंथरुणावर उठून बसली. हा आवाज कोणीकडून येतो हें पाहण्याकरितां ती तें गायन लक्ष्य देऊन ऐकूं लागली; परंतु तो आवाज अमुकच दिशेनें येतो हें तिला निश्चित कळेना. ती तल्लीन होऊन डोलूं लागली. आवाज खुलला असें पाहतांच विक्रमानें शवटची एक चीज म्हणण्यास सुरुवात केली. ही शेवटची चीज दीपकरागांतील होती. हा राग म्हणण्यांत विक्रमाचा हातखंडा होता. त्याकाळीं हा राग फारच थोड्या गवयांनां येत असे व चीनमध्यें तर हा कोणालाच माहीत नव्हता. विक्रमानें हा राग म्हणण्यास सुरुवात केल्याबरोबर राजकन्येच्या खोलींतील सर्व दिवे एकदम लागले! राजकन्येला हा चमत्कार पाहून फार आश्चर्य वाटलें. हें कसें झालें, याचा तिला उमज पडेना. इतक्यांत विक्रमानें आपलें गाणें बंद केलें व घरचा मार्ग धरला. विक्रमाचें गाणें बंद होतांच गाण्यामुळें लागलेले दिवे एकदम

विझले. राजकन्या आश्चर्यानें वेडी झाली. गाणें चालू असतांना दिवे एकदम लागले आणि गाणें बंद होतांच ते आपोआप विझले, हें पाहतांच हा त्या गाण्याचाच परिणाम आहे, असें तिच्या लक्ष्यांत आलें. पण हा असा अलौकिक शक्तीचा गवई कोण, हें गूढ कांहीं तिला उकललें नाहीं. या लोकोत्तर पुरुषाचा शोध लावण्याचा तिनें निश्चय केला.

राजकन्येच्या स्वयंवराचा दिवस जसजसा जवळ येत चालला तसतशी निरनिराळया देशच्या राजपुत्रांची चीनच्या राजधानींत गर्दी होऊं लागली. प्रत्येकाला आपल्याला राजकन्येनें वरावें अशी इच्छा होती व ती आपल्यालाच वरील अशी त्यांतील प्रत्येकाला आशाहि वाटत होती ! राजकन्येच्या इच्छेनें जसे राजपुत्र येत होते, त्याचप्रमाणें द्रव्याशेनें निरनिराळया कलांत प्रवीण अशा अनेक कसबी लोकांचीहि तेथें गर्दी होऊं लागली होती. राजकन्या कोणातरी एकाच राजपुत्राला मिळणार होती; पण या कसबी लोकांपैकीं प्रत्येकाला थोडी फार अशी द्रव्यप्राप्ति होणार होती. राजपुत्रांच्या व यांच्या स्थितींत केवढें तरी हें अंतर! राजपुत्रांपैकीं एक कोणी तरी भाग्यवान् होणार व बाकीच्या सर्वांस निराशा वरणार–तर या कलावान् पुरुषांनां त्यांच्या त्यांच्या योग्यतेप्रमाणें थोडा तरी लाभ होणार. आशा आणि निराशा या दोन बिंदूंमध्यें प्रत्येक राजपुत्राचें मन हेलकावे खात होतें–तर या कसब्यांच्या मनांत फक्त आशाच वास करित होती. मिळेल तर सुग्रास नाहीं तर उपास हें चित्र प्रत्येक राजपुत्रास दिसत होतें–परंतु या हुन्नरी लोकांस सुग्रासहि नाहीं तरी उपासहि नाहीं, आपल्या पोटास कांहीं तरी गोड अन्न मिळणार हें ठाऊक होतें. राजपुत्रांस त्यांच्या बदलणाऱ्या मानसिक स्थितीप्रमाणें आनंद किंवा दुःख होत होतें, व त्या त्या विकारांची छाया त्यांच्या मुखावर स्पष्ट दिसत होती--पण या दुसऱ्या लोकांकडे पाहिल्यास त्यांनां या प्रसंगीं आनंदाशिवाय दुसरें कांहीं दिसतच नव्हतें. जमलेल्या राजपुत्रांत एकमेकांबद्दल प्रेम उत्पन्न होण्याऐवजीं हेवा उत्पन्न होत होता–पण या दुसऱ्या लोकांत त्या विकाराचा गंधहि वसत नव्हता. स्वयंवरानिमित्त दूरदूरच्या देशांहून येत असलेल्या या हुन्नरी लोकांची

राजवाड्यांत रोज हजिरी होत असे. तेव्हां या लोकांत जे गानकलाभिज्ञ होते त्यांच्यापैकीं कोणाच्या अंगीं गायनशक्तीनें दिवे लावण्याची करामत आहे कीं काय याची राजकन्येनें बारकाईनें चौकशी केली. शहरांतील रहिवाशी गवयांत ही कला कोणी जाणतो कीं काय याचाहि तिनें तपास केला; परंतु इतक्यांपैकीं कोणीएकहि आपल्या अंगीं ही शक्ति आहे असें ह्मणेना. त्यांपैकीं कित्येकांस तर गाण्यानें दिवे लावणें ही गोष्टच अशक्य वाटे! राजकन्येनें पुष्कळ शोध केला, पण तिला त्या गवयाचा सुगावा लागला नाहीं.

राजकन्येला गवयाचा शोध लागला नाहीं, पण ती मात्र आपला शोध करित आहे ही वार्ता विक्रमाला कळली होती. आपला उद्देश साधला, आपल्या गाण्याचा इष्ट परिणाम झाला, हें समजतांच त्याला पराकाष्ठेचा आनंद झाला. त्यानें पुन्हा एकदा याच युक्तीचा अवलंब करण्याचा निश्चय केला. या वेळेस त्याला राजकन्येच्या स्नानवापीचा रस्ता माहीत झाल्यामुळें तेल्याला हा विचार कळवून त्याची मदत घेण्याची आवश्यकता वाटली नाहीं. त्यानें आपला विचार कायम करून एके दिवशीं रात्रीं त्या वापीवर जाण्यास घराबाहेर पाऊल टाकलें. विक्रम पूर्वी येथें आलेल्या दिवसानंतर मध्यें कांहीं दिवस गेले होते. यावेळेस जातांना त्यानें बरोबर एक पत्र लिहून घेतलें. स्नानवापीवर जाऊन पोहोंचतांच स्नान करून विक्रम पूर्वीं-प्रमाणें गात बसला. त्यानें दीपकरागांतील पद ह्मणतांच आजहि पूर्वीचाच चमत्कार घडला. यावेळीं हा आवाज कोणीकडून येत आहे हें राजकन्येनें ताडलें. हा आवाज आपल्या स्नानवापीवरून येत आहे हें तिच्या लक्ष्यांत आलें. आपल्या परवानगीशिवाय अशा अपरात्रीं आपल्या स्नानवापीवर येऊन गात बसण्याचें धाडस करणारा हा कोण असावा, याचा तिला तर्क होईना. हा कोणीतरी यक्षकिन्नरांच्या कोटींतील प्राणी असावा, असेंच तिला वाटलें. कारण, कोणीहि मनुष्य असें धाडस करून आपल्या कोपास बळी पडण्यास तयार होईल, हें तिला संभवनीय वाटेना. तिला या त्याच्या धाष्टर्याबद्दल राग येण्याऐवजीं तो कोण आहे हें जाणण्याची उत्सुकता मात्र उत्पन्न झाली. अशा या विलक्षण प्राण्याचें आपल्याला दर्शन घडावें

व शक्य असल्यास त्याचा आपल्यावर अनुग्रह व्हावा, अशी राजकन्येला इच्छा उत्पन्न झाली. ती एकदम तेथें जाण्यास तयार झाली. तिनें ही गोष्ट कोणासहि कळविली नाहीं. रात्रीच्या वेळीं आपण एकटें कसें जावें, हा विचारहि तिच्या मनांत आला नाहीं. तिला इच्छा झाली आणि तिचे पाय एकदम स्नानवापीकडे जाण्यास वळले. राजकन्या आपल्याचकडे येत आहे आणि तिच्याबरोबर दुसरें कोणीहि नाहीं, हें पाहून विक्रमाला अत्यानंद झाला. ती जवळ येईपर्यंत तो आपल्या जाग्यावरून हालला नाहीं; परंतु ती जवळ येतांच तो एकदम उठून उभा राहिला. त्याला तिनें सहजस्फूर्तीनें नमस्कार करून "आपण कोण?" असा प्रश्न केला. विक्रम निस्तब्ध उभा होता, त्यानें तिच्या प्रश्नाला उत्तर दिलें नाहीं. तिनें हात जोडून पुन्हा तोच प्रश्न केला आणि आपल्यावर अनुग्रह करावा अशी नम्रपणें विनंति केली. या अपरिचित राजकन्येबरोबर भाषण करणें विक्रमाला योग्य वाटलें नाहीं. तथापि अशी संधि येऊनहि जर आपण आपला उद्देश तिला कळविला नाहीं तर ती भयंकर चूक होईल असेंहि त्याला वाटलें. तिच्याशीं बोलत बसल्यास वेळ जाईल व बोलण्याच्या भरांत आपण ज्यास्तकमी बोलून जाऊं असें वाटून त्यानें बरोबर आणलेलें पत्र तिच्या हातीं दिलें व एकदम तेथून निघून तो तिच्या दृष्टीआड झाला.

---

## प्रकरण ७ वें.

## राजकन्या.

राजकन्येच्या हातीं पत्र देऊन विक्रम तेथून निघून तिच्या दृष्टीआड झाला, तरी आश्चर्यानें स्तब्ध होऊन एखाद्या दगडी पुतळीप्रमाणें त्याच्या मार्गाकडे निश्चल दृष्टि लावून ती बराच वेळ त्याच जागीं उभी होती. हें पत्र हातीं देऊन आपल्याशीं कांहीं एक न बोलतां येथून एकदम नाहींसा होणारा हा कोण असावा, याचा तिला कांहींच तर्क करतां येईना. त्याच्या या विचित्र वर्तनाचें तिला कारणहि समजेना. आपण प्रश्न केले तरी त्यांपैकीं एकाचेंहि उत्तर न देतां हा एकदम निघून कां बरें गेला असावा? माझ्या या वापीवर

कोणाहि मनुष्यास माझ्या परवानगीशिवाय येण्याची मनाई असतां हा येथें कां बरें आला असावा? आणि निर्धास्तपणें येथें येऊन गात बसण्याला याला यत्किंचितहि भीति कशी वाटली नाहीं? वगैरे अनेक प्रश्न तिच्या मनांत एकामागून एक–किंवा एकदमच आले; परंतु तिच्या बुद्धीला या प्रश्नांपैकीं एकाचेंहि उत्तर देतां येईना. तिची मति गुंग झाली. तिला तेथून परत जाण्याचें देखील भान राहिलें नाहीं. या स्थितींत बराच वेळ गेला. झाल्या गोष्टींबद्दल तिच्या आश्चर्यचकित मनांत अनेक विचार येत होते. शेवटीं ती भानावर आली. आपण येथें वेड्यासारखें किती वेळ उभें राहणार आणि अशा या अपरात्रीं आपल्याला एकाकी येथें उभें राहिलेलें कोणी पाहिलें तर त्याला काय वाटेल? असा विचार करून नंतर ती वाड्याकडे परतली आणि आली तशी गुपचुप आपल्या शयनावर जाऊन पडली.

अशा या विचारग्रस्त स्थितींत तिला झोंप तरी कशी यावी? विचारांच्या काहुरामुळें इतका वेळ तिला पत्राचें भानच राहिलें नव्हतें; परंतु आतां तिला त्याची आठवण झाली. पत्रांत काय आहे हें जाणण्याची तिची इच्छा अनावर झाली. लगेच ती उठून बसली. दिवा जवळ घेतला आणि कनवटीला लावलेलें पत्र बाहेर काढून दिव्यासमोर धरून तिनें तें वाचण्यास सुरुवात केली. पत्र वाचून होतांच तिनें त्याची घडी करून तें पूर्वस्थळीं ठेवलें; परंतु एक वेळ वाचण्यानें तिचें समाधान झालें नाहीं. आतां त्या पत्रानें झाल्या गोष्टींचा कांहींतरी उलगडा झाल्यामुळें तिला स्वस्थता वाटावी, परंतु त्याचें यत्किंचितहि चिन्ह तिच्या मुद्रेवर दिसेना. थोडा वेळ ती तशीच बसली. नंतर तिनें तें पत्र पुन्हा बाहेर काढून वाचलें. पुन्हा त्याची घडी केली आणि पुन्हा ती उघडून वाचण्यास सुरुवात केली. तिनें तें पत्र अशा तऱ्हेनें चारपांच वेळां वाचलें आणि एक दीर्घ उसासा टाकून आपल्याशींच ती बोलूं लागली "आपण खुलासा केलात, पण तो पूर्ण कां बरं केला नाहीं? हें पत्र मिळण्यापूर्वी आपला शोध करण्याचा माझ्यापुढं प्रश्न पडला होता तो अजूनहि तसाच आहे! आपलं मुखकमल तरी स्पष्टपणं दिसायचं होतं, ह्मणजे मी नगरांत फिरून आपल्याला

हुडकून काढलं असतं. पण त्या मेल्या ढगानं आयत्यावेळीं अंधार करून दावा साधला ! आपला गानकुशल स्वर ऐकला, पण आपलं भाषण ऐकण्याची संधि मिळाली नाहीं. नाहींतर प्रत्येकाशीं बोलून मीं आपल्याला आवाजानं ओळखलं असतं. पण आपण तेंहि साधन मला लाभूं दिलं नाहीं ! आपण आपला पत्ता कां बरं दिला नाहीं? राजदंडाची आपल्यासारख्या शूर मनुष्याला इतकी कां बरं भीति वाटली? आतां मी आपला शोध तरी कसा लावूं?"

अशा प्रकारें बराच वेळ ती आपल्याशींच बोलत होती. तिला ही रात्र एकदा कशी संपते, असें झालें होतें. पण रात्र संपून तरी काय होणार होतें? विक्रमानें आपला पत्ता न दिल्यामुळें उत्पन्न झालेल्या अज्ञानाच्या अंधकाराला दिवसाचा उजेड काय करणार होता? मन वेडें ह्मणतात तें असें. राजकन्येला वाटलें, सूर्यप्रकाशानें सृष्टि उज्ज्वलित झाली ह्मणजे आपल्याला विक्रमाची राहण्याची जागा दिसेल ! वेळ हा सदोदित जात असतो, त्याप्रमाणें त्या दिवशींहि जात होता. होतां होतां पहांट झाली. राजकन्येची प्रिय दासी आपल्या धनिणीला उठवावयाला तिच्या खोलींत आली; परंतु आज आपल्या पूर्वींच आपली धनीण उठलेली पाहून तिला आश्चर्य वाटलें. रोजच्या-प्रमाणें तिची मुद्राहि आज आनंदी दिसेना. रात्रीच्या जागरणानें आणि विचाराच्या त्रासानें तिच्या मुखमंडलावर उदासीनतेची छाया पसरली होती. तिच्या स्वयंवराचा दिवस अगदीं जवळ येत चालला; आतां फक्त तीन दिवसांचाच कायतो अवकाश राहिला होता. अनेक देशींचे धनवैभवसंपन्न राजकुमार तिच्या पाणिग्रहणाकरतां जमल्यामुळें सर्वत्र आनंदसाम्राज्य असतां त्या साम्राज्याची अधिष्ठात्री देवता अशी खिन्न पाहून त्या दासीला फार आश्चर्य वाटलें. हें एकाएकीं काय झालें? कालपर्यंत आनंदी दिसणारा हिचा चेहरा आज असा एकाएकीं म्लान कां झाला, हें तिला समजेना. तिनें हळूच बोलतां बोलतां राजकन्येला याचें कारण विचारलें. आपल्या चिंतेची वांटेकरी होऊन कांहीं उपाय सुचविण्याला योग्य आणि विश्वासू अशी हीच आपली दासी आहे असें पाहून राजकन्या तिला सर्व हकीगत सांगून ह्मणाली "हें पहा तें पत्र. यावरून कांहीं शोध लागेल तर सांग."

असें ह्मणून तिनें तें पत्र आपल्या दासीच्या हातीं दिलें. दासीनें तें लक्ष्यपूर्वक वाचून ती ह्मणाली "बाईसाहेब! बोलूं नये, पण राहवत नाहीं ह्मणून बोलत्यें, क्षमा असावी. स्वयंवरांत वधूनं वर स्वतः शोधण्याचा यावेळीं आपला हक्क आहे. पण आपल्या निवडीला मदत ह्मणून मी आपली एक गोष्ट सांगत्यें. मला वाटतं, हाच पुरुष आपल्याला योग्य पति आहे."

"पण त्याचा पत्ता कसा लावावा?"

"पत्ता लावण्याची खटपट कशाला? तोच स्वयंवराच्या दरबारला येईल तिथं त्याला ओळखा, ह्मणजे झालं."

"अहाग वेडे! मीं जर त्यांला ओळखलं असतं तर मग त्यांचा पत्ता तुलाग कशाला विचारला असता? शिवाय असं पहा, ते कांहीं इथं राजाच्या वेषानं आलेले नाहींत. मग त्यांचा दरबारांत रिघाव तरी कसा व्हावा?"

"होय बाई. ही तरी एक पंचाईतच आहे. ते अगदीं गरिबाच्या वेषानं इथं आले आहेत ह्मणून त्यांनीं पत्रांत लिहिलं आहे हें मी अगदींच विसरल्यें होत्यें. त्यांचा पत्ता लागायला मला तरी बाई एकच उपाय दिसतो आहे."

"कोणता बरं? बाबांच्या कानांवर ही गोष्ट घालण्याचा कीं काय?"

"छे बाईसाहेब! अगदीं गुप्तपणं हें काम होईल असाच तो उपाय आहे."

"हं, मग सांगतरी तो लवकर."

"बाईसाहेब! आपण दिव्य दृष्टीनं त्यांचा पत्ता काढा. आपल्याला ही विद्या अवगत आहे, तिचा आतां उपयोग करायचा नाहीं तर मग करायचा तरी केव्हां?"

"खरंच गडे!"

असा निश्चय केल्यावर राजकन्येनें प्रातर्विधि आटोपून स्नान केलें व देवघरांत जाऊन ती समाधी लावून बसली. राजकन्या समाधी लावून ध्यानस्थ बसली तेव्हां तिची दासी दारांत उभी होती. ती विक्रमाचें पत्र हातांत घेऊन पुनः वाचूं लागली. वाचक हो! आपल्यालाहि त्या पत्रांत काय लिहिलें होतें हें जाणण्याची उत्कंठा झाली असेलच. ती पहा, दासी तें पत्र वाचित आहे:—

"हे चतुर्दशविद्याविभूषित चीनच्या राजकन्ये! मी आर्यावर्तातील उज्जयनी नगरीचा राजा आहें. माझें नांव विक्रमादित्य. तुझ्या पित्याकडून मला तुझ्या स्वयंवराकरतां आमंत्रण येण्यापूर्वींच मी कांहीं विलक्षण कारणामुळें तुझ्या स्वयंवराचा शोध काढून येथें आलों आहें. माझ्याबरोबर राजवैभवाचीं चिन्हें मुळींच नाहींत. मी एकटाच आलों आहें. यामुळें माझी येथें कोणालाहि ओळख पटली नाहीं. मी येथें गुप्त वेषानें राहत आहें. याला कारण माझ्यावरील उपरिनिर्दिष्ट विलक्षण प्रसंग तर खराच, पण मी तुझ्या वडिलांच्या त्यांच्या गैरसमजामुळें कोपास बळी पडलों आहें हेंहि एक त्याचें कारण आहे. कित्येक राजे तुझ्या वडिलांच्या राज्याच्या वैभवामुळें त्यांच्याशीं सख्य जोडण्याकरतां, तर दुसरे कित्येक तुझ्या रूपवैभवाला भुलून तुझ्या पाणिग्रहणाची इच्छा करित असतील; पण माझा उद्देश यांपैकीं कांहीं नसून मी तुझ्या गुणांवर लुब्ध झालों आहें. तुझ्या विद्येचा मला उपयोग आहे. माझ्यावर संकट आलेलें आहे व त्याच्या निवारणाकरतां मला तुझें सहाय्य अवश्य आहे. तुझी भेट घेऊन माझी माहिती तुला स्वतः करून देण्याशिवाय मला अन्य मार्ग न दिसल्यामुळें मी तुझ्या स्नानवापीवर अपरात्रीं चोरून येण्याचें धाडस केलें याची मला क्षमा कर. विशेष कांहीं लिहित नाहीं. तूं सुज्ञ आहेस, तेव्हां एवढ्यांतच पुष्कळसें समजशील अशी मला खात्री आहे. या चीन देशच्या वैभवजलसंचयामध्यें कमलाप्रमाणें असणाऱ्या राजकन्ये! तुझ्या भोंवतीं तुझ्या हृदयमधूवर लुब्ध होऊन गाण्याचा मधुर गुंजारव करित फिरणारा भ्रमर, विक्रम."

हें पत्र वाचून राजकन्येचा विक्रमाकडे लय लागून तिची वरीलप्रमाणें वेड्यासारखी अवस्था झाली. यांत काय नवल? वैभव आणि रूप क्षणभंगुर आहे. त्यांचा केव्हां नाश होईल याचा नेम नाहीं. गुण मात्र यांच्याप्रमाणें नाशवंत नाहींत. ते दिवसेंदिवस कमी न होतां वयाबरोबर वाढतच जातात. रूपवैभवासारख्या क्षणिक गोष्टींमुळें उत्पन्न झालेली प्रीति ही क्षणिकच असणार. प्रीतीचा विषय असेपर्यंतच ती टिकते. याकरतां गुणांमुळें उत्पन्न झालेली प्रीति ही अबाधित असावयाची, असा विचार राजकन्येच्या मनामध्यें साहजिकच आला. आजपर्यंत अनेक राजपुत्रांचें वर्णन कानीं आलें, पण त्यांतून एकानेंहि इच्या गुणांचें किंवा विद्येचें चीज करण्याचा आपला मनोदय व्यक्त केला नव्हता. तेव्हां तिच्या प्रेमाचा

ओघ वाटेंत पर्वतप्राय आडव्या येणाऱ्या राजपुत्रांनीं बाजूस सारून विक्रमाकडे वळला, ह्यांत कांहींच आश्चर्य नव्हतें.

राजकन्येची समाधी उतरली. तथापि तिचें मुख पूर्ववत् प्रसन्न दिसेना. तिनें आपल्या सेवातत्पर दासीला हांक मारली. ती जवळ येतांच तिला राजकन्या ह्मणाली "त्या महाभागाचा पूर्ण पत्ता कांहीं मिळाला नाहीं."

दासी ह्मणाली "पूर्ण न कां मिळेना, पण थोडासा तर मिळाला कीं नाहीं ? तेवढ्यावरूनच आपण त्याचा शोध लावूं. आपल्याला काय कळलं तें सांगा तर खरं !"

"तो महाभाग एका तेल्याचे घरीं राहत आहे आणि त्याच्यावर कांहीं देवतांचा कृपाप्रसाद आहे, एवढंच मला कळलं आहे."

"मला वाटतं कीं, आपण एखादं दिव्य करण्याचं जाहिर करा, ह्मणजे तो त्यांत उघडकीस येईल."

"दिव्य कोणतं करावं तें तूंच सांग."

दासीनें कांहीं वेळ विचार करून राजकन्येला ह्मटलें "आपण आपल्या शहरांतल्या सर्व तेल्यांनां आपल्यासमोर बोलावून त्यांनां या राजाचा पत्ता विचारा."

"पण तो राजा आहे हेंच मुळीं त्याच्या आश्रयदात्याला ठाऊक नाहीं. कारण, तो इथें गुप्तवेषानें राहत आहे. शिवाय, बाबांनीं त्याला शिक्षा केली असल्यामुळं अशा अपराध्याला आश्रय दिल्याचं कबूल करून राजदंडाला कोण स्वतःला पात्र करून घेण्याला तयार होईल ?"

दासी यावर ह्मणाली "मग त्या तेल्यांनां बोलावून कांहीं तरी अमानुष कार्य करावयाला सांगा. तसं न करील त्याला एखादी भयंकर शिक्षा करण्याचं भय घाला. ह्मणजे आपल्या आश्रयदात्याच्या रक्षणाकरतां आपल्या प्रसन्न देवतांच्या आश्रयानं विक्रम तें कार्य त्याच्याकडून करवील. या युक्तीनं सहजच आपल्याला त्याचा पत्ता लागेल."

"वा! ही तुझी युक्ति तर नामी आहे. पण असं दिव्यकार्य तरी कोणतं सांगावं ?"

"तेल्यांनां शोभेल असंच तें कार्य असलं पाहिजे. त्यांनां एक दिवसाची मुदत देऊन एक हजार खंड्या तेल आणून देण्यास सांगावं. इतकं तेल एकदम प्रत्येकाजवळ सांपडणार नाहीं. जो इतकं तेल आणून देईल त्याच्या घरीं विक्रमादित्य आहे, हें सहजच ठरेल."

"ठीक आहे. ही तुझी युक्ति आतांच अमलांत आणत्यें."

असें ह्मणून राजकन्या देवघरांतून उठली. तिनें लगेच आपल्या दूतांकडून शहरांतील सर्व तेल्यांनां बोलावून आणून एक हजार खंडी स्वच्छ तेल उद्यां सकाळीं सूर्योदयाबरोबर प्रत्येकानें हजर केलें पाहिजे, आणि जो न आणील त्याला सुळीं देण्यांत येईल, अशी ताकीद दिली. राजकन्येचा हा विचित्र हुकूम ऐकून प्रत्येकाला फार आश्चर्य वाटलें. पण नुसतें आश्चर्य वाटून काय होणार? एक हजार खंडी तेल आणावें कोठून? न आणलें तर सुळीं जावें लागणार. विक्रमाचा आश्रयदाताच तींतून कसा सुटणार? तो घरीं जाऊन आपल्या बायकोला सर्व हकीगत सांगून धाय मोकलून रडूं लागला. उद्यां आपला नवरा मृत्युमुखीं पडणार आणि मग आपण या दारिद्र्यावस्थेंत अनाश्रित होणार हा विचार मनांत येतांच तीहि ओक्साबोकशीं रडूं लागली. ही रडारड ऐकून विक्रम त्यांच्याजवळ येऊन त्यांनां याचें कारण विचारूं लागला. तेव्हां तेल्यानें त्याला ही सर्व गोष्ट सांगितली. ती ऐकून राजकन्येच्या या विचित्र आज्ञेचें त्यालाहि आश्चर्य वाटलें. तथापि आपल्या आश्रयदात्याच्या उपयोगीं पडण्याला ही चांगली संधि आली आहे असें पाहून त्यानें त्याचें समाधान केलें व ह्मणाला "बाबा! तुह्मी काळजी करूं नका. मी तुह्मांला हें इतकें तेल मिळण्याची खटपट करतों!"

तेल्याला हा खटाटोप कसा करणार हें समजेना. तथापि बुडत्याला गवताचा आधार ह्मणतात, त्याप्रमाणें विक्रमाच्या शब्दांवर त्यानें भार टाकला. विक्रम शुचिर्भूत होऊन आपल्या प्रसन्न देवतांची आराधना करण्यास बसला. देवतांनीं त्याच्या आराधनेप्रमाणें रात्रीच्या रात्रीं हजार खंडी तेल तेथें आणून ठेवलें. दुसरे दिवशीं सकाळीं हें तेल पाहून तेल्याला फार समाधान झालें. आपल्याला पुनर्जन्म लाभल्याचा त्याला आनंद झाला. ज्या निराश्रिताला

वाटेल तसें आपण बोलत होतों तोच संकटसमयीं आपल्या उपयोगीं पडला, असें पाहतांच तेल्याच्या बायकोला आपल्या गतकर्माबद्दल पश्चात्ताप झाला. पुढें तेल्यानें तें तेल राजवाड्यांत नेऊन दाखल केलें. राजकन्येला पाहिजे होतें तें साध्य झालें. तिनें आपला हुकूम रद्द करून बाकीच्या तेल्यांनां त्यांच्या चिंतेंतून सोडविलें. तिनें तेल्याला "तुझ्या घरीं कोण कोण माणसें आहेत?" म्हणून प्रश्न केला. "मी, माझी बायको व एक अनाथ पाळलेला मुलगा अशीं आपण तिघेंजणें आहों," असें त्यानें सांगतांच त्या मुलाला घेऊन येण्याची राजकन्येनें त्याला आज्ञा केली. आज्ञे-प्रमाणें विक्रम तेथें गेला. एकमेकांनां पाहून दोघांनांहि फार आनंद झाला. दुसरे दिवशीं स्वयंवर होतें तेव्हां या मुलाला घेऊन स्वयंवराच्या जागीं हजर राहण्यास तिनें तेल्यास सांगितलें. हा मुलगा विक्रमराजा आहे हें तेल्याला ठाऊक नसल्यामुळें त्याला या राजकन्येच्या आज्ञेचें फार आश्चर्य वाटलें. पण राजकन्येची आज्ञा म्हणून त्यानें तसें करण्याचें ठरविलें. राजकन्येनें त्याला चांगलें बक्षिस दिलें. त्यांतून त्यानें विक्रमाकरतां एक उंची पोषाख खरेदी केला व तो दुसऱ्या दिवसाची वाट पहात बसला.

विक्रमाचा आनंद गगनांत मावेना. त्याचें इच्छित कार्य पार पडण्याची वेळ जवळ आली. पण ही गोष्ट त्याच्या प्रसन्नचित्तवृत्तीप्रमाणें त्याला वाटली तितकी सोपी होती काय?

---

## प्रकरण ८ वें.

## स्वयंवर.

राजवाड्यांतून परत घरीं आल्यावर तेल्याला आपण स्वप्नसृष्टींत आहों कीं काय, असा भास झाला. आपण आश्रय देऊन पुत्रवत् पाळलेला मुलगा वास्तविक कोण आहे हें त्याला कळेना. चोर म्हणून राजदंडास पात्र झालेला हा दिसतो, परंतु त्यापेक्षां कोणीतरी निराळा असला पाहिजे. प्रत्यक्ष त्याला विचारावें, तर तो कांहींच सुगावा लागूं देत नाहीं. हा कोणी तरी प्रबल राजा असावा, असें त्याला वाटे; पण मग हा असा आपल्या घरीं राहून असें दारिद्र्य-

दुःख कां भोगतो ? जर राजा नाहीं ह्मणावें, तर मग राजकन्येचें मन याच्यावर कसें जडलें? अथवा हा कोणी तरी प्रबलशक्ति योगी असला पाहिजे; नाहीं तर मनुष्यास अशक्य अशी गोष्ट हा कसा करूं शकता ? अथवा हा कोणी देवच मनुष्यरूपानें येथें राहत आहे ? परंतु देव तरी कसा ह्मणावा ? देव असून यानें राजदंड कसा भोगला ? आणि याला हा अनेक दुःखांचें आश्रयस्थान असा नरदेह घेण्याचें कारण काय ? माझ्यावर प्रसन्न होऊन मला तारण्याकरतां हा येथें आला ह्मणावें तर माझें इतकें पुण्य कोठलें ? सर्व जन्म संसाराच्या दगदगींत मीं घालविला, त्या माझ्यावर देव प्रसन्न तरी कसा होणार? बरें, न कळत पुण्यप्रभावानें देव मजवर अनुग्रह करण्याकरितां आला ह्मणावा, तर माझ्या मागची संसाराची दगदग कांहीं अझून सुटत नाहीं, हें कसें ? सारेंच आश्चर्य! कांहींच कळत नाहीं. तेल्याला हें कोडें कांहीं केल्या सुटेना. हा गरीब नाहीं, राजा नाहीं, मनुष्य नाहीं, देव नाहीं; मग याला म्हणावें तरी काय ? विक्रम आज इतके दिवस त्याच्या परिचयाचा झाला होता, त्यांचें पितापुत्राचें एकमेकांवर प्रेम जडलें होतें, पण विक्रम कोण होता हें कांहीं त्या तेल्याला अझूनपर्यंत कळलें नव्हतें. अशा या आश्चर्यमग्न स्थितींत सारा दिवस गेला. रात्र झाली. उद्यां पहांटे उठून स्वयंवराला जावयाची विवंचना सुरू झाली. आपण उद्यां तेथें जाणार, पण आपला सभास्थानीं प्रवेश कसा होणार, हेंच त्याला समजेना. राजकन्येनें हजार खंडी तेल एकदम मागितलें कां आणि त्या तेलाच्या किंमतीच्या कितीतरी पट अधिक असें बक्षिस दिलें याचा अर्थ काय ? या मुलाला पाहतांच तिची चित्तवृत्ती एकदम प्रसन्न कां झाली ? अनेक रूपवैभवसंपन्न राजपुत्र तिच्या प्राप्तीच्या लालसेनें जमले असतां माझ्यासारख्या यःकश्चित् मनुष्यानें आश्रय दिलेल्या मनुष्यावर तिचें मन बसलें, याचें काय बरें कारण असावें ? छे! याचा उलगडा आपल्याच्यानें होणें शक्य नाहीं. डोक्यास व्यर्थ त्रास तरी कां द्या! असा विचार करून त्यानें त्या गोष्टीचा विचारच सोडून दिला. पण हा विचार असा सहज थोडाच सुटणार होता ? त्याची भ्रमिष्टासारखी वृत्ति झाली.

उद्यां राजगृहांत प्रवेश कसा करून घ्यावा हेंहि त्याला समजेना. शेवटीं आतांपर्यंत एकंदर गोष्टी ज्याच्या सत्ताप्रभावानें घडून आल्या त्याच लीला नाटकी प्रभूवर भार टाकून तो स्वस्थ बसला.

विक्रमाची चित्तवृत्तीहि अशीच विचित्र झाली होती. पण ती तेल्याप्रमाणें आश्चर्यानें मात्र नव्हे. त्याला कोणतीहि गोष्ट गुप्त नव्हती. सर्व गोष्टी त्याला सूर्यप्रकाशाप्रमाणें स्वच्छ दिसत होत्या; परंतु सूर्यप्रकाशांत सूर्याकडे न बघवल्यामुळें स्वतः सूर्य जसा दिसत नाहीं, त्याप्रमाणें सर्व गोष्टी त्याला उघड उघड दिसत होत्या तरी राजकन्या आपल्याला प्राप्त होते कीं नाहीं ही मुख्य गोष्ट मात्र त्याला स्पष्ट दिसत नव्हती. राजकन्येला आपण कोण हें कळलें आहे, तिचें आपल्यावर प्रेम असल्याचें आपल्याला ठाऊक झालें आहे, स्वयंवरांत वर निवडण्याचा तिला अधिकार आहे, तथापि तिच्या पित्याची इच्छा तिला आड येण्याचा संभव असल्यामुळें आपल्या अदृष्टांत काय आहे हें त्याला कळेना. आपल्यावर आलेल्या संकटांतून आपण पार पडलों, आपलें इष्ट साध्य होण्याची वेळ जवळ आली, इष्ट हेतु साधण्याचा मार्गहि बराच स्वल्प झाला, राजकन्या प्राप्त झाली ह्मणजे योगी आणि त्याचा शिष्य यांचें पारिपत्य होण्याची वेळ जवळ आली, वगैरे विचार त्याच्या मनांत आले ह्मणजे त्याला आनंद होई; पण 'तोंडांत पडावयाला घांस मधें विघ्नांची रास' हा विचार मनांत येतांच त्याचा आनंद एकदम पार नाहींसा होई. पण हा विचार त्याच्या मनांत फार वेळ टिकत नसे. आशा ही पुन्हा लागलीच त्याला आनंदाच्या विचारांत आणून सोडी, आणि यामुळें उद्वेगजनक विचारांनां फार वेळ थारा न मिळतां तो सुखाच्या विचारसमुद्रांत पोहूं लागे.

राजवाड्यांतील दरबारचा भव्य दिवाणखाना या स्वयंवरसमारंभाप्रीत्यर्थ शृंगारून तयार केला होता. निमंत्रित राजपुत्रांसाठीं सोन्यानें मढविलेलीं वेत्रासनें दुतर्फा मांडलीं होतीं. राजपुत्रांच्या आसनांच्या मागें त्या त्या राजपुत्रांच्या सेवकजनांकरतां त्यांच्या त्यांच्या योग्यतेप्रमाणें जागा राखून ठेवल्या होत्या. मध्यभागीं चीनच्या राजाचें सिंहासन होतें. त्याच्या दोन

बाजूंस त्याच्या मंत्रिमंडळाच्या त्यांच्या त्यांच्या दर्ज्याप्रमाणें जागा ठेविल्या होत्या. राजाच्या उजव्या बाजूस प्रथमस्थान धर्मगुरूकरतां मांडलें होतें. सभामंडपांत शिरण्याचा दरवाजा कदलीस्तंभांनीं सुशोभित केला होता. या दरवाज्याच्या आंतल्या बाजूस व राजपुत्र बसण्याच्या जागेजवळ प्रेक्षकसमुदायास बसण्याची जागा तयार केली होती. या योगानें प्रत्येक राजपुत्र त्यांच्या समोरून गेल्यामुळें राजपुत्रांनां बघण्याची त्यांची इच्छा अनायासेंच तृप्त होत होती. दाराबाहेर वाजंत्री आपापल्या वाद्ययंत्रांसह सज्ज होऊन बसले होते. त्यांच्या पलीकडे बऱ्याच दूरपर्यंत दुतर्फा सैन्यांतील शिपाई नग्न तरवारी घेऊन येणाऱ्या राजपुत्रांस सलामी देण्यास उभे केले होते. दारावर राजाचे मंत्री राजपुत्रांचें स्वागत करण्यास उभे होते. सर्वत्र आनंद आणि उत्साह यांशिवाय कांहींच दिसत नव्हतें.

आपल्याला चांगलीशी जागा मिळावी ह्मणून सभास्थानीं प्रेक्षकांची गर्दी अगदीं प्रातःकालपासून होऊं लागली होती. विक्रम व त्याचा आश्रयदाता तेली सर्वांच्या अगोदर येऊन प्रेक्षकांकरतां राखून ठेवलेल्या जागेंत अगदीं पुढें येऊन बसले होते. त्यांचा पोषाख व ऐट पाहून त्यांनां वाटलें होतें त्याप्रमाणें कांहींएक अडथळा न होतां त्यांचा सभागृहांत अगदीं सहज रीतीनें प्रवेश होऊन इच्छिल्याप्रमाणें चांगली जागाहि मिळाली होती. सूर्योदय होतांच एका मागून एक राजपुत्र सभास्थानीं जमूं लागले. त्यांच्या भालदारांनीं त्यांचें नांव व दर्जा पुकारतांच त्यांचा योग्य सत्कार करून त्यांनां त्यांच्या जागीं नेऊन बसविण्यांत येत होतें. अशा प्रकारें थोड्याच वेळांत सर्व सभागृह गच्च भरून गेलें. वाद्यें वाजूं लागलीं. राजेसाहेब आपल्या परिवारासह दरबारांत येऊन हजर झाले. सर्वांनीं उठून त्यांचें स्वागत केलें. नंतर मुख्य प्रधानानें त्यांची औपचारिक रीत्या जमलेल्या सर्व राजपुत्रांशीं ओळख करून दिली. निमंत्रण केल्याप्रमाणें सर्वांनीं येऊन या मंगल समारंभास शोभा आणली याबद्दल राजेसाहेबांनीं संतोष व्यक्त करून सर्वांचे आभार मानले; परंतु तेथें एक स्थान रिकामें दिसलें. चौकशी करतां उज्जयनीपति विक्रमादित्य यांची

ती जागा असल्याचें त्यांनां कळलें. त्यांच्या प्रधानाकडून ते स्वयंवराकरतां उज्जयनीहून रवाना झाल्याचें पत्र आलें असून स्वतः विक्रमादित्य या प्रसंगीं हजर कसे नाहींत, याबद्दल सर्वांस फार आश्चर्य वाटलें. वाटेंत कांहीं अडथळा झाल्यामुळें ते वेळेवर येऊन पोहोंचूं शकले नसावे, असें समाधान करून घेऊन पुढील कार्यास सुरुवात करण्याचें ठरलें. विक्रम हें स्वतः पहात होता; पण आपलें खरें रूप प्रकट करण्याची अझून वेळ आली नाहीं असें समजून तो बसल्या जागींच स्वस्थ होता.

सर्व सभाजन स्थानापन्न झाल्यानंतर राजाज्ञेनें एक वेत्रधारी राजकन्येला आणावयाला अंतःपुरांत गेला. पित्याचा निरोप येतांच विवाहवेष धारण केलेली राजकन्या आपल्या मातेला व इतर वडील मंडळीला वंदन करून आणि त्यांचा मंगल आशीर्वाद घेऊन सभास्थानीं येण्यास निघाली. एका सुवर्णपात्रांत विवाहमाला घेऊन तिची प्रिय सहचरी तिच्याबरोबर निघाली. राजाच्या सिंहासनामागील दरवाज्यावरचा पडदा दूर सारून राजकन्या, तिची दासी व वेत्रधारी ह्यांनीं सभास्थानीं प्रवेश केला. आतांपर्यंत सभास्थानाची शोभा पाहण्यांत गुंतलेले सभाजनांचे डोळे आणि आपापसांत बोलण्यांत गुंतलेलीं त्यांचीं मनें आपापला उद्योग सोडून एकदम राजकन्येकडे वळलीं. हजारों प्रेक्षकांचे डोळे एकाच विषयांत तल्लीन झाले. सर्वत्र शांतता वास करूं लागली. राजकन्येनें सभागृहांत प्रवेश करतांच प्रथमतः धर्मगुरूस, नंतर पित्यास व त्यानंतर इतर मंत्रिमंडळीस प्रणाम करून त्यांचे आशीर्वाद ग्रहण केले व पित्राज्ञेनें राजपुत्र बसलेल्या भागाकडे ती वळली. राजाज्ञेनें मुख्य प्रधान तिच्याबरोबर जाऊन तिला प्रत्येक राजपुत्राचें वर्णन करून त्याची माहिती करून देऊं लागले. ही आतां कोणाला वरते आणि आतां कोणाचें भाग्य उदयाला येतें हें पाहण्यांत सर्वांचीं मनें गुंग झालीं. प्रत्येक राजपुत्राचें वर्णन झाल्यावर क्षणमात्र प्रधानजी त्याजागीं थांबत व ती त्याला माळ घालित नाहीं असें पाहून दुसऱ्या राजपुत्राकडे वळत. असें करित करित ते सर्व राजपुत्रांसमोरून गेले. परंतु तिनें त्यांपैकीं कोणासच वरिलें नाहीं. मागील राजपुत्रास सोडून

मि

राजकन्या आपल्याजवळ आली असें पाहतांच ही आतां आपल्याच गळ्यांत माळ घालणार असें वाटून प्रत्येक राजपुत्राला आनंद होऊन त्याचें मुखकमल एकदम प्रफुल्लित झालेलें दिसे; परंतु ती आपल्याला माळ न घालतां पुढें चालली असें पहातांच तेंच प्रफुल्लित मुख तत्क्षणीं म्लान होई. इंदुमतीच्या स्वयंवर समयीं जमलेल्या राजपुत्रांचें कविशिरोमणि कालिदासानें

**'सञ्चारिणी दीपशिखेव रात्रौ। यं यं व्यतीयाय पतिंवरा सा॥**
**नरेंद्रमार्गाट्ट इव प्रपेदे । विवर्णभावं स स भूमिपालः॥**

असें जें वर्णन केलें आहे तें या प्रसंगीं राजपुत्रांस तंतोतंत लागू पडत होतें.

आपण येथें व्यर्थ आलों; आपला हा अपमान आपल्याला लोकांच्या उपहासास पात्र करणार. हा विचार मनांत येऊन त्यांचा सगळा उत्साह पार नाहींसा होई. आपल्यापैकीं कोण भाग्यवान् ठरतो हें ते मोठ्या उत्सुकतेनें पाहत होते, व जों जों ती पुढें जाई तों तों आपल्या माळेंत आपणच एकटे नसून इतरहि बरेच समदुःखी मणी आहेत हें पाहून ते आपलें दुःख विसरत. परंतु जेव्हां राजकन्या कोणासच माळ घालित नाहीं असें त्यांनीं पाहिलें, तेव्हां आपल्यापेक्षां इला आतां दुसरा कोण योग्य पति मिळणार आहे ? आपल्यांतील कोणीच इला पसंत पडला नाहीं त्या अर्थीं आपल्यांत कांहीं कमीपणा नसून हीच वेडी आहे, असें ह्मणून त्यांनीं आपल्या मनाचें समाधान केलें. राजालाहि ही तिची वर्तणूक पाहून फार आश्चर्य वाटलें व फार रागहि आला. आपण व्यर्थ हा स्वयंवराचा खटाटोप करून या सर्व राजपुत्रांनां विनाकारण त्रास दिला, असें त्याला वाटलें. सर्वजण अशा रीतीनें आपापल्या जागीं आश्चर्यानें स्तब्ध आहेत, इतक्यांत राजकन्येनें प्रेक्षकांत बसलेल्या विक्रमाच्या गळ्यांत जाऊन माळ घातली. हें पाहतांच तर त्यांचें आश्चर्य द्विगुणित झालें. राजाला तर तिच्या या कृतीचा फारच संताप आला. तो आपल्या सिंहासनावरून उठून तिच्याजवळ जाऊन तिला रागानें ह्मणाला "कारटे ! हें तूं काय केलेंस ? आज माझ्या कुळाला आणि अब्रूला बट्टा लावलास. स्वयंवराच्या अधिकाराचा तूं असा दुरुपयोग करशील हें मला आधीं कळलें असतें तर मी तुझ्या स्वयंवराचा हा खटाटोप न करतां मींच आपल्या पसंतीनें तुझा

योग्य वराशीं विवाह केला असता. तूं विद्यासंपन्न आणि शहाणी असल्याचा तुझा लौकिक आहे आणि माझाहि तुझ्याबद्दल आजवर तसाच समज होता; पण तो पार खोटा होता हें माझ्या चांगलेंच प्रत्ययाला आणून दिलेंस. तूं माझी आज चांगलीच फजिती केलीस. जा आतां आपल्या पतीबरोबर. माझ्यासमोर उभी देखील राहूं नकोस !"

राजकन्या नम्रपणें ह्मणाली "बाबा ! मीं स्वयंवराच्या अधिकाराचा यत्किंचितहि दुरुपयोग केला नाहीं. हे कोण आहेत हें आपण ओळखलं नाहीं. नाहीं तर आपण माझ्यावर असे रागावलां नसतां. मीं जें काय केलं आहे तें विचारपूर्वकच केलं आहे अशी आपली लवकरच खात्री होईल."

मुलीचें हें भाषण ऐकून राजा अधिकच बुचकळ्यांत पडला. हा कोण ? याला मीं ओळखलें नाहीं आणि माझ्या मुलीनें ओळखलें हें कसें ? शेवटीं त्यानें राजकन्येच्या दासीकडे वळून तिला हा आपला भावी जामात कोण ह्मणून प्रश्न केला. तेव्हां दासीनें "हे उज्जयनीपति विक्रमादित्य महाराज" असा थोडक्यांत जबाब दिला. हे तिचे शब्द ऐकतांच सर्वांनीं आश्चर्यानें तोंडावर बोट ठेवलें. सर्वांची दृष्टी विक्रमाकडे लागली. विक्रमादित्य आणि असा एकीकडे कां ? आणि इतर कोणास ठाऊक नसतां राजकन्येनेंच याला कसें ओळखिलें ? असे नानाविध प्रश्न त्या वेळीं सर्वांच्या मनांत आले. त्याच्या जवळच बसलेल्या तेल्यास हें गूढ कळतांच त्याची अवस्था काय झाली असेल याची वाचकांनींच कल्पना करावी !

राजानें आपल्या मुलीला "तूं हा विक्रमादित्य ह्मणून कसा ओळखलास?" असा प्रश्न केला. राजाचा हा प्रश्न ऐकतांच राजकन्येनें आपल्या दासीकडे वळून पाहिलें. तिच्या पाहण्याचा अर्थ ओळखून त्या चतुर दासीनें विक्रमाचें राजकन्येच्या स्नानवापीवर आगमन, तेथें त्याचें दीपकरागांत गायन, राजकन्येची व त्याची भेट व पुढें राजकन्येनें युक्तीनें त्याचा शोध कसा लावला हें सर्व त्याला थोडक्यांत सांगितलें. दीपकराग म्हणण्यांत विक्रमाचा हातखंडा होता हें राजाला ऐकून माहीत होतें, तेव्हां या तिच्या सांगण्यावरून त्याचें व इतर सभाजनांचें एका प्रश्नाबद्दल समाधान झालें; परंतु

हा असा एकटा येऊन अशा गुप्तरीतीनें कां राहिला या प्रश्नाचें त्यांनां उत्तर मिळालें नाहीं. या प्रश्नाचें उत्तर राजकन्येलाहि नीटसें माहीत नसल्यामुळें तिच्याकडून "कांहीं कठीण प्रसंग आल्यामुळं त्यांनां हा मार्ग स्वीकारावा लागला," अशा मोघम उत्तरापेक्षां जास्त काय कळणार? तेव्हां राजानें विक्रमालाच हा प्रश्न केला. आपण एकटें कां निघालों याचें कारण पुढें योग्य वेळीं कळेल. असें सांगून आपण राजधानीजवळ आल्यावर आपल्यावर चोरीचा आरोप कसा आला व आपण राजदंडास कसे पात्र झालों, नंतर आपल्याला या तेल्यानें त्या संकटांतून कसें वांचविलें हें सांगून राजकन्या प्राप्त झाल्याशिवाय या गोष्टी अगोदर उघड केल्यास आपल्या आश्रयदात्यावरहि आपला कोप होण्याची भीति असल्यामुळें आपल्याला या गुप्त वेषांत राहावें लागलें, असें विक्रमानें राजाला सांगितलें. ही सर्व हकीगत ऐकून आपल्या हातून विक्रमाला शिक्षा देण्यांत फार मोठा अपराध झाल्याबद्दल खेद प्रदर्शित करून राजानें त्याची क्षमा मागितली. विक्रमहि त्याचा अपराध विसरून गेला. राजकन्येच्या शहाणपणबद्दल व योग्य पति निवडल्याबद्दल तिची सर्वत्र वाहवा होऊं लागली. अशा प्रकारें हा स्वयंवरविधि आनंदांत पार पडला.

पुढें विक्रमाचें राजकन्येशीं थाटानें लग्न झालें. जमलेल्या राजपुत्रांनां राजानें या समारंभाकरतां आग्रहानें ठेवून घेतलें होतें. त्यांच्या मनांत असो किंवा नसो, राजाच्या शब्दाकरितां त्यांनीं आपल्या राहण्यानें या विवाहप्रसंगास शोभा आणली. नाना कलांत प्रवीण लोकांची त्यांच्या त्यांच्या कलेंत परीक्षा होऊं लागली. या प्रसंगामुळें चीनच्या राजधानींत सर्वत्र उत्साह आणि आनंद यांशिवाय दुसरें कांहींच दिसत नव्हतें. सर्वांचा योग्य मान व योग्य संभावना होत असल्यामुळें कोणी नाखुष ह्मणून राहत नव्हता. पण—

---

प्रकरण ९ वें.

## जादुगार.

स्वयंवरसमारंभाच्या निमित्त्यानें आपलाहि कांहीं फायदा करून घेण्याच्या उद्देशानें जमलेल्या गायक, नर्तक, गारोडी, जादुगार वगैरे निरनिराळ्या लोकांच्या कलांचें प्रदर्शन राजवाड्यांत सुरू झालें. रोज कांहीं ना कांहीं खेळ राजवाड्यांत चालूच होते. आज विवाह होऊन दोनतीन दिवस झाले. आज एका नवीन आलेल्या जादुगाराचे अद्भुत खेळ व्हावयाचें ठरलें होतें. सर्व सभाजन आजचा हा अपूर्व खेळ पाहण्यास नेमलेल्या पटांगणांत जमले. जादुगारहि आपल्या चेल्यासह राजाचीच वाट पहात होता. राजा येतांच सर्वजण जमलेले पाहून त्यानें त्याला खेळास सुरुवात करण्यास आज्ञा दिली. तत्क्षणीं जादुगारानें आपल्या चेल्यास आपल्या सामर्थ्यानें हवेंत उडविला, त्याला अधांतरीं चालविला व असेच आणखीहि अनेक अद्भुत खेळ करून सभाजनांची चित्तवृत्ती तल्लीन करून सोडली. सर्वजण त्याच्या या विलक्षण सामर्थ्याची व कुशलतेची तारीफ करूं लागले. याच्यासारखा एकहि जादुगार आपल्या पाहण्यांत आला नाहीं, याचे खेळ कांहीं अजबच आहेत, असें जो तो ह्मणूं लागला. आपली तारीफ झालेली ऐकून जादुगारालाहि धन्यता वाटली. तो आणखी कांहीं खेळ करणार इतक्यांत राजानें त्याला "तुझा सर्वोत्कृष्ट खेळ असेल तोच आतां कर," अशी आज्ञा देतांच त्यानें "आपला मुख्य व उत्तम खेळ करतों," असें ह्मणून आपल्या चेल्यास 'बेटा मदारी' ह्मणून हांक मारली. चेला जवळ येतांच "मुडदेका पेटारा लाव!" अशी त्याला आज्ञा केली. नंतर जमिनीवर एक काळें वस्त्र पसरून त्यावर पेटाऱ्यांतील मुडदा त्यानें काढून ठेविला आणि राजाकडे वळून तो ह्मणाला "सरकार! आपके हुकुमका ये बंदा ताबेदार अब एक अजब खेल बताता है, आप ख्याल देके देखिये. ये एक आदमीका मुडदा है. मै इसकूं चाहे वो जानवर बनाता हूं, या इसकू जिंदा करके इसके मूसे आप जो सवाल करेंगे उसका जबाब दिलवाता हूं. पहिले मै इसकूं शेर बनाके आपकूं दिखावूंगा, और फिर आप फर्मान करेंगे तो इसकूं जिंदा बनाकर आपसे बुलवाता हूं."

राजानें ठीक आहे ह्मणून मान डोलावतांच तो आपल्या कार्यास लागला.

जादुगाराजवळचें तें प्रेत पाहतांच विक्रमाचा चेहरा फिक्का पडला, डोळे लाल झाले. तो चट्दिशीं मागें वळून जवळच असलेल्या राजकन्येच्या कानांत कांहीं पुटपुटला. तीहि परत त्याच्यापुढें येऊन त्याच्या पायांजवळ जमिनीवर बसली.

जादुगारानें आपल्या चेल्यास हांक मारली. तो जवळ येऊन उभा राहतांच त्यानें झोळींतून हाडाची एक कांडी काढून आपल्या हातांतील लोखंडाच्या व पितळेच्या कांकणावर मारून जमिनीवरची चिमूटभर माती घेतली व तोंडानें कांहीं मंत्र ह्मणत प्रेताच्या भोंवतालीं फिरून त्याच्या चारी बाजूंस ती माती टाकली. नंतर चेल्याजवळ ती कांडी देऊन त्याला त्या प्रेतावर बसण्यास सांगितलें व मग दोघेहि कांहीं पुटपुटूं लागले. त्यांचें पुटपुटणें चालू असतांच चेल्यानें ती मंतरलेली कांडी प्रेतावरून फिरविली व तिच्या एका टोंकाचा त्याच्या तोंडास स्पर्श केला. त्यासरशी प्रेत हालूं लागलें. तेव्हां तो त्या प्रेतावरून उठून दूर उभा राहिला. जादुगारानें पुन्हा पुटपुटण्यास सुरुवात केली व चिमूटभर माती मंतरून त्या प्रेतावर टाकून "बेटा शेर बनजा!" ह्मणून त्याला आज्ञा केली. त्याची आज्ञा होतांच त्या प्रेताच्या जागीं एक भला मोठा वाघ दिसूं लागला. वाघाच्या अंगावर चेल्यानें हात फिरविला व गुरूच्या सांगण्याप्रमाणें "बेटा ! अपने दुष्मनको खाजा !" असा त्याला हुकूम केला. लगेच वाघानें विक्रमाच्या अंगावर रोंख धरून उडी मारली. सर्व प्रेक्षक घाबरून उठले. पण विक्रम जागच्या जागींच पुतळ्याप्रमाणें स्वस्थ बसला होता. राजकन्या पापणीहि न हालवितां जादुगाराच्या त्या वाघाकडे टक लावून पहात होती. ती घाबरलीहि नाहीं व आपल्या जागेवरून उठलीहि नाहीं. वाघाची उडी विक्रमाच्या अंगावर पडणार तोंच तिनें आपल्या हातांत घेतलेली माती त्याच्या अंगावर टाकून "अपने मालिकको खा डाल !" असें त्याला सांगितलें. क्षणाचाहि विलंब न लावितां वाघानें एकदम मागें फिरून जादुगाराच्या चेल्यास खाऊन टाकलें व पूर्ववत् तो मानवदेहधारी प्रेत होऊन पडला. जादुगार

जागच्या जागीं थिजल्यासारखा होऊन निश्चेष्ट पडला. प्रेक्षकांनां हा काय चमत्कार, हें समजेना व कोणालाच हें गूढ उकलेना. प्रेताचा वाघ काय झाला, त्यानें शत्रूला मारून टाक ह्मणतांच विक्रमावर उडी कां मारली, यांचें व विक्रमाचें शत्रुत्व कोठलें, धन्याला मार ह्मणून राजकन्येची आज्ञा त्यानें कशी पाळली, व चेल्याचा प्राण कां घेतला, आणि हें सगळें क्षणाच्या अवकाशांत कसें झालें, हें कांहींच न कळल्यामुळें ते वेड्यासारखे एकमेकांकडे पाहूं लागले. सर्व सभा आश्चर्यानें चित्रासारखी तटस्थ झाली.

थोड्या वेळानें अवसान आणून जादुगार उठून राजकन्या आणि विक्रम यांच्या पायांवर मस्तक ठेवून त्यांची करुणा भाकूं लागला. वाचक हो! हा जादुगार कोण हें आपण ओळखलेंच असेल. त्यानें आपला वेष अगदीं बेमालूम रीतीनें बदलला होता त्यामुळें विक्रमानें देखील पहिल्यानें त्याला ओळखलें नाहीं; परंतु प्रेत पाहतांच त्यानें तें ओळखून हा जादुगार आपला शत्रु योगीच असला पाहिजे हें त्याच्या ध्यानांत आलें व राजकन्येला वरण्यांतील त्याचा प्रधान हेतु आज सफल झाला. वीरोत्तंस पंचत्वाप्रत गेला व योगी हतवीर्य होऊन शरण आला हें पाहतांच त्याला फार आनंद झाला.

योग्यानें करुणा भाकली तेव्हां राजकन्या त्याला ह्मणाली "बाबा! तुझ्यावर दया करणं शक्य तरी आहे का? तुझ्यावर दया करणं ह्मणजे तुला पुन्हा दुष्कर्म करण्याची संधी देणं आहे. मी हें कदापि करणार नाहीं! तुला आतांच मारला असता, पण सद्यःस्थितींत तुला मारला तर तुझी सूडाची बुद्धि कायम राहील आणि जिवंतपणीं साधलं नाहीं ह्मणून तूं पिशाच योनी घेऊन विक्रमादित्य राजाला छळशील. तेव्हां तुला स्वाभाविक मरण येईपर्यंत वेड्याप्रमाणें निर्बुद्ध स्थितींत तूं पृथ्वीतलावर संचार करित रहा. ह्मणजे मरशील तेव्हां तुला कोणतीहि वासना राहणार नाहीं. जा, निर्बुद्ध स्थितींत फीर, हाच माझा तुला शाप आहे!"

योगी राजकन्येला वंदन करून तिचा शाप भोगण्याकरितां जाण्यास निघाला. इतक्यांत विक्रमानें त्याला थांबविलें व राजाकडे वळून ह्मटलें "महाराज! हा योगी वीरोत्तंस प्रधानाला सहाय्य करण्याकरितां माझ्या नाशास

मि.

प्रवृत्त झाला होता. एकदा मी याच्या तडाक्यांत सांपडलों होतों, तेव्हां यानें आपल्या सामर्थ्यप्रभावानें मला श्वान केलें होतें; माझी त्या स्थितींतून ज्योतिर्विद् वराहमिहिरांनीं सुटका केली. त्यांच्याच सांगण्यावरून आपल्या कन्येच्या स्वयंवराची बातमी मला आगाऊ कळली व आपल्या निमंत्रणाची वाट न पाहतां मी येथें येण्यास निघालों. या योग्याला हतवीर्य करून याच्यापासून माझें संरक्षण करण्याची आपल्या कन्येशिवाय इतरांची शक्ति नाहीं असें त्यांनीं सांगितल्यावरून मला येथें येण्याशिवाय दुसरा तरणोपायच नव्हता. या योग्यापासून माझ्या येथें येण्याची वार्ता गुप्त रहावी म्हणून मंत्रिमंडळावर राज्याचा भार टाकून राज्यांत कोणालाहि मी इकडे आल्याचा सुगावा लागूं न देतां एकटाच मी इकडे निघालों. येथें आल्यावरची हकीगत आपल्याला पूर्वींच विदित केली आहे. पण माझ्या येथें येण्याची बातमी गुप्त ठेवण्याची माझी युक्ति सफल झाली नाहीं असें दिसतें. या योग्याला त्याचा सुगावा लागला असला पाहिजे. त्याशिवाय हा येथें येऊन आजचा प्रसंग न आणता. यानें वीरोत्तंसाला मदत करण्याकरितां माझ्या नाशास कां उद्युक्त व्हावें हें समजत नाहीं. तेव्हां हा निर्बुद्ध होण्यापूर्वीं आपण याच्याकडून हें विचारून घ्यावें, म्हणजे सर्व गोष्टींचा खुलासा होऊन मनाला समाधान होणार आहे."

विक्रमाची ही इच्छा कळतांच राजकन्येनेंच त्याला तो प्रश्न केला. तेव्हां त्यानें आपली हकीगत सांगण्यास सुरुवात केली. तो म्हणाला "महाराज, व सभाजन हो ! माझें चरित्र विचित्र असल्यामुळें आपल्याला तें मनोरंजक वाटेल व त्यापासून थोडासा बोधहि मिळेल. तर आपण तें एकाग्र मनानें ऐका. माझा चेला म्हणून माझ्याबरोबर आलेला गृहस्थ हा विक्रमादित्य महाराजांचा माजी प्रधान वीरोत्तंस होता. त्याच्या पूर्वीं माझा पिता याच स्थानावर होता, त्याचें नांव नरोत्तम. तो जितका शहाणा होता, तितकाच सात्विकहि होता. मी त्याच्या पोटीं आलों, परंतु त्याच्या सात्विक वृत्तीचा मात्र माझ्या ठिकाणीं पूर्ण अभाव होता. मी वयांत आल्यावर माझा विद्याभ्यास पूर्ण झाला म्हणून मी पित्राज्ञेप्रमाणें आर्यावर्तांत प्रवास करावयास

निघालों. या प्रवासापासून मला चार देश दिसतील व त्या योगानें माझ्या विद्येंत प्रत्यक्ष ज्ञानाची भर पडेल ही माझ्या पित्याची इच्छा होती. ही इच्छा माझीहि होती, पण एवढीच मात्र नव्हती. माझ्या विद्यादिगुणांमुळें फार झालें तर मला माझ्या वडिलांच्या पश्चात् त्यांचें प्रधानपद मिळालें असतें; पण तेवढ्यानें माझा संतोष होण्यासारखा नव्हता. माझ्या मनांत प्रधानपदापेक्षां राजपद मिळेल तर उत्तम, अशी महत्त्वाकांक्षा उत्पन्न झाली. या प्रवासाचें ठरल्यापासून तिला पंख फुटले व ही महत्त्वाकांक्षा पूर्ण करण्याचा या प्रवासांत कांहीं मार्ग सांपडल्यास पहावा, हाहि एक माझ्या मनांतील उद्देश होता. महत्त्वाकांक्षेशिवाय मनुष्याच्या हातून कांहीं मोठीं व महत्त्वाचीं कामें होत नाहींत. याकरतां महत्त्वाकांक्षा अवश्य आहे. तिच्याशिवाय मनुष्य व्यर्थजीवित होतो. इतिहासाकडे पाहिलें ह्मणजे महत्त्वाकांक्षेचें महत्त्व आपल्यास स्पष्ट दिसतें. इतिहासाचीं पानें ज्या पुरुषांच्या कृतींच्या वर्णनांनीं भरलेलीं असतात, त्या पुरुषांच्या सर्व कृत्यांच्या मुळाशीं त्यांच्या मनांत असलेली महत्त्वाकांक्षाच आपल्यास दिसते; परंतु कोणतीहि गोष्ट झाली तरी ती योग्य परिघांत असल्यास चांगली असते, तिचा अतिरेक झाल्यास तीच अनर्थास कारण होऊन दुर्गुणांत गणली जाते. साखर गोड आहे, आणि उपयोगीहि आहे; परंतु तिचा अति उपयोग केल्यास प्रकृतींत विकृति करण्यास तीच कारणीभूत होते. आणखी, कोणतीहि गोष्ट स्वतः चांगली किंवा वाईट नसते. तिचा उपयोग करणारावर तिचा चांगुलपणा किंवा वाईटपणा अवलंबून असतो. तरवार स्वतः कोणाला तारित नाहीं, किंवा मारित नाहीं. तर ज्याच्या हातीं ती असते त्याच्या प्रवृत्तीप्रमाणें ती तारक किंवा मारक होत असते. हीच गोष्ट महत्त्वाकांक्षेलाहि लागू आहे. ती योग्य परिघांत असेल व तिचा सत्कारणीं उपयोग केला तर मनुष्याच्या अभ्युदयाला आणि कीर्तीला ती कारण होते, नाहीं तर तीच त्याच्या नाशालाहि कारण होते. माझ्या महत्त्वाकांक्षेनें आपला परिघ सोडला आणि तिचा ओघ नीच स्वार्थाकडे वळला व त्याचा मला परिणामहि भोगावा लागला.

"उत्तर प्रांतांतील प्रवास संपवून मी दक्षिणेकडे वळलों. फिरतां फिरतां तेलंग देशांत गेलों. या देशाच्या राजधानींत असतांना माझी व तेलंगाधिपतींची भेट होण्याचा सुयोग आला. तेथें असतांना त्याच्या मनांत विक्रमादित्याबद्दल असूयाग्नि धुमसत असल्याचें माझ्या कानीं आलें. आपल्या महत्त्वाकांक्षेस याच्या सहाय्यानें रंगारूपास आणतां येईल अशी मला आशा उत्पन्न झाली. हळुहळू धोरणाधोरणानें त्या राजाशीं मीं संधान बांधलें. माझा मनोदय कळतांच माझ्या सहाय्याचें महत्त्व ओळखून तेलंगाधिपतीनें माझ्याशीं गुप्त खलबत सुरू केलें. कोणत्याहि राज्याला बाहेरच्या शत्रूपेक्षां अंतःशत्रूच जास्त अपायकारक असतात. किल्ल्याच्या तटावर बाहेरून मारा केला असतां तो पडण्याचा जितका संभव असतो, त्यापेक्षां आंतून त्याच्या पायांत सुरुंग लावला असतां तो लवकर जमीनदोस्त होतो, हें उघड आहे. विक्रमाला बाहेरून त्रास देण्याचें काम तेलंगाधिपतीनें पतकरिलें व आंतून फितूर करून त्याच्या राज्याचा पाया खचवून टाकण्याचें मीं कबूल केलें. तेलंगाधिपति स्नेही राजांनां आपल्या कटांत घेण्याच्या व आपलें बल वाढविण्याच्या उद्योगाला लागला व इकडे मी रामेश्वराचें दर्शन घेऊन उज्जयनीस परत फिरलों.

"या कटानें विक्रमाला पादाक्रांत करून सार्वभौम होण्याचा तेलंगाधिपतीचा उद्देश होता व तेवढ्यापुरतीच त्याला माझी मदत पाहिजे होती. परंतु एकदा विक्रमाचा नाश झाला ह्मणजे या कटवाल्या राजांत कलह माजवून, विक्रमाबरोबर युद्ध करण्यांत आधींच जेरीस आलेल्या तेलंगाधिपतीस चीत करावें आणि आपणच राज्यपद लाटावें, हा माझा उद्देश होता. कटांत सामील होऊन कांट्यानें कांटा काढावा आणि दोन राजांत वैर उत्पन्न करून लाभाचा हिस्सा आपण उपटावा, असा माझा अंतस्थ विचार होता. उज्जयनीस आल्यावर मीं आपल्या भावी अभ्युदयाच्या खटपटीस सुरुवात केली आणि मला यश मिळेल असा संभव दिसूं लागला तसतशीं माझ्या दुष्ट महत्त्वाकांक्षेचीं मुळेंहि खोल जाऊन दृढ होऊं लागलीं.

परंतु दैवलिखित कांहीं निराळें होतें! या कुटिल नीतीनें माझा अभ्युदय व्हावा हें माझ्या ललाटीं नव्हतें. माझें फितूर करण्याचें काम चालू असतांना तें पूर्णावस्थेस पोंचण्यापूर्वींच त्याचा सुगावा राजास लागला. राजा सर्वांत सुखी दिसतो व लोकहि तसेंच ह्मणतात; परंतु राजाचें सुख राजालाच ठाऊक. राज्यपदावर बसणें हें सिंहाच्या पाठीवर बसण्यासारखें आहे. लोकांनां वाटावें कीं, हा सिंहावर बसला असल्यामुळें याला कशापासूनहि भय बाळगण्याचें कारण नाहीं. पण जो सिंह इतरांनां आपल्या सुखाचें कारण आहे असें वाटतें, तोच सिंह त्याच्यावर बसणाराच्या नाशाला केव्हां उद्युक्त होईल याचा नेम नसतो. सिंहावर बसणाराला सदोदित मृत्युमुखांत वास करावा लागतो. त्याला सर्वदा जागृत रहावें लागतें. सिंहासनस्थ राजाचीहि स्थिति अशीच आहे. ही गोष्ट प्रजाहित साधून नृपतिपद सार्थ करून इहपरलोक साधणाऱ्या खऱ्या राजाची आहे. प्रजाभक्षक राजांची गोष्ट निराळी. त्यांनां प्रजापीडन करूनहि सुखानें घोरत पडतां येतें; परंतु ही स्थिति फार वेळ टिकत नाहीं. शिशुपाळाप्रमाणें त्यांचे शंभर अपराध भरले ह्मणजे त्यांचाहि कृष्ण उत्पन्न होतो; परंतु अर्थात् विक्रम राजा या कोटींतील नव्हता. तो सदा जागृत असे. माझ्या कृष्णकारस्थानांचा त्याला पत्ता मिळाला हें ठीकच झालें. त्यानें माझी चौकशी केली व योग्य तो न्याय केला. माझ्या अपराधाला देहांत शिक्षाच योग्य होती; परंतु माझ्या वडिलांकडे पाहून मला देहांत शिक्षा न देतां राज्याच्या हद्दीबाहेर हांकलून देण्यांत आलें.

"झाल्या गोष्टींनीं मला शहाणा केलें. कृतकर्माचा मला खेद झाला. माझे डोळे उघडले. आजपर्यंत दुष्ट कृत्यांत आयुष्याचा व्यर्थ व्यय केला याबद्दल मला मोठा पश्चात्ताप झाला. असो. झालें तें झालें. पुढें तरी या देहाचें सार्थक करावें, असा निश्चय करून मी हिमालयांतील गिरिकंदरांतून गुरुशोधार्थ हिंडूं लागलों. कांहीं पूर्वार्जित पुण्यसंचय पदरीं होता, त्याच्या प्रभावानें मला फार वेळ भटकावें न लागतां लवकरच एका महात्म्या गुरूची भेट झाली. आपल्या चरित्राचा त्याच्यापुढें पाढा वाचून

मीं आपला मनोदय त्याला कळविला. त्यानेंहि माझी स्थिति पाहून कांहीं एक आढेवेढे न घेतां मला आपल्या कृपाछत्राखालीं घेतलें. त्याच्या अनुशासन पद्धतीनें व त्याच्यावर दृढ विश्वास ठेवून मीं योगाभ्यासास सुरुवात केली. गुरूच्या कृपाप्रसादानें मला योग साध्य होऊं लागला; परंतु प्रत्येक कामांत विघ्नेंहि असावयाचींच. विघ्नांनां न जुमानतां जो कार्यसिद्धि करतो तोच खरा मनुष्य. माझें पाप आडवें आलें. योगाभ्यासाचें अंतिम साध्य जो मोक्ष त्यापासून भ्रष्ट होऊन मी मध्यंतरीं प्राप्त होणाऱ्या सिद्धींच्या ताब्यांत गेलों. त्यावेळीं मला त्यांचें कौतुक वाटलें; परंतु माझ्या गुरुमहाराजांस मी मार्गच्युत झाल्याचें कळलें. त्यांनीं माझ्या डोळ्यांत अंजन घालून माझा भ्रम दूर केला. त्यांच्या चरणांवर मस्तक ठेवून मीं त्यांचें अभय मागितलें. गुरूजींच्या गंगोदकाप्रमाणें निर्मल मनानें मला अभय दिलें; परंतु माझें भ्रष्ट मन शुद्ध होण्याकरतां भारतवर्षांत फिरून बारा ज्योतिर्लिंगांचें दर्शन घेऊन येण्याची त्यांनीं मला आज्ञा केली. गुर्वाज्ञेप्रमाणें मी पर्यटनास निघालों. फिरत फिरत महाकालेश्वराचें दर्शन घेण्याच्या हेतूनें उज्जयनीस आलों. माझ्या विरहानें खंगून पिता माझ्या वियोगानंतर थोड्याच दिवसांत स्वर्गवासी झाल्याचें मला तेथें कळलें. उज्जयनीला आल्यावर गुर्वाज्ञा पार विसरून जाऊन मोहानें माझी दृष्टि पुन्हा अंध झाली. विक्रमाबद्दलचा माझा द्वेषाग्नि पुनरपि प्रज्वलित झाला. प्राप्त झालेल्या सिद्धींमुळें माझ्या अंगांत जी शक्ति आली होती तिचा दुरुपयोग करण्याची मला पुन्हा इच्छा उत्पन्न झाली. राजाचा नाश केला पाहिजे, या विचारापुढें गुरूकडे जाण्याचा माझा विचार नाहींसा झाला. नशिबीं असेल तें होतें. माझा हा देह पुण्याचरणानें सार्थकीं लागावा, हें विधिलिखितच नव्हतें! या दुष्ट विचारानें मी क्षिप्रेच्या तीरीं राजाच्या नाशाचा विचार करित बसलों. राजाला मीं एका क्षणांत निजधामाला पोहोंचविला असता; परंतु त्याला केवळ मारून माझें समाधान होण्यासारखें नव्हतें. माझ्या मनांतून त्याला शरण आणून आजन्म आपला अंकित करून यावज्जीव सर्व तऱ्हेनें त्याचा पाणउतारा करावा, असें होतें. शिवाय, यांत आपलें अंग आहे

असें कोणाच्या लक्ष्यांत न येऊं देतां सर्व दोषाचें खापर दुसऱ्याच कोणाच्या तरी डोक्यावर फुटावें व आपला कार्यभाग परस्पर पार पडला तर पहावा, असाहि माझा विचार असल्यामुळें अशी एखादी युक्ति शोधण्यांत मी गुंतलों होतों. इतक्यांत आतां आपल्यासमोर व्याघ्रमुखीं पडलेल्या वीरोत्तंस प्रधानाशीं माझी गांठ पडली. त्याचा व माझा उद्देश एकच असल्यामुळें जणूं काय त्याच्यावर उपकार करण्याकरतां ह्मणून मीं त्याला सहाय्य करण्याचें पतकरिलें. त्याचा एकुलता एक मुलगा देवीला बळी देऊन राजाला गोत्यांत घालण्याचा माझा विचार होता. तो विक्रमास कळून विक्रम माझ्या पर्णकुटीजवळ आला असतां त्याला मीं कुत्रा केलें; परंतु माझा कार्यभाग पूर्ण होण्यापूर्वींच विक्रमाच्या ज्योतिषानें माझ्या हातावर तुरी देऊन त्याला पळवून नेलें व पूर्वस्थितींत आणलें. मला त्याच्या या कृत्याचा मुळीं मागमूस देखील नसल्यामुळें विक्रमाची त्यावेळीं सुटका झाली. तरी आह्मीं आपला उद्योग सोडला नाहीं. विक्रमाच्या पुण्यप्रभावामुळें माझ्या सामर्थ्याचा त्याच्यावर व्हावा तसा व व्हावा तितका लवकर परिणाम होत नसे; परंतु त्याचा नाश केल्याशिवाय रहावयाचें नाहीं, हा आमचा निश्चय कायम होता. आह्मी पुन्हा त्याला गोत्यांत आणण्याच्या खटपटीस लागलों; परंतु वराह-मिहिराच्या सांगण्यावरून विक्रम इकडे आपल्या राजधानीस येण्यास गुप्तपणें निघाल्यामुळें कित्येक दिवस आह्मांला ही गोष्ट कळली नाहीं. तो माझ्या आटोक्याबाहेर गेल्यामुळें माझ्या क्रियेचा कांहींच परिणाम होईना. विक्रम आमच्या ताब्यांत येण्याचें चिन्ह दिसेना तेव्हां हा कोठें तरी दूर देशांत गेला असला पाहिजे, असा मला संशय येऊन योगबलानें मीं त्याचा शोध केला, तेव्हां तो इकडे आला असून आपल्या कन्येच्या सहाय्यानें माझें पारि-पत्य करणार आहे, असें मला कळलें. लगेच मीं त्याच्या मार्गांत विघ्न आण-ण्याचा प्रयत्न केला व कपटवेषानें येथें येऊन आपल्या कन्येकडून माझा नाश होण्यापूर्वींच विक्रमाचा नाश करावा ह्मणून या गारोड्याच्या वेषानें वीरोत्तंसास व त्याच्या मुलाच्या प्रेतास घेऊन येथें आलों. माझ्या प्रयत्ना-प्रमाणें विक्रमावर चोरीचा आरोप येऊन त्याच्या प्राणावरच बेतली होती;

परंतु त्याच्या पुण्याईनें ह्मणा, किंवा माझ्या पापामुळें ह्मणा, तो त्यांतून सुटला व आपली कन्याहि त्याला प्राप्त झाली, तेव्हां माझे पाय गळले. तथापि शेवटचा उपाय करण्याचें ठरवून आज आपल्यापुढें प्रेताला व्याघ्ररूप देऊन त्याच्याकडून विक्रमाचा नाश करण्याचा मीं प्रयत्न केला.

"माझें चरित्र संपलें. गाढवाला कितीहि धुतलें तरी तो कांहीं घोडा होत नाहीं, गाढवच राहतो; त्याप्रमाणें मीं कितीहि प्रयत्न केले तरी माझें दुष्ट मन शुद्ध होऊं शकलें नाहीं व आतां मला अशा या रीतीनें मरण येणार आहे! दुष्टांचा अंत असाच व्हावयाचा!! असो गतं न शोच्यं. एका जन्माचें कार्य झालें. मानवदेहधारणाचें माझ्या हातून कांहींच साफल्य झालें नाहीं. पण आतां शोक करून काय उपयोग? घर जळल्यावर पाण्याचा काय उपयोग? आतां यापुढें मला देवाला प्रार्थना करतां येणार नाहीं. तेव्हां विक्रमराज! आपल्यास व आपल्या पत्नीस आणि देवास आतांच प्रार्थना आणि तीहि अखेरचीच करतों. आपण माझे सर्व अपराध पोटांत घालून माझ्या हातून पुढील जन्मीं तरी अशीं दुष्ट कृत्यें होऊं नयेत अशी माझ्याकरतां देवाजवळ प्रार्थना करा, आणि देवा! तुलाहि या दीन पतिताची हीच शेवटची प्रार्थना आहे. या दीनाचा उद्धार कर!"

असें बोलून तो रडूं लागला. राजकन्येला व विक्रमाला त्याची दया आली. सर्व सभा त्याचें चरित्र ऐकून व त्याची सद्यःस्थिति पाहून गहिंवरली. नंतर राजकन्या योग्याला ह्मणाली "बाबा! माझा शाप तुला भोगलाच पाहिजे व त्यांतच तुझं कल्याण आहे. तुझ्या हातून पाप झालं असलं, तरी पुण्यहि झालं आहे. तुजवर तुझ्या गुरूचा अनुग्रह असल्यामुळं त्याच्या कृपाप्रसादानं आणि अंतीं बुद्धीच्या अभावीं असणाऱ्या निर्वासनामय स्थितींत तुला मृत्यु आल्यानं तुला पुनर्जन्माच्या फेऱ्यांत पडावं लागणार नाहीं. शिवाय, या माझ्या शापापासून प्राप्त होणाऱ्या स्थितींतहि तुला फार वेळ रहावें लागणार नाहीं. एका वर्षाच्या आंतच मृत्यु तुला या देहांतून मुक्त करील. तोंपर्यंत तूं बाबांजवळ रहा. तेच तुझी काळजी घेतील व तुझे हाल होणार नाहींत."

राजकन्येच्या शापाप्रमाणें योगी निर्बुद्ध स्थितींत राहूं लागला. राजकन्येच्या इच्छेप्रमाणें तिच्या पित्यानें त्याचा शेवटपर्यंत सांभाळ करण्याचें पतकरिलें. योग्याचें विचित्र चरित्र ऐकून तटस्थ झालेली सभा विसर्जन झाली.

---

प्रकरण १० वें.

## उपसंहार.

आमच्या कथानकाचा शेवट मागील प्रकरणांतच झाला आहे. परंतु राहिलेल्या कांहीं किरकोळ गोष्टी सांगून औपचारिक रीत्या या गोष्टीचा समारोप करणें अवश्य आहे.

विक्रमाचा विवाहसमारंभ निर्विघ्नपणें व चांगल्या प्रकारें पार पडला. सर्व वऱ्हाडी परत गेले. विक्रमहि श्वशुरगृहींच्या आदरातिथ्याचा यथेच्छ उपभोग घेऊन आपल्या नूतन पत्नीसह उज्जयनीस सुखरूप येऊन पोहोंचला.

आपल्या जीवनदात्या तेल्याला ह्मातारपणीं सुखानें दिवस घालवितां यावे ह्मणून विक्रमानें त्याला व त्याच्या पत्नीला आपल्याबरोबरच आणलें. आपल्या जन्मभूमीवरच्या प्रेमामुळें त्याला विक्रमाबरोबर जावें असें वाटेना. परंतु त्याचें आतां विक्रमावर पुत्रवत् प्रेम जडलें असल्यामुळें त्यानें विक्रमाच्या आग्रहावरून त्याच्याबरोबर जाण्याची तयारी केली. बिचारा कृतोपकाराच्या फळाचा उपभोग घेत आपले वृद्धावस्थेंतील दिवस उज्जयनीस आनंदानें घालवूं लागला.

मध्यंतरीं योग्यामुळें आलेल्या अरिष्टानें विक्रमाचें आपल्या प्रजापालनाच्या कार्याकडे दुर्लक्ष्य झालें होतें; परंतु त्याचा शेवट अनुकूळच झाल्यामुळें त्यानें आपल्या राज्याची धुरा पुन्हा आपल्या खांद्यावर घेतली व तो आपल्या कार्याकडे पूर्ववत् लक्ष्य देऊं लागला. जिच्यामुळें त्याला हा सुयोग प्राप्त झाला होता, त्या आपल्या नूतन प्रिय भार्येसह तो इतर राण्यांबरोबर आनंदानें काळ घालवूं लागला. त्याच्या राज्यांत सर्वत्र आनंद वास करूं लागला व सर्वजण त्याच्या या नूतन पत्नीला धन्यवाद देऊं लागले.

वाचकांपैकीं कित्येकांस ही गोष्ट फक्त मनोरंजक वाटेल, तर दुसऱ्या कित्येकांस ती मनोरंजक आणि बोधप्रदहि वाटेल व दुसऱ्या कित्येकांस यांपैकीं एकहि गुण इच्यांत दिसणार नाहीं. व्यवहारांत आपण रोज ज्या कित्येक गोष्टी करतों व पाहतों त्यांतील प्रत्येक मनोरंजक किंवा बोधप्रद असतेच, असें थोडेंच आहे. त्याप्रमाणेंच प्रत्येक गोष्टींत बोध सांपडतोच असेंहि नाहीं. मग आमच्या या गोष्टींत बोध न मिळाल्यास त्यांत काय विशेष आहे? परंतु मनोरंजन आणि बोध मिळणें सर्वस्वी गोष्टीवरच अवलंबून नसतें. वाचकाच्या प्रवृत्तीप्रमाणें त्याला या गोष्टी प्राप्त होतात. आपण ज्याकडे दुर्लक्ष्य करतों अशा क्षुल्लक गोष्टींपासून देखील दत्तात्रेयाला उपदेश मिळाल्याचें आपण ऐकतों. तशीच स्थिति गोष्टींची आहे. आपण बोध घेऊं ह्मटलें तर तो आपल्यास कोठेंहि मिळेल. मग या गोष्टीपासूनच तो कां मिळणार नाहीं?

दुर्गुण आणि सद्गुण यांचा झगडा लागला असतां देवदानवांच्या लढाई-प्रमाणें शेवटीं सद्गुणाचाच विजय होतो. दुर्गुण कितीहि बलवान् असले, व त्यांनां जय मिळतोसा दिसला, तरी तो चिरकालिक नसतो; त्यांचा अंत पराजयांतच व्हावयाचा, हा ईश्वरी नियम आहे. सद्गुणी माणसांनां जरी कदाचित् प्रारंभीं हालअपेष्टा भोगाव्या लागल्या, तरी पांडवांप्रमाणें चौदा वर्षें वनवास भोगल्यावर 'यतो धर्मस्ततो जयः' हें अबाधित तत्त्व त्यांच्याहि अनुभवास येतें. हा बोध विक्रम आणि योगी यांच्या चरित्रावरून मिळणार नाहीं काय?

परोपकाराचें पुण्य फार मोठें आहे. क्षुल्लक ह्मणून कोणत्याहि प्रसंगाची अवहेलना करूं नये. थेंबाथेंबानें तळें सांचतें, त्याप्रमाणें लहानलहान प्रसंगीं आचरलेल्या सद्गुणांनीं मनुष्याचें शील बनतें. परोपकाराची आवड असली ह्मणजे दारिद्र्यादि गोष्टींचा अडथळा येत नाहीं, व शेवटीं आपलें सद्वर्तनच आपल्यास तारतें. हा उपदेश तेल्याच्या कृतीपासून मिळण्यासारखा आहे. लाभाच्या आशेनें कार्य कोणीहि करील. विक्रमाला ओळखून जर त्यानें त्याला आश्रय दिला असता, तर त्यांत तारीफ करण्यासारखें कांहींच

नव्हतें; परंतु त्याची कांहींच माहिती नसतां, उलट राजकोपाची भीति असतांना देखील निरपेक्षबुद्धीनें त्यानें विक्रमावर उपकार केले, याबद्दल त्याची वाहवा कोण करणार नाहीं?

गुणांची चहा गुणी मनुष्यालाच असते. विक्रमानें आपल्या दरबारांत विद्वानांनां आश्रय दिला होता, ह्मणूनच त्यांतील एकानें—वराहमिहिरानें—त्याला महत्संकटांतून पार पाडलें. विक्रम हा गुणांचा भोक्ता होता आणि स्वतः गुणसंपन्न होता. ह्मणूनच त्याला राजकन्येची प्राप्ति होऊन योग्या-सारख्या प्रबल प्रतिस्पर्ध्याशीं टक्कर देतां आली. 'स्वदेशे पूज्यते राजा, विद्वान् सर्वत्र पूज्यते।' या ह्मणीचा त्याला अनुभव आला. त्याच्या गायन-विद्येनेंच त्याला राजकन्येच्या प्राप्तीचा मार्ग सुगम झाला. या चरित्रभागा-वरून आपल्याला विद्येचें महत्त्व कळतें.

अशा प्रकारें घेणाराच्या शक्तीप्रमाणें याहि गोष्टीपासून त्याला बोध मिळेल. तथापि ही गोष्ट वाचित असतांना वाचकांनां घटकाभर करमणूक झाली, तरी देखील त्यांतच आपल्या श्रमाचें चीज झालें असें लेखक मानील.

विक्रमचरित्रांतील या गोष्टीचा शेवट जसा आनंदांत झाला तसेंच आमच्या हातून सद्गुणाचरण घडवून आमचें भावी आयुष्यहि सुखपरिणामी होवो, हीच त्या सर्वसाक्षी जगच्चालकाजवळ शेवटीं प्रार्थना करून वाचकांचा निरोप घेतों.

समाप्त.